

# ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात..

..डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

# ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात..

**(आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख)**

डॉ. सुहास पेठे
एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात
पुस्तकरूपाने प्रकाशित दुसरी आवृत्ती : मार्च २०२०
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

## 'ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात वाटचाल करण्यापूर्वी...'

संतकृपेनं लाभलेला श्री ज्ञानेश्वरीचा चाळीस वर्षांचा वैयक्तिक सहवास हे आयुष्यातलं अनमोल, अवर्णनीय भाग्य होय. नेहमी अनुभव येतो की, रोजचे साधेसाधे प्रसंग, तात्त्विक चर्चा इथंपासून ते पारमार्थिक अनुभवांपर्यंत सर्वत्र माउलींचं सांगणं ऐकणं उपयोगी ठरतं. त्यांनी श्री संतांना, श्री गुरूंना अखंड तेवत असलेला आणि आपल्याला सन्मार्ग दाखवणारा दीप म्हटलं आहे. श्री माउलींची ज्ञानेश्वरी हा त्यांचा असाच 'सोज्वळ संतकृपादीपक'च आहे, असं पदोपदी अनुभवायला येतं.

त्यातून मिळणारा प्रकाश हा चिरंतन आहे. काळ किती बदलला, प्रश्न किती बदलले, माणसांचं राहणीमान कल्पनेपलीकडे पालटलं, जीवनचक्राला यंत्रांनी कमालीची गती आणली, त्याचबरोबर शुष्कता आणि कोरडेपणाही आणला. माणसांचं व्यक्तिगत पातळीवरचं जीवन साधं सरळ राहिलं नाही. अनेकांच्या जीवनाला सात्त्विक ध्येयं उरली नाहीत. वेगवेगळ्या संस्कृतींच्या प्रभावामुळं रजोगुणाचा अक्षरशः उद्रेक झाला. त्याला तमोगुणाची दुर्दैवी साथही मिळाली. त्यामुळं सामान्य माणसांची सरळ आयुष्यं भरकटली नसती तरच नवल !

ती तशी नुसतीच दिशाहीन झाली नाहीत, तर देहसुखवादी, स्वार्थी झाल्यानं आता माणूस स्वास्थ्य गमावून बसला. काही सन्मान्य विवेकी लोक सोडले, तर साधारण माणूसच नव्हे तर तथाकथित बडीबडी माणसंही अखंडपणे कामांत आहेत, पळताहेत, हे रोजचं चित्र झालं आहे. पण स्वास्थ्याच्या नक्की

कोणत्या दिशेनं हा वेगवान प्रवास चालला आहे, हे तो करणाऱ्यांनाही खात्रीनं सांगता येत नाही. कारण जगायला सुरुवात करण्यापूर्वी, कृतीपूर्वी वाटेतले सारे भ्रम - आडवाटा लक्षात घेऊन शाश्वत सत्य, निरपेक्ष आनंद, देवमय जीवन - अशा ध्येयांकडं जाणाऱ्या मार्गाची निश्चित रूपरेषा समोर असण्याची परंपरा लोपत चालली आहे.

ही परंपरा सद्ग्रंथ आणि वाचक, आत्मानुभवी गुरू आणि जिज्ञासू शिष्य तसंच विशेषतः प्रेमळ, अलौकिक संत - त्यांचा चित्त पालटणारा सहवास आणि तो लाभण्यासाठी तळमळणारे निष्ठावान भक्त - अशा स्वरूपाची होती. ती माणसाच्या जीवनाच्या वाटचालीवर वेळोवेळी जरूर असलेला प्रकाश टाकीत असे, हा आपला हजारो वर्षांचा अनुभव आहे. आत्मकेंद्रित काळाच्या लोंढ्याबरोबर जाताना या परंपरेचं, त्यामधून मिळणाऱ्या विधायक प्रकाशाचं हळूहळू विस्मरण होत चाललं. त्याचा परिणाम म्हणून ही कोरडी जीवनं, शांती न देणारी भौतिक समृद्धी, आंतरिक दारिद्र्य, भय, असुरक्षितता, जिव्हाळा लोपलेले - व्यावसायिकतेकडं झुकणारे परस्पर संबंध- असं आधी म्हटल्याप्रमाणं जीवन अनेकजण अनुभवत आहेत.

त्यात शांतपणे साऱ्या जगाबद्दल जिव्हाळा बाळगून जगण्याची प्रेरणा देणारं संतजीवन आणि त्यांचा बोध हाच आता मोठा आशाजनक दिलासा आहे. त्या प्रकाशात चालणाऱ्या अनेकांची जीवनं बाहेरच्या या विपरीत, भ्रमित जगातही शांती आणि समाधानाचा अनुभव घेत - देत जगली जात आहेत. त्यात सर्वांना दिलासा आणि प्रकाश देऊ शकणारे जे शाश्वत ग्रंथ, त्यांत श्री ज्ञानेश्वरीचं स्थान शतकानुशतकं अढळ आहे. आजही त्या प्रकाशात वाटचाल करून समाधानी जीवन जगायला मार्ग दाखवण्याची विलक्षण कालातीत, दैवी प्रेरणा त्यात आहे. त्याचा स्वतःला झालेला आणि कदाचित इतरांना उपयोगी

होऊ शकणारा इवलासा प्रकाश या ठिकाणी आत्यंतिक नम्रतेनं आणि सदिच्छेनं समोर ठेवला आहे.

हे छोटसं लेखन आकाराला येण्याच्या श्री माउलींच्या प्रेरणेला आत्ता अचानक मूर्त स्वरूप यायला कारणीभूत झाले, ते मात्र सातारा आकाशवाणीचे केंद्र निदेशक श्री.कोरेसाहेब व त्यांचे सहकारी कार्यक्रम अधिकारी श्री.यादवसाहेब. त्यांच्या आग्रहानं हे लिहून झालं, बरचसं प्रसारितही झालं. त्यांचा मी ऋणी आहे.

या लेखनाला पुस्तकरूपाचा आकार येण्यात सहभागी असलेल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार ! आपल्या दैनंदिन जीवनावर इथं पडणारा हा प्रकाश किंचितच आहे, पण तो कृपाळूपणे रुजू करून घ्यावा, अशी वाचकांच्या चरणी प्रार्थना !

- सुहास पेठे

ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात

*अनुक्रम*


१. ज्ञानेश्वरी वाचण्याचं वय ..८

२. लढवय्याचं चित्त ..११

३. शरणागतीतलं शौर्य ..१४

४. अनावश्यक चिंतेला आवर ..१७

५. स्वास्थ्यकारक प्रवास ..२०

६. शुद्ध बुद्धीची थोरवी ..२३

७. एका मार्गाची निवड ..२६

८. पूर्णतेची आकांक्षा ..२९

९. हवेपणाची ठिणगी ..३२

१०. प्रसन्नतेची सोबत ..३५

११. बंधनांचं रहस्य ..३८

१२. उपासातला बारकावा ..४०

१३. सावध झोप, सावध जाग ..४३

१४. अलभ्य लाभ ..४६

१५. खरंखरं भाग्य ..४९

१६. नुकसानीची जबाबदारी ..५१

१७. पत द्यावी, पण कशाला द्यावी ..५३

१८. कर्तृत्वाची खरी ओळख ..५५
१९. सावधानलोकांची एक बेफिकीरी ..५७
२०. खऱ्या ज्ञानाची ओळख ..५९
२१. ज्ञानांतला फरक ..६१
२२. खऱ्या सुखाचा मार्ग ..६३
२३. खरा प्रश्न अज्ञानाचा ..६५
२४. अभेदामुळं आनंद आणि उद्धार ..६७
२५. समत्वामुळं शांती ..६९
२६. त्यागाची परंपरा ..७१
२७. समजूतदार दृष्टिकोन ..७३
२८. अज्ञानाचा अंधार - ममत्व ..७५
२९. अज्ञानाचा अंधार - कल्पना ..७७
३०. अज्ञानामुळं कर्मफळाची काळजी ..७९
३१. अज्ञानाचा परिणाम - भ्रम ..८१
३२. आचाराचं आगळं कारण ..८३
३३. ज्ञानेश्वरांकडूनही शिकावं ! ..८५
३४. खरं पुण्यकर्म ..८७
३५. ज्ञानेश्वरीचं शाश्वत औचित्य ..८९

***

## १. ज्ञानेश्वरी वाचण्याचं वय

जगात चार पैसे मिळवून साधी पोटापाण्याची सोय करायलासुद्धा कुणाकडं तरी, काही विद्या शिकावी लागते. कुठल्या तरी पाचदहा ग्रंथांचा अभ्यास करावा लागतो. तेव्हा कुठं माणसाच्या प्रपंचाच्या-नोकरी, पैसा अशा साध्यासाध्या गरजा भागतात, हा आपला अनुभव आहे. उलट हाही आपला अनुभव आहे की, एवढ्या अगदी गरजेच्या वाटणाऱ्या गोष्टींसाठी कुणाकडून शिकून घेऊनसुद्धा माणसाला पोटापुरती विद्या मिळेल, याचीसुद्धा आजच्या काळात खात्री नाही.

आता यात विचार करावा की, गाथेसारख्या, ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथांचं स्थान,या सगळ्या पोटापाण्याच्या विद्या देणाऱ्या ग्रंथांच्या रांगेत कुठं आहे ? अनेकांची कल्पना आहे की, आपला प्रपंच यथास्थित पार पडल्यावर कदाचित उरल्या वेळात, फावल्या वेळात वाचायचे हे ग्रंथ असतील. असल्या कल्पना आपणच आयुष्याचं नुकसान करून घ्यावं तशा आहेत, हे कृपा करून आपण समजून घ्यावं, अशी प्रार्थना करावीशी वाटते.

आपल्याला ज्ञानेश्वरीत आलेल्या ज्ञानाची कल्पना नसेल, परिचय नसेल तर, आपण तो करून घ्यावा आणि मग ठरवावं की, याची गरज आपल्याला आज आहे, की ती म्हातारपणची गोष्ट आहे. या बाबतीत सावध झालेल्या लाखो लोकांचा अनुभव लक्षात घेतला तर, एका वाक्यात सांगता येईल की, ज्ञानेश्वरी हा मुळातच आयुष्य कसं जगावं, ते कोणत्याही परिस्थितीत कसं चांगलं जगता येईल, त्याचं उत्तमात उत्तम चीज कसं करता येईल, ते सांगणारा ग्रंथ आहे. त्या अर्थानं तो जीवनग्रंथ आहे.

आपण अगदी सोपं पाहिलं तरी, तरुण मुलाच्या हातात गाडीची किल्ली देताना आपण एवढा तरी विचार नक्की करतो ना, की ती गाडी त्याला चालवता येते ना ? ती चालवण्याचं शिक्षण त्याला मिळालं आहे का ? गाडी चालवण्याची त्यानं परीक्षा दिली आहे का? त्याच्या हातात ती चालवता येत असल्याचं प्रमाणपत्र आहे की नाही ? जर या गोष्टी असतील तरच, त्याचा त्या

गाडीवरचा प्रवास त्याला कुठला धोका न पोचता होईल. त्याच्याबरोबरच रस्त्यावरून जाणाऱ्या इतर माणसांनाही त्याच्याकडून कुठला धोका उत्पन्न होणार नाही.

एक वाहन चालवायला सुरुवात करताना आपण-आपली शक्ती, गाडीची ताकद, वेगावरचं नियंत्रण, प्रसंगी गाडी आटोक्यात आणण्याची क्षमता- अशा अनेक गोष्टींची खात्री करून आपण गाडी चालवायला देतो. आपण स्वतःही गाडी हातात घेताना तसं वागतो, तरच आयुष्य सुखाचं जातं.

आपला अनुभव आहे, गाडी चालवायचं ज्ञान हे गाडी चालवण्यापूर्वी घ्यावं लागतं. न शिकता मला येईल, या भ्रमात, येईल तशी चालवून, अपघातात स्वतःचं, गाडीचं, इतर वस्तूंचं, माणसांचं नुकसान झाल्यानंतर ती चालवायला शिकायला लागणं, हे किती अव्यवहार्य आणि बालिशपणाचं ठरेल?

थोडा विचार केला तर आपल्या लक्षात येईल, एखादी साधी गाडी चालवायची झाली तर, आपण एवढी काळजी घेतो. तीही चालवण्यापूर्वी घेतो. न घेतल्यास नुकसान होतं. असा विचार केला तर आपलं आयुष्य हीसुद्धा एक फार मोठी गाडी आहे. तिच्यावरून करायचा प्रवासही खूप मोठा - साठसत्तर वर्षांचा आहे.

एकवेळ गाडीवरून निघालं, काम करून आलं, दिवस संपला की विषयही संपतो. तेवढ्यापुरती काळजी घेतली तरी आपण सुरक्षित राहातो, इतरही सुरक्षित राहातात, कामही यशस्वी होतं. पण सबंध जीवन किती कर्मांचं आहे ! किती गुंतागुंतीचं आहे ! किती माणसांशी, विषयांशी, क्षेत्रांशी, ध्येयांशी आयुष्याचा संबंध येतो !

मग लक्षात येईल की, हे सारं आयुष्य यशस्वी व्हायचं तर, ते सुरू करण्यापूर्वीच आपल्याला ते कुठं कुठं कसं कसं जगावं लागेल याच्या तयारीची गरज आहे. तसं केलं नाही आणि कसंही जगून, मनाला येईल तशी शिक्षणं घेऊन, नोकऱ्या, धंदे, लग्न, मुलंबाळं -असं जीवन जगलं, तर अपघात घडून, आपण आणि इतर दुःखात पडतो.

ते टाळायचं आणि आयुष्याची गाडी नीट चालायची आणि योग्य स्थळी सुरक्षितपणे पोचायची तर, ती कशी चालवायची हे शिकवणारी ज्ञानेश्वरी तरुणपणीच नव्हे, तर लहान वयात वाचण्याची आणि समजून घेण्याची गरज

आहे. ज्ञानेश्वरी वाचण्याच्या वयाबद्दल यापेक्षा वेगळं काय आणि किती सांगावं?

माउलींनी गीतेबद्दल जे शब्द वापरले त्यांचा आधार घेऊन ज्ञानेश्वरीबद्दल सांगायचं तर, 'ज्ञानेश्वरी हा बाप बाप ग्रंथ' आहे हे ओळखावं, जमेल तितक्या लवकर वयात अभ्यासावा आणि मग आयुष्याची गाडी हाकायला सुरुवात करावी ! आयुष्य अधिक यशस्वी आणि सार्थकाचं होईल, यात यत्किंचित शंका नाही !

***

## २. लढवय्याचं चित्त

आपण खूप पातळ्यांवर जगणारे लोक आहोत. लहान मूल मोठं होण्यासाठी झगडतं आहे, कुणी शाळेच्या परीक्षांसाठी लढाया करतो आहे, कुणी उत्तम शिक्षणासाठी प्रवेशपरीक्षांतली लढाई करतो आहे, कुणी ऑफिसमधली कामांची दिलेली टार्गेट्स् वेळेत गाठण्यासाठी रात्रंदिवस नियोजन करतो आहे, कुणी गृहिणी वेळेत द्यायचा डबा अधिकाधिक चांगला देण्यासाठी कष्ट करताहेत, कुणी घेतलेली कंत्राटी कामं - त्यांतली गुणवत्ता राखण्यासाठी झगडतो आहे, कुणी शिक्षक आपापला विषय विद्यार्थ्यांना नीट आकलन व्हावा, म्हणून वेगवेगळ्या मार्गांनी प्रयत्न करीत आहेत.

कुणी मोटारमन सिग्नलचं भान ठेवून, विशिष्ट सेकंदाला आपली रेल्वे ते-ते स्टेशन गाठते आहे ना, यासाठी प्रतिक्षणी दक्ष राहून, हालचाली करतो आहे, कुणी कुटुंबात - समाजात सुसंवाद निर्माण व्हावा, त्याची अपेक्षित प्रगती योग्य दिशेनं व्हावी, म्हणून निरलसपणे काम करतो आहे, जीवनमृत्यूच्या सीमेवर असलेल्या पेशंटचा जीव वाचावा म्हणून कुणी डॉक्टर धडपडताहेत, कुणी अतिरेक्यांच्या विध्वंसक कारवायांवर डोळ्यांत तेल घालून, लक्ष ठेवताहेत, त्याचक्षणी देशांच्या सीमांचं रक्षण करणारे जवान तर, प्रत्यक्ष, सीमेवर एकाग्र आणि अचूक मारा शत्रूंवर करताहेत - असं प्रतिक्षणी, रोज, एकाच वेळी किती पातळ्यांवर आपण जगतो आहोत !

खरं तर, यांतली कुठलीच गोष्ट कमी महत्त्वाची नाही. प्रत्येकाच्या पातळीवर त्या त्या परीनं त्याचा प्रसंग, त्याचं काम तितकंच मोलाचं आहे. ते ते काम तितकंच यशस्वी होणंही गरजेचं आहे. त्यावर त्या त्या माणसांच्या आयुष्यातली कर्तव्यं पुरी व्हायची आहेत. त्यांच्या त्यांच्या आयुष्यातली प्रगती घडायची आहे. त्या त्या ठिकाणी ती प्रगती घडायची तर तिथंतिथं लागणाऱ्या गोष्टी, वस्तू, साधनं, मदती - खूप वेगवेगळ्या असतील. विद्यार्थ्यांच्या पुस्तकापासून ते सैनिकाच्या उत्तम रडारांपर्यंत- अशा कितीतरी प्रकारच्या या

गोष्टी असतील !

पण आपण हे पाहिलं असेल ना की, हे सारं त्या त्या ठिकाणी तसं तसं असलं तरी, तेवढ्यामुळं ते ते यश तसं मिळतंच असं नाही. अगदी वस्तू, कौशल्य, प्रयत्न करण्याची क्षमता - सगळं जरी हजर असेल तरीही, हे शक्य होईल, असं नाही. म्हणून तर, अनेक ठिकाणी अपयशं येत असतात. खूप नियोजन करूनसुद्धा अंदाज चुकतात. गोष्टी अचूक वेळी होत नाहीत.एखाद्या कसलेल्या सैनिकानं केलेला मारासुद्धा अचूक ठिकाणी, अचूक वेळी, अचूक प्रमाणात होत नाही.

याला अनेकदा एक महत्त्वाचा घटक कारणीभूत असतो आणि आपल्याला आश्चर्य वाटेल की, इतर साधनं इतक्या प्रकारची, इतक्या पातळ्यांवरची असूनही, विशेष म्हणजे हा घटक, सगळीकडं एकच आहे. तो म्हणजे ही सगळी कामं करणाऱ्या लोकांचं चित्त!

तसं पाहिलं तर, आयुष्यातल्या या साऱ्या लढायाच आहेत. पण त्या लढाया करणाऱ्यांचं चित्त जर क्षणभरही विचलित असेल, चुकीच्या ठेवणीचं असेल, कशानं प्रभावित झालं असेल तर, सारं अनुकूल असूनही ही अपयशं येतात. असं चित्त विचलित व्हायला त्या क्षणी एकाग्रता नसणं, जे काम करायचं त्यासाठी लागणारा निर्धार ढळणं, ती कामं कशी होतील याची चिंता वाटणं, ती यशस्वी झाली किंवा न झाली तर, काय होईल - याची उगाचच आधी काळजी वाटणं - अशा कसल्याही कारणानं, जीवनातल्या या सगळ्या लढाया करणाऱ्या लढवय्यांचं चित्त विचलित होऊ शकतं.

अर्जुनाचं ऐन वेळेला नेमकं तेच झालं. त्यासाठी 'लढवय्याच्या योग्य चित्ताचा विचार' गीतेला करावा लागला आणि ज्ञानेश्वर माउलींना ज्ञानेश्वरीत त्यावर अधिक प्रकाश टाकावा लागला. लढाईच्या वेळेला - निर्धार, एकाग्र कष्ट, परिणामांबद्दलची निश्चिंतता -अशा अनेक किरणांनी प्रकाशमान असलेलं सूर्यासारखं चित्त गरजेचं असतं. पण त्याच वेळी जर विचलित करणारी आकर्षणं, यशाची चिंता, अपयशाची भीती - असल्या कसल्या अंधारानं जर आपल्या चित्ताचा सूर्य ग्रासला तर, काय होईल हे उघड आहे.

असा 'अंधारे भानु ग्रासिला आथि ?' असा प्रश्न टाकून माउली म्हणतात, 'म्हणोनि अजुनी अर्जुना । झणे चित्त देसी हीना । वेगी धीर करुनिया मना । सावधान होई !'

आपापल्या आयुष्यातल्या आधी म्हटल्या तशा प्रसंगांतल्या लढायांत, चित्तावर जर असा सावधानतेचा प्रकाश ज्ञानेश्वरीच्या साहाय्यानं आपण टाकू, टिकवून ठेवू, तर जीवनातल्या लढायांत सर्वचजण आपापल्या पातळीवर लढूही शकू आणि यशस्वीही होऊ शकू !

***

## ३. शरणागतीतलं शौर्य

गीता, हा मुळात आपल्या साऱ्या जीवनाला लागू असलेला ग्रंथ आहे. तो कसाकसा आणि कुठंकुठं लागू होऊ शकतो, ते कळायला, त्या गीतेचा भावार्थ कळण्याची गरज आहे. त्या भावार्थावर जर कुणी अपूर्व प्रकाश टाकला असेल तर, तो ज्ञानेश्वरीनं. आपले प्रश्न कितीही असले, कुणाचेही असले, कुठल्याही काळातले असले तरी, त्यांचं सूत्ररूप उत्तर आपल्याला गीतेत सापडेल. पण आपापल्या परिस्थितीला त्या सूत्राचा अर्थ लावून, ते लागू करून घेऊन, आपला प्रश्न कसा सोडवावा - याची रीत आणि उत्तर आपल्याला ज्ञानेश्वरीत सापडेल.

अशाच जवळजवळ सर्वांच्या वाट्याला येणाऱ्या परिस्थितीचा, त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा आणि ते सोडवण्यासाठी त्यावर ज्ञानेश्वरीनं पडणाऱ्या प्रकाशाचा आपण विचार करूया.

कुठलंही काम करायचं ठरवलं की, ते काम समजून घेणं, त्यासाठी लागणारी कुवत असणं, ती नसली तर, आपल्याकडं असलेल्या कुवतीला योग्य असलेलं काम हुडकणं, त्या कामाला लागणारी साधनं गोळा करणं, काम पुरं करण्याचं ध्येय ठरवणं, त्यासाठी वेळेचं नियोजन करणं, त्यानुसार त्यात्या कामाचा वेगवेगळ्या टप्प्यांवर आढावा घेणं, कुठली बाजू कमी पडत असेल तर, ती भरून काढण्याचं पुन्हा नियोजन करणं - हे सारे तेते काम यशस्वी करण्यासाठी लागणारे घटकच आहेत. त्यांतला अर्थातच महत्त्वाचा घटक म्हणजे, हे सारे घटक आणि टप्पे ओलांडण्याचा माणसाला असलेला आत्मविश्वास. त्या आत्मविश्वासानं या यशाच्या वाटचालीचा शुभारंभ होतो, आणि टप्प्याटप्प्यानं यशाकडं वाटचालही होते.

पण आपला आयुष्यातला अनुभव काय सांगतो ? तर, आत्ता ज्या घटकांचा उल्लेख केला ते सगळे, या क्रमानं त्यात्या वेळी जर घडत जातील तर, विद्यार्थ्याला येणाऱ्या यशापासून उद्योगातल्या अत्युच्च यशापर्यंत, सगळी

वाटचाल अशी निर्वेधपणे आणि यशस्वीपणे होत गेली असती. तशी ती सर्वांची सर्व क्षेत्रांत झाली असती. पण असं तर आपल्याला काही अनुभवायला येत नाही. अगदी विद्यार्थ्यापासून, नोकरी-उद्योगधंदे यांपर्यंत असंख्य क्षेत्रांत या पद्धतीनं, खूप कमी लोक, यशस्वी झालेले दिसतात.

असं यश अधिक लोकांना मिळावं, हे तर खरं आहे. त्यासाठी ते तसं का येत नाही आणि ते कसं वाढवता येईल याच्यावर विचार केला तर, हे लक्षात येईल की, यावरही ज्ञानेश्वरीच्या एका टप्प्यात एक महत्त्वाचा प्रकाश, आपल्या या प्रश्नावर पडू शकतो. आपण आत्ताच म्हटल्याप्रमाणं, वाटचाल करताना लागणारा 'आत्मविश्वास' हा अगदी अपरिहार्य घटक आहे, हे खरं आहे.

पण असं आहे म्हणून, त्याच्यावर जर अवाजवी भर दिला गेला तर, त्याच आत्मविश्वासाला अतिआत्मविश्वासाचं, ठामपणाचं स्वरूप येतं. त्यामुळं, आपल्या कुवतीकडं, त्यानुसार करायच्या कामांकडं, त्यासाठी लागणाऱ्या कष्टांच्या प्रमाणाकडं आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे त्याबाबतीत घ्यायच्या वेगवेगळ्या निर्णयांच्या क्षमतांकडं, आपलं नीट लक्ष राहात नाही, वस्तुनिष्ठता राहात नाही. क्षमतांच्या आकलनापासून निर्णयांपर्यंत, या अवाजवी आत्मविश्वासामुळं चुका होत जाऊन, अशी अपयशं येतात.

आपल्याकडं विशिष्ट वेळी, त्यात्या कामातल्या यशासाठी लागणाऱ्या काही क्षमता कमी पडत असतील तर, या 'अकारण आत्मविश्वासामुळं' त्या लक्षातही येत नाहीत. उणीवा, दोष या खरं तर चुका नाहीत. पण त्या लक्षात घेण्याचा मोकळेपणा, तयारी न दाखवणं - ही चूक असते. या कमतरता किंवा निर्णय घेण्याच्या बाबतीत भ्रमामुळं आपल्याला, आपल्या झालेल्या चुका लक्षात घेणं, त्या मान्य करणं, ते दुरुस्त करू शकणाऱ्या जाणत्या मार्गदर्शकाला, गुरूला शरण जाणं, प्रांजळपणे मार्ग विचारणं - हे गरजेचं असतं.

जाणत्या माणसाकडं ते कबूल करणं, काय करावं - काय करू नये, नक्की काय करणं आपल्या हिताचं आहे ते मला कळत नाही - असं मोकळेपणानं म्हणणं, हे लौकिकदृष्ट्या कमीपणाचं वाटलं तरी, ते तसं नाही. माउली म्हणतात, 'दोहोंमाजी काई करावे । ते नेणो आम्ही' किंवा 'आता काय हित आपुले । तेही नेणो !' असं म्हणणं, हे उलट यशाच्या आड येणारा

अहंकार दूर करणं आहे. अशा ठिकाणी मला हे समजलेलं नाही, येत नाही, कसं करावं हे सांगा - हे म्हणण्यात अनेकांना वरकरणी कमीपणा वाटतो. पण आपल्याला जर यश हवं असेल, तर आपल्या लक्षात येईल की, हे म्हणणं - विचारणं गरजेचं तर आहेच, उलट तसं म्हणण्यालासुद्धा एक प्रकारचं मानसिक शौर्य लागतं. चांगल्या अर्थानं शरण जाणारा, या दृष्टीनं पाहाता शूरच असतो. ते केलं तर, जाणता माणूसच काय देवही आपल्याला मार्ग दाखवील !

त्यानं यशाचा मार्ग मोकळा होईल. मात्र त्यासाठी, या 'शरणागतीतल्या शौर्या'वर ज्ञानेश्वरीनं टाकलेला प्रकाश, जितका लवकर आपण लक्षात घेऊ, तेवढं आपल्याच हिताचं आहे !

***

## ४. अनावश्यक चिंतेला आवर

आपण आपापल्या परीनं अनेक प्रकारची कामं रोज करतो आहोत. ज्यावेळी ती कामं नवीन असतात, त्यांतली काही माहिती नसते, अशावेळी ती करण्याबद्दल आणि त्यांचा परिणाम काय होईल याबद्दल, मनुष्य संभ्रमात असतो, हे आपण समजू शकतो. पण अनेकदा तर, ही कामं माहीत असून, पूर्वी केलेली असून, पाहिलेली असूनसुद्धा, माणसाचा संभ्रम जात नाही आणि त्यामुळं त्याला काळजी उत्पन्न होते, परिणामांचं भय वाटतं, हे आश्चर्य आहे.

तसा तर, प्रत्येक गृहिणीला रोज स्वयंपाक करण्याचा, अनेक प्रकारचे पदार्थ करण्याचा अनुभव असतो. त्यात, काय केल्यावर किती कमी-जास्त होतं, याचीही कल्पना असते. पण माणसाला, मनात एकदा शंका उत्पन्न झाली की, साधा चहा करायला गेलं तरीसुद्धा, तेवढ्या दोन-तीन गोष्टी एकत्र करतानासुद्धा, हात कचरतो. ते काहीतरी कमीजास्त होईल, असं वाटतं. अनेकदा त्याची विशिष्ट चव त्याला येणार नाही, असं वाटतं.

सध्या शालान्त परीक्षांना काही कारणांनी खूप महत्त्व आलेलं आहे. वास्तविक, पहिलीच्या मानानं, अभ्यास जेवढा नवा आणि अवघड असतो, पण तो क्रमानं, योग्य पद्धतीनं करत गेलं तर, त्याचा परिणाम म्हणून तेवढं यश पहिलीत येतं. असं करीत, विद्यार्थ्याला नऊ वर्षं या अभ्यासातल्या आणि त्याच्या परिणामी - त्या प्रमाणात येणाऱ्या यशाचा, अनुभव आहे. तसा तो आठवी-नववीच्या परीक्षेला सहज सरावानं तोंडही देतो. येईल ते कमी-जास्त यश त्याला परिचित असतं आणि तो ते स्वीकारतोही.

एवढ्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर दहाव्या वर्षी आणखी काही वेगळं घडणार नसतं. एकदा ती दहावी किंवा आजच्या काळातली ही बारावी परीक्षा, जणुकाही जीवनमरणाचा प्रश्न असल्यासारखी मनानं घेतली की, संभ्रम शिरतो, यशापयशाविषयी संदेह निर्माण होतो.

या गोष्टी मन व्यापायला लागल्या की, त्यात्या परीक्षा यायच्या आधी, वर्षाच्या सुरुवातीपासूनच, त्या परीक्षांचं भय विद्यार्थ्याला ग्रासून टाकायला

लागतं. वास्तविक, ज्या पद्धतीनं दरवर्षी थोडाथोडा पुढच्या टप्प्याचा अभ्यास, तो आजवर करीत आला, त्याच्याच पुढच्या टप्प्याचा अभ्यास, त्याला करायचा असतो.

वर्षाअखेर तशीच एक परीक्षा त्याला द्यायची असते, जशा त्यानं आजवर आठ-दहा वर्षं त्या दिलेल्या असतात. तशीच, हीसुद्धा परीक्षा दिली तर, तो ती अधिक निर्भयपणे, शांतपणे देऊ शकेल. त्याप्रमाणात त्याला तसं यशही येईल. उलट अशा निर्भयतेनं किंवा शांततेनं त्याला तो टप्पा अधिक चांगल्या पद्धतीनं ओलांडता येईल. पण हे सत्य स्वीकारायला मन तयार होत नाही.

मन म्हणतं, हा आयुष्याला वळण मिळण्याचा प्रश्न आहे. जणुकाही जन्ममरणाचा प्रश्न आहे. आपल्याला त्यामुळं आजच्यापेक्षा खूप मोठी आणि वेगळी काळजी घ्यायला पाहिजे. नाहीतर, आपली धडगत नाही. गीतेचा, ज्ञानेश्वरीचा कुठला परिचय नसला तर, त्या बिचाऱ्या विद्यार्थ्याचे पालक या त्याच्या संभ्रमांतल्या, भयग्रस्त मनाला आणखीनच संकटात टाकतात. आधीच त्याच्या मनानं अकारण निर्माण केलेले भयाचे, चिंतेचे, भविष्याला जणू निर्णायक वळण देण्याइतपत महत्त्व आणि त्यामुळं त्याचा निर्माण झालेला तणाव पालक त्यावर चर्चा करून आणखीच वाढवतात.

असल्या काळजीनं, चिंतेनं त्याच्याकडून होऊ शकणारी नेहमीची अभ्यासाची तयारीसुद्धा अनेकदा खाली येते. तिचा परिणाम म्हणून मार्क कमी येतात आणि तणाव, भय अधिकच वाढतं. काही विद्यार्थी तर, गॅप घेण्याची- म्हणजे परीक्षेलाच न बसण्याची पळवाट काढू लागतात. आयत्या वेळी व्यवहार रद्द करणारे, विवाहाला अकस्मात नकार देणारे, नोकरीला हजर न होणारे - अशा असंख्य लोकांची परिस्थिती यापेक्षा वेगळी नसते ! यामुळं होणारं नुकसान त्यांचंच आहे आणि उघड आहे.

अर्जुनाची, युद्धच करणार नाही,असं सांगण्याची मनःस्थिती अशातूनच आलेली आहे. वास्तविक, यांतलं कुणीही असो, त्याचं काम त्यानं केल्यावर होणारा परिणाम, त्याच्यापुढं घडणाऱ्या घटना, हे सारं निसर्गक्रमानं निश्चित घडणारच असतं.आपण अकारण परिणामांबद्दल किंवा त्यात्या घटनांना अतिरेकी महत्त्व देऊन, संभ्रमात पडतो, भयग्रस्त होतो आणि नुकसान करून घेतो.

ज्याची चिंता करण्याची गरज नाही, त्याची चिंता करणं हे शहाण्यांचं

अडाणीपण आहे !म्हणून माउली स्पष्टपणे म्हणतात, 'परि मूर्खपणे नेणसी । न चिंतावे ते चिंतिसी !' असल्या भयाला आमंत्रण देणाऱ्या अकारण चिंतनाला, आपण सगळीकडं आवर घालू शकलो तर, आपण आपली त्यात्या ठिकाणची कर्तव्यं या ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात, उलटअधिक चांगली आणि यशस्वी करू शकू !

***

## ५. स्वास्थ्यकारक निजधर्म

कुटुंब, समाजव्यवस्था, संस्था, नोकरी, उद्योग - अशा साऱ्या ठिकाणी, प्रपंच करताकरता, माणसाला वावरत राहावं लागतं. यात जशी वयाची विविधता आहे, तशी कामांचीही विविधता आहे. वयात जसं लहान मूल, तरुण, प्रौढ, वृद्ध - असे प्रकार असतात, तसे नोकरीतही कुणी चौकीदार, कुणी कारकून, कुणी अधिकारी - असे प्रकार असतात. तसेच उद्योगधंद्यांतही ग्राहक, पुरवठादार, नोकर, धंद्याचं नियोजन करणारे अधिकारी, धंद्याचे मालक - असे प्रकार असतात. कुटुंबातसुद्धा पती-पत्नी, आई-वडील, आजी-आजोबा, नातेवाईक - असे प्रकार असतात.

जर आपण सरळ, प्रांजळ विचार केला तर, आपल्या लक्षात येईल की, यांतल्या प्रत्येक प्रकारातल्या माणसाला त्याचीत्याची काही कामं, त्यात्या भूमिकेमुळं लागू होतात. त्यानं ती केली तर, त्यात्या ठिकाणचं इतरांचं कामंही त्यांनात्यांना करता येतं आणि त्यात्या यंत्रणेला एक सुरळीतपणा येतो. त्यातून, ती यंत्रणा ज्यासाठी निर्माण झाली, ते कामही यशस्वी होतं.

मग ते कुटुंब प्रगत होवो, धंदा यशस्वी होवो, विविध क्षेत्रांतल्या नोकऱ्यांनी त्यात्या क्षेत्राचा विकास होवो, शासनयंत्रणा व्यवस्थित चालून समाजजीवन निर्वेधपणे चालू राहो किंवा संरक्षणव्यवस्था नियमबद्ध चालून देशाची अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा अबाधित राहो.

पण यासाठी एक लक्षात घेण्याची गरज आहे की, ज्या ठिकाणी, जो माणूस, ज्या कामासाठी आहे-तेच काम त्यानं प्रामाणिकपणे, जीव ओतून करणं आवश्यक आहे. त्या यंत्रणेचं सारं काम यशस्वी होण्यासाठी, ज्याच्या त्याच्या भूमिकेचं, त्याचं काम, त्यानं व्यवस्थित करणं एवढंच पुरेसं आहे.

पण मनाची ठेवण इतकी सरळ आणि प्रांजळपणे काम करू देत नाही. त्यासाठी त्याला अशा ज्ञानेश्वरीसारख्या कुठल्या तरी शाश्वत ग्रंथाच्या प्रकाशात काम करू देण्याची गरज आहे. नाहीतर, मन काय करील, हे सांगता येत नाही. ते मन आईचं काम कनिष्ठ ठरवील, वडिलांचं वरिष्ठ ठरवील. नोकराचं कनिष्ठ

ठरवील, मालकाचं वरिष्ठ ठरवील. एका नोकराचं काम करायला चांगलं आहे, असं म्हणेल, दुसऱ्या नोकराचं काम करायला चांगलं नाही, असं म्हणेल.

नोकराला, मालकाचं काम करण्याचा मोह निर्माण करील. मालकाला नोकर निवांत राहातो, असं दाखवून ते जीवन अधिक चांगलं आहे, असंसुद्धा वाटायला लावील. कधी स्वतःचं काम करण्यापेक्षा, इतरांच्या भूमिकेच्या कामाचं आकर्षण निर्माण करील आणि त्यामुळं आपल्याला असलेल्या कामाकडं दुर्लक्ष होईल. ते नकोसं वाटेल.

वस्तुस्थिती अशी आहे की, ज्याच्या जागी त्याच्या वाट्याला आलेलं काम, हेच त्याच्या दृष्टीनं त्याचं अंतिम हित आणि कल्याण साधून देणारं आहे. त्यात त्याच्यात्याच्या कुवतीप्रमाणंच, त्याची त्यात्या कामासाठी योजना होत असते. ती त्यानं स्वीकारलेलीही असते. त्याची कुवत अधिक असेल, वेगळी असेल तर, तेते वेगळं कामही त्याच्या वाट्याला येऊ शकतं. फक्त आत्ता आपण ज्या ठिकाणी, ज्या भूमिकेत आहोत, त्याला अपेक्षित काम मनापासून करणं, हाच खरा आपल्या आयुष्याचं सार्थक करणारा मार्ग आहे.

कारकुनानं बंदुकीचं आकर्षण वाटलं तरी, पेन सोडून ती घेऊ नये आणि रक्षकाला पेनचं आकर्षण वाटलं तरी, त्यानं बंदूक सोडून पेन हाती घेऊ नये. यात दोघांचंही कल्याण आहे आणि व्यवस्थेचंही. मन नेमकं तेच करायला तयार होत नाही आणि त्यामुळं आहे त्या ठिकाणी काम केल्यावर, जे स्वास्थ्य माणसाला मिळण्याची व्यवस्था आहे, ते स्वास्थ्य, मन त्याला मिळू देत नाही.

म्हणून ज्यावेळी तो जिथं आहे, तिथलंच काम त्यानं करणं, हे मनाला बजावताना, माउली म्हणतात, 'आपुला निजधर्मु पाही । जो आचरिता बाधु नाही ।' या ठिकाणचा निजधर्म शब्द वापरण्यातल्या बारकावा जरूर लक्षात घेण्यासारखा आहे. सामान्यपणे माणसाला धर्म म्हटलं की, कुठला तरी हिंदू-मुस्लिम-ख्रिश्चन असला धर्म वाटतो. इथं त्या अर्थानं कुठला संकुचित, प्रचलित धर्म अभिप्रेत नाही. व्यक्ती म्हणून तिचं तिच्या ठायी जे उचित कर्तव्य तो तिचा निज म्हणजे स्वतःचा धर्म, अर्थात आचरण आहे. त्या अर्थानं निजधर्माचं आचरण स्वास्थ्य देतं.

हे लक्षात ठेवून जर ज्यानंत्यानं आपापली कामं केली तर, कुटुंबातलीच काय, सगळीकडचीच कितीतरी अस्वस्थता कमी होईल. कारण निजधर्म हा जगातल्या प्रत्येक माणसाला लागू आणि स्वास्थ्याचा होईल असा

सार्वत्रिक धर्म आहे. तो आचरताना मग आपल्यावर काम लादल्याची भावना राहाणार नाही. साऱ्या यंत्रणाही व्यवस्थित चालतील. आपण समाधानी राहू.

'जैसे मार्गेचि चालता । अपावो न पवे सर्वथा । का दीपाधारे वर्तता। नाडळिजे ।' दिव्याच्या प्रकाशात आपला मार्ग चालणाऱ्याला जशी ठेच लागत नाही, तशी निजधर्माचं आचरण करीत ज्ञानेश्वरीच्या या प्रकाशात जगताना आपल्यालाही अस्वास्थ्याची ठेच लागणार नाही!

***

## ६. शुद्ध बुद्धीची थोरवी

साधारणतः मनुष्य कुठलंही काम करायला तयार होतो, तो त्याच्या बुद्धीला ते पटतं म्हणून. जगात तर असंख्य प्रकारची चांगली-वाईट कामं सुरू असताना दिसतात. अनेक सात्त्विक कर्मंही घडत असतात तर, अनेक तामस कर्मंही घडत असतात.

एकाच गावात आपल्याला आपल्या कामाच्या मोबदल्याला न्याय देणारं काम करणारे प्रामाणिक लोक भेटतात, मदतीला धावून येणारे शेजारपाजारी भेटतात, दिवसाचा सारा शीण विसरायला लावणारं निरपेक्ष भजन नेमानं करणारे लोक भेटतात, कृतज्ञतेनं देवाला जाणारे, नित्यनेमानं त्याचं स्मरण करणारे, नाम घेणारे - लोक आपल्याला भेटतात.

त्याच गावात आपल्याला कुठं दंगेधोपे करणारे, हिंसा-हत्या करणारे, कामाचं मोल घेऊनही ते काम करण्यात टाळाटाळ करणारे, बाजारात फसवणूक करणारे - लोक भेटतात. कृतघ्नतेनं, उपकार करणाऱ्यालाच त्रास देणारे, निंदा करणारे भेटतात, दहशतीची कृत्य करणारेही त्याच गावात भेटतात. कृपाळू देवाचं पूर्ण विस्मरण पडलेले आणि त्याप्रमाणं वागणारे अश्रद्ध लोकही आपल्याला भेटतात.

विचार केला तर, हे लक्षात येईल की, यांतला प्रत्येक जण तेते काम करायला प्रवृत्त झाला आहे, तो त्यालात्याला तशी काही बुद्धी झाली म्हणून. त्याच्यात्याच्या बुद्धीला ते काम करणं योग्य आहे, असं पटलं म्हणून. बुद्धी नाही, असं सहसा नसतं. मग काय घडत असेल ? तर त्या बुद्धीच्या ठेवणीत, प्रकारात फरक असला पाहिजे.

एकाच्या बुद्धीला, आपल्याला मिळणाऱ्या पगाराला न्याय देणारं काम प्रामाणिकपणे केलंच पाहिजे, हे पटतं म्हणून, त्याची ती बुद्धी त्याला प्रामाणिकपणे काम करायला प्रेरणा देते. तर, पगार हा आपला हक्कच आहे, आपल्याला जमेल तसं काम करावं, स्वतःला कामाचा त्रास होऊ देऊ नये, त्यामुळं दुसऱ्यांना जास्त काम पडलं तर त्याला काय होतं, त्यात

प्रामाणिकपणाचा प्रश्न कुठं येतो - असं दुसऱ्या कोणाच्या बुद्धीला पटतं. त्याप्रमाणं ती बुद्धी त्याला तसं अप्रामाणिक काम करण्याची प्रेरणा देते. म्हणून तो तसं करतो.

म्हणजे यात बुद्धीचा अभाव हे फार मोठं कारण नाही. शुद्ध बुद्धीचा अभाव, हे खरं कारण आहे. वस्तूच्या घेतलेल्या किमतीशी प्रामाणिक नसलेला माणूस, म्हणजेच त्याची बुद्धी, पैशाच्या लोभात अडकलेली असते म्हणून, ती बुद्धी कमी प्रतीची वस्तू देऊन जास्त फायदा मिळवू पाहाते. ग्राहकाला फसवण्याची प्रेरणा देते.

तीच अशुद्ध बुद्धी कमी कामात जास्त पगार मिळवण्याची प्रेरणा देते. यात अर्थातच, समाजाचं सार्वत्रिक नुकसान तर अशुद्ध बुद्धी करणारच, पण त्यात्या माणसाला जरी, असा तात्कालिक फायदा मिळाल्यासारखा वाटत असला तरी, अंतिमतः असा बिनकष्टाचा, विनामोबदल्याचा पैसा फसवणूक, व्यसन, व्याधी - अशा मार्गांनी व्यक्तीचंही शेवटी नुकसान करणारच. आपण याचे असंख्य अनुभव पूर्वीपासून घेतले आहेत. आजही ते तसेच अनुभवायला मिळतील.

म्हणून यातली जी लोभाची, चैन-चंगळीची वासना देते ती दुर्बुद्धी आहे. तिच्यामुळं होणारं नुकसान फार पूर्वीच्या काळापासून ओळखलं गेलं आहे. जी प्रामाणिकता, निर्लोभता - या सद्वासना देते, अशी सद्‌बुद्धी व्यक्तीचं स्वतःचं आणि समाजाचं नेहमी हित करीत असते. समाजाला समाधानात ठेवीत असते. सद्‌बुद्धीनं होणारं हित चटकन लक्षात येत नसल्यामुळं, तिच्याकडं माणसाची सहज प्रवृत्ती होत नाही.

म्हणून ज्ञानेश्वर माउली तिला 'दुर्लभ चराचरी सद्वासना' असं म्हणतात. ते म्हणतात, इतर वस्तू सहज आणि खूप मिळतात, पण परिसासारख्या किंवा अमृतासारख्या वस्तू याही अशाच दुर्लभ असतात, कमी आढळतात. सद्‌बुद्धीचं आणि त्यामुळं होणाऱ्या सत्कर्मांचं महत्त्व समाजात कधीच कमी झालेलं नाही. म्हणून तर दुर्बुद्धी आणि त्यामुळं निर्माण होणारी दुष्कर्मं यांना शिक्षा आणि शासन देणाऱ्या यंत्रणा, कुठल्याही समाजात आढळतात.

त्यासाठी आपलं जीवन खऱ्या अर्थानं, कायमचं स्वास्थ्याचं आणि सुखी करायचं असेल तर, अशी सद्वासना कशी जोपासली जाईल, अशी सद्‌बुद्धी कशी उत्पन्न होईल, यासाठी जरूर प्रयत्नशील असावं. ज्ञानेश्वरी तर

म्हणते की, ही अशी सद्‌बुद्धी थोडीशी जरी झाली तरी, ती दुर्लक्षित न करता, कमी न समजता, जोपासावी - 'जैसी दीपकळिका धाकुटी । परि बहु तेजाते प्रगटी ।' छोटीशी दिव्याची ज्योतही मोठ्या खोलीतला अंधार दूर करू शकते, तशी आपल्या आयुष्यातला अस्वास्थ्याचा, दुःखाचा अंधार छोटीशी सद्‌बुद्धीसुद्धा दूर करू शकते.

म्हणून 'तैसी सद्‌बुद्धी हे थेकुटी । म्हणो नये ।' म्हणजे अशी एखादी सद्‌बुद्धीसुद्धा लहान न समजता, भाग्याची समजून, वर्धिष्णु कशी होईल हे पाहावं आणि आपलं कल्याण साधावं !

***

## ७. एका मार्गाची निवड

आपल्याला तर कर्म अटळ आहे. फक्त काही कर्मांच्या बाबतीत आपल्याला निवडीला वाव असतो. आपल्या अन्न-वस्त्र-निवाऱ्याच्या बाबतीत प्रत्येकानं पूर्ण कष्टानं लवकरात लवकर स्वावलंबी व्हावं. आपला भार कुटुंबावर किंवा समाजावर पडू नये - अशासाठी कर्मं करण्याला काही पर्याय नाही. ते रास्तही आहे.

मात्र अशा तऱ्हेनं स्वावलंबी होण्यासाठी कोणत्या प्रकारचं कर्म करावं - नोकरी करावी, उद्योग उभा करावा, शेतीवाडी कसावी, इतर व्यापार करावा की, आणखी काही करावं - असे अनेक मार्ग त्याला असू शकतील. त्याची निवड तो करू शकेल.

हे सारेच पर्याय आपापल्या परीनं चांगले आहेत. ते निवडताना, कदाचित ज्याच्यात्याच्या कुवतीप्रमाणं ज्यालात्याला अनेक पर्यायही उपलब्ध असतील. याचा परिणाम म्हणून, काही लोक असे अनेक पर्यायसुद्धा स्वीकारतात. एकाच वेळी नोकरीचे प्रयत्न केले, ती लागली म्हणून ती करतात. त्यातून स्वावलंबी होतात. त्याचवेळी उरलेल्या वेळात त्यांना काही धंद्यातलं कौशल्य आहे म्हणून, तोही करतात. त्यातून पुन्हा आणखी पैसा मिळतो. त्यांच्या दृष्टीनं ते श्रीमंत होत जात असले आणि त्यात त्यांना काही चुकीचं वाटत नसलं तरी, एक-दोन गोष्टी घडतच असतात. नोकरीवर ते स्वावलंबी झाले, त्यांची पैशाची गरज भागली तिथं त्यांनी थांबावं. त्यानं काही नुकसान होणार नाही.

मात्र तिथं न थांबता, वेळ आहे, जमतो आहे म्हणून त्यांनी जर नोकरीही केली आणि धंदाही केला तर मात्र त्यांचं आणि इतर कुणाचं तरी नुकसान होतं. कारण ज्याला त्या धंद्याची कुवत नाही, पण त्या नोकरीची कुवत आहे, त्याची नोकरीची संधी गेली.

उलट असंही असू शकेल, ज्याला नोकरीची कुवत नाही पण त्या धंद्याची कुवत आहे, त्याची धंद्याची संधी गेली. त्याचबरोबर अशा दोघांचीही

स्वावलंबी होण्याची संधीही जाईल ! मग त्यांचा भार कुणावर तरी पडेल.

शिवाय ज्यानं ही नोकरी आणि धंदा दोन्हींही केली, त्याच्याकडं जरुरीपेक्षा जास्त पैसा येईल. त्यातून एकतर, तो संचय करेल. त्यामुळं श्री तुकोबा म्हणतात तसं, 'साचूनी मरे धन । लावी पोरांसी भांडण ।' असला उपद्रव त्या संचयातून निर्माण होईल. कदाचित संचयाऐवजी त्याची प्रवृत्ती खर्चिक असेल तर, तो चैनीकडं झुकेल. ती करताना बेसावध राहिला तर, तो व्यसनासारख्या घातक प्रवृत्तींना बळी पडेल. त्यात तो स्वतःचंही नुकसान करील आणि इतरांचंही.

अशावेळी पैशानं स्वावलंबी होण्याचे अनेक मार्ग दिसले तरी, एका मार्गाची निवड करणं, हे स्वतःच्या हिताचं आहे, तसंच ते इतरांच्याही हिताचं आहे, हे आपल्या लक्षात येईल. हे प्रपंचाच्या बाबतीत या पातळीवर जितकं खरं आहे, तितकंच त्याच पद्धतीनं परमार्थाच्या बाबतीतही, आपलं हित होण्यासाठी हेच कसं खरं आहे, हे लक्षात घेण्यासारखं आहे.

परमार्थ म्हणजे मनुष्यजीवनाचं साफल्य साधण्याचा मार्ग. ज्यात सात्त्विकपणे स्वतःही जगावं आणि त्याचपद्धतीनं इतरांनाही मदत घडावी, हे अभिप्रेत असतं. आपला अनुभव असेल की, अशा पद्धतीनं देवाची प्राप्ती करतानासुद्धा अनेक मार्ग असू शकतात.

ज्याच्यात्याच्या कुवतीप्रमाणं ज्यानंत्यानं तेते मार्ग निवडावेत, असं ज्ञानेश्वरीचं म्हणणं आहे. त्याचा विचार करण्याची गरज अशासाठी आहे की, अनेकांना अनेक मार्ग समोर येतात. पटतात. तसा मार्ग म्हणून कुठला वाईट नसला तरी, आपल्या गावी जायला जसा, एकच रस्ता पुरतो, तसा उद्धारालासुद्धा एकच मार्ग पुरतो. अनेक मार्गांच्या आकर्षणापोटी खूप लोक प्रत्येक मार्गाला जाऊन बघतात. थोडं चालून पाहातात. दुसरा सोपा वाटतो म्हणून तो चालतात. मग तिसरा. तसा एका अर्थानं, कुठलाच मार्ग खरा सोपा नसतो. कारण किमान अंतर आणि कष्ट सगळीकडं असतातच. पण असे वेगवेगळे प्रयोग करीत राहाण्यात आपला वेळही जातो आणि फळही पदरात पडत नाही.

आपल्याकडं अनेक शास्त्रं आहेत. ज्ञान-भक्ती-योग-कर्म असे अनेक मार्गही आहेत. ते सगळेच देवाकडं नेणारे असले तरी, अर्थातच ते सगळे चालण्याची गरज नसते. प्रपंचात जमले तरी जास्त मार्गांनी चालण्यात - पैसा

मिळवण्यात स्वतःबरोबर दुसऱ्यांचही नुकसान व्हावं, तसं परमार्थातही समजा जमत असलं तरी, अनेक मार्ग चालण्यात नुकसान होतं. न जमणाऱ्यांचं नुकसान तर उघडच आहे. त्यातही अनेक मार्ग चालणाऱ्या लोकांची अस्थिर वर्दळ वाढून या वेगवेगळ्या मार्गांचं, तिथल्या वातावरणाचं नुकसान होतं.

तसंच आपल्यावर कष्ट घेणाऱ्या गुरूंचे कष्टसुद्धा आपल्या या धरसोडीमुळं वाया जाऊन, त्याही मार्गानं नुकसान होतं. म्हणून नाम, कर्म, ज्ञान, योग - कुठलातरी एक मार्ग धरावा आणि आपलं ध्येय लवकर साधावं. माउली म्हणतात, 'जैसा प्रगटलिया गभस्ती । अशेषही मार्ग दिसती । तरी तेतुलेही काय चालिजती । सांगे मज ।' सूर्य उगवला म्हणजे सगळ्याच मार्गांवर प्रकाश पडतो, म्हणून काही सगळेच मार्ग मनुष्य चालतो का ? त्याला त्याच्या गावी न्यायला एक मार्ग पुरतो आणि तेवढाच त्यानं चालावा, हे लक्षात ठेवलं आणि आपणही असा एक मार्ग निवडला, दृढ धरून वाटचाल केली तर, आपलं कल्याण साधेल आणि तेही लवकर !

***

## ८. पूर्णतेची आकांक्षा

काही माणसं खूप विचारपूर्वक जीवनातल्या गोष्टी ठरवतात. त्याप्रमाणं एकेक गोष्ट पूर्ण करून, हातावेगळी करतात, त्याचात्याचा आनंदही घेतात. काही माणसांना अशा तऱ्हेनं आधीपासून विचार करणं, त्यात्या गोष्टींसाठी कामांची आखणी करणं - अशा साऱ्या गोष्टींची कल्पना असतेच असं नाही. ती माणसं, जसजशा गोष्टी समोर येतील, तसतशा त्या पूर्ण करीत जातात. अनेकदा इतरांच्याकडं बघून, त्या गोष्टींची कल्पना त्यांना येते - मग ती शाळा असो, शिक्षणाचे प्रकार असोत, नोकऱ्यांचे पर्याय असोत, व्यवसायांचे प्रकार असोत, वेगवेगळ्या नवनव्या तंत्रज्ञानांची क्षेत्रं आणि त्यांतल्या संधी असोत - त्यांतल्या त्यात जी गोष्ट त्यांना पूर्णत्व देईल असं वाटतं, ती मिळवण्यासाठी ही माणसं प्रयत्न करीत असतात.

सगळ्या आयुष्याचा विचार करून, लहानपणच्या शिक्षणापासून-निवृत्तीनंतरच्या जीवनापर्यंतचा विचार आधीपासून करणारे आणि त्यानुसार आखणी करून जगणारे लोक असोत किंवा असे त्यात्या वेळी समजणारे, सुचणारे विषय जसे समोर येतील, तसतसे ते लक्षात घेऊन, प्रयत्न करणारे लोक असोत - यांत एक आकांक्षा प्रत्येकाच्या मनामध्ये कळत-नकळत असलेली आपल्याला दिसेल.

ती म्हणजे, प्रत्येक गोष्टीतल्या 'पूर्णत्वाची आकांक्षा'. ती स्वाभाविक असली तरी, तिचं काय होतं, ते पाहूया. उदाहरणार्थ शिक्षण. शालान्त शिक्षण पूर्ण झालं तरी, पदवीचं शिक्षण अपूर्ण असल्याचं असमाधान बरोबर राहातं. पदवीचं शिक्षण घेतलेल्याला पी.जी.चं शिक्षण केलं नाही, याचं दुःख पदवीच्या सुखासमवेत कायम बरोबर राहातं. त्यामुळं होतं काय की, पूर्ण झालेल्या शिक्षणाऐवजी अपूर्ण राहिलेल्या शिक्षणाचं दुःख नेहमी जास्त राहातं.

हीच गोष्ट एखादं कार्य आरंभलं, तरी घडताना दिसेल. कोणत्याही कार्यात वेगवेगळ्या प्रकारच्या दहा गोष्टी - विधी- पाहुणे असं अपेक्षित असतं. ते स्वाभाविक आहे. तसं ते व्हावं हेही चांगलं आहे. पण प्रत्यक्षात काय घडतं,

ते पाहावं. जसं शिक्षणाचं व्हावं, तसंच इथंही घडताना दिसेल.

समजा, त्या कार्याला जर दहातले आठ लोक आले तर, आठलोकांनी कार्य पूर्ण झाल्याचं सुख होण्याऐवजी, दोन लोक न आल्याच्या अपूर्णतेचं दुःख, मनात राहून जातं. टूरमध्ये दहा ठिकाणं बघायची ठरली, त्यातली आठ ठिकाणं बघितली आणि दोन ठिकाणं राहिली, तर त्या दोन ठिकाणांचं दुःख राहातं. हे जसं होतं तसंच साध्या बाजारात जरी गेलं आणि चार भाज्या आणायच्या ठरवल्या आणि त्या जागी दोन मिळाल्या, तरी उरलेल्या दोन मिळाल्या नाहीत, हे मनात राहातं. हे आयुष्यभर असंच होत राहातं आणि त्यामुळं इतक्या गोष्टी ठरवून, घडूनसुद्धा सुख-दुःखही, तसंच सतत होत राहातं.

असं का होतं ? याचा खरंतर आपण विचार करायला हवा. पण आपण, तसं असतंच, असं समजून अख्खं आयुष्य जगतो आणि एका खऱ्या आनंदाला अंतरतो. ते कळून घ्यायचं झालं तर, त्याचं खरं कारण, ज्ञानेश्वरीच्या थोड्याशा प्रकाशातसुद्धा आपल्याला सापडेल. सुख-दुःखाचा माणसाला आयुष्यभर अनुभव घ्यावा लागतो, त्याचं कारण त्याला 'पूर्णतेची असलेली आकांक्षा' कारणीभूत आहे. आता पूर्णता हा तर, माणसात असलेल्या देवगुणाचा स्वभाव आहे. पूर्णत्वात सुखदुःखाचा प्रश्न नाही. पूर्णत्व सदैव आनंदच देतं.

मग खरी अडचण पुढं आपल्याला ज्ञानेश्वरीतून कळते की, आपण ज्या अर्थानं गोष्टी पूर्ण करण्याच्या प्रयत्नांत आहोत, त्या अर्थानं ती आकांक्षा कधीच पुरी होणार नाही. शिक्षण, कार्य, कर्मं, माणसं - अशा कुठल्या गोष्टींनी पूर्णता येत नाही. त्याचा खरं तर, आपल्याला अनुभवही आहे, आपण पूर्ण होण्याची आकांक्षा बाळगतो, तीही स्वाभाविक आहे. पण तिची जी दिशा आत्ता आहे, ती चुकली आहे. पूर्णत्व अशा बाहेरच्या कुठल्या गोष्टींनी येत नसून, ते खरंतर, आत्मसंतोषानं येत असतं.

बाहेर सारं कुठल्या ना कुठल्या रूपात अपूर्ण राहाणार - हे विचारानं किंवा अनुभवानं शिकणं, हे 'खरं जीवन शिकण्यातलं पूर्णत्व' आहे. आयुष्यातलं पूर्णत्व बाहेर नसून, आपल्याला या 'आकलनानं' ते येतं, हे कळलं तर, आपल्याला पूर्णत्व आणि त्याच्या आनंदासाठी बाहेरच्या कुठल्या गोष्टींवर अवलंबून राहावं लागणार नाही.

तर, माउली म्हणतात तसा, 'आत्मतोषी मन राहे' या पूर्णतेच्या मार्गाचा 'आत्मबोध' झाला तर, या मार्गानं 'पूर्णतेची आकांक्षा', खऱ्या अर्थानं सफल होईल आणि कुठल्याही परिस्थितीत आपल्याला सदैव आनंदात राहाता येईल !

***

## ९. हवेपणाची ठिणगी

उजाडलं, सकाळ झाली की माणसाला रात्रभराच्या विश्रांतीनंतर तहान-भूक लागते. त्यासाठी तो पाणी पितो, जेवतो. दुपारचं उन्हातान्हात काम झालं की, पुन्हा त्याला तहान-भूक लागते, तो ती पुरी करतो. असे अनेक शरीरधर्म असतात. ते नैसर्गिकच आहेत. यात त्याला लागणाऱ्या अन्नासाठी शेतीची, फळझाडांची जशी तो योजना करतो, तशीच ऊन-पावसापासून-थंडीपासून रक्षणासाठी वस्त्रांचीही योजना करतो, घरादारांची उभारणी करतो, यात काही चूक नाही. उलट या गोष्टी करण्यामुळं तो साधारणतः सुखी जीवन जगू शकतो. निदान, ज्यांना ते उपलब्ध आहे ते तरी, असं सुखी जीवन जगू शकतात, हे आपल्याला पटेल.

मग असं असताना, जगात एवढं दुःख, क्रोध, क्षोभ, अशांती - अशा अनेक गोष्टी का दिसतात ? त्या गोष्टी जगात तर दिसतातच, पण आपापल्या कुटुंबातसुद्धा अस्वास्थ्य, अशांती किंवा क्षोभ - अशा गोष्टी का दिसतात ? आपल्या स्वतःच्या आयुष्यातसुद्धा आपल्या साऱ्या मूळ गरजा भागूनसुद्धा स्वास्थ्य आणि शांतीचा अनुभव आपल्याला येत नाही - या साऱ्या विचार करण्यासारख्या गोष्टी नाहीत का ?

आपण जगात इतक्या गोष्टींवर विचार करतो, घडलेल्या असंख्य गोष्टींवर अनेकदा अकारण खल करतो, वेळ घालवतो, पण आपले खरे प्रश्न असलेल्या अशा स्वास्थ्य आणि शांतीच्या प्रश्नांना आपण किती वेळ देतो, याचा आपणच विचार करण्याची गरज आहे. त्या अस्वास्थ्य आणि अशांतीची खरी कारणं शोधायची झाली तर, आपल्याला शाश्वत उत्तरं देऊ शकणाऱ्या गीतेसारख्या किंवा त्याचा भावार्थ सांगणाऱ्या ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथांकडं जावं लागतं.

तिथं कळतं की, तहानेला पाणी, भुकेला अन्न, नेसायला वस्त्र, राहायला घर - असल्या गोष्टींनी मनुष्य दुःखी बनलेला नाही. त्याची कारणं वेगळी आहेत. त्याला, त्याच्या आजूबाजूला त्याच्यापेक्षा टोलेजंग घरं, इमारती,

श्रीमंती बंगले दिसतात. आपल्यापेक्षा वेगळ्या श्रीमंती वस्तू दिसतात, गाड्या दिसतात, चमचमीत अन्नपदार्थ दिसतात, अशा अनेक आकर्षक गोष्टी दिसतात.

वास्तविक, त्या तशा असू शकतात आणि त्यामुळं आपल्या सुखावर परिणाम व्हायचं खरंतर कारण नाही. पण तो तसा परिणाम होतो, हे मात्र खरं. ज्ञानेश्वरीच्या दृष्टीनं अशा गोष्टी नुसत्या पाहिल्या आणि आपलं आहे ते सुखी जीवन जगत राहिलं तर, आपल्या आनंदावर काही परिणाम व्हायचं कारण नाही!

पण घडतं असं की, अशा अगणित गोष्टी नुसत्या पाहिल्या जाऊ शकत नाहीत ! तर, मनाच्या स्वभावामुळं त्या नुसत्या तर पाहिल्या जात नाहीतच, पण त्यांची तुलना आपल्याकडच्या कमी वाटणाऱ्या गोष्टींशी होते आणि त्यात्या अगणित गोष्टी डोक्यातून जात नाहीत. इतकंच नव्हे तर, आपल्या बेसावधपणामुळं त्यात्या गोष्टी आपल्याला हव्या, नव्हे तर, हव्याच - अशी अभिलाषा निर्माण होते. त्या गोष्टींचं मनात सतत चिंतन होत राहातं. त्या असल्याशिवाय आपल्याला खरं सुख मिळणार नाही, अशी मनाची हळूहळू पक्की धारणा होते. त्या वस्तू मिळवण्यासाठी तगमग सुरू होते. मिळाल्या तर, पुढच्या गोष्टी हव्याशा वाटतात. न मिळाल्या तर, निराशा, क्रोध, अशांती निर्माण होते.

आधी खऱ्या गरजा पूर्ण होऊन, सुखी असलेलं आपलं जीवन आता या गोष्टी आपल्याला हव्या, या विचारानं सतत मूळ धरल्यानं, दुःखी होऊन जातं. वास्तविक, सुखासाठी नड म्हणावी तर, अशा गोष्टींची तशी नडही नसते. तरीही, त्या गोष्टी पाहून, त्यांचा मनानं संग घेऊन - चिंतन करून, आपण आपलंच सुखी जीवन अस्वास्थ्य आणि क्षोभात लोटतो.

अशी ही 'हवेपणाची ठिणगी' एकदा एखाद्याच्या आयुष्यात पडली की, ती सुखाचं आयुष्यसुद्धा जाळून टाकून दुःखाचं करू शकते. 'म्हणौनि ऐके अर्जुना । जैसा विस्फुलिंग लागे इंधना । मग तो प्रौढ जालिया त्रिभुवना । पुरो शके ।' अर्थात, वाटताना एखादी ठिणगी किरकोळ वाटते. ती नुकसान करील असंही वाटत नाही. त्यामुळं आपण तिच्याकडं लक्ष देत नाही. पण माउलींनी म्हटल्याप्रमाणं, अशी ठिणगी दुर्लक्षित राहू दिली तर, ती हळूहळू मोठी होऊन तिचं आगीत रूपांतर होतं आणि घरदार काय, ती त्रिभुवनही जाळू शकते. हवेपणाची ठिणगी ही अशी आहे.

तशी ही क्षुल्लक वाटणारी हवेपणाची ठिणगी आपण दुर्लक्षित करू नये. कारण ती माणसाचं असलेलं समाधान नष्ट करू शकते.त्यातूनही वाढत गेली तर ती आपल्या बाबतीतलं त्रिभुवन म्हणजे आपलं सबंध आयुष्य असमाधानाचं करू शकते.

हे लक्षात आलं आणि 'हवेपणाची ही ठिणगी' पडू दिली नाही तर, ते असमाधान टाळणंही शक्य आहे आणि आहे ते समाधान टिकवणंही शक्य आहे!

***

## १०. प्रसन्नतेची सोबत

सर्वसामान्य माणूस चार माणसांच्या सोबतीतच जन्माला येतो, लहानपण जगतो. मोठा झाला तरी, मित्रमंडळी, सहकारी, कुटुंबातली माणसं, मुलंबाळं - अशा तऱ्हेनं कुणाच्या ना कुणाच्या सोबतीतच आपलं आयुष्य व्यतीत करतो. या सोबतीनं त्याचं जीवन सुखाचं होतं, सोयीचं होतं, गरजा पूर्ण होतात, मदती होतात. या माणसांच्या सोबतीत, त्याच्या जशा सुखसोयी सामावलेल्या आहेत, तसे त्यापासून त्याला निर्माण होणारे त्रास आणि दुःखाचे विषयही सामावलेले आहेत. त्यात निर्माण होणारे त्रास किंवा दुःख दूर करायलाही, पुन्हा अशाच कुठल्या चार माणसांची त्याला मदत घ्यावी लागते. अशा या माणसाच्या आयुष्याच्या सोबतीच्या प्रवासावर, ज्ञानेश्वरीत एक मोलाचा प्रकाश पडलेला आपल्याला दिसून येईल.

माणसांच्या याच सोबतीत मनुष्य जगत राहिला आणि त्याला असलेली एक शाश्वत सोबत त्याच्या लक्षात आली नाही तर, या माणसांच्या नुसत्या सोबतीही त्याला अडचणीत आणतात. माणसांची सोबत उपयोगी पडते, पण ती तेवढ्यावरच थांबेल, याची खात्री नसते.

त्याच्याबरोबरची सगळीच माणसं त्याच्यासारख्या पातळीवर जगत असतात, असं नाही. त्यामुळं त्याच्या स्वतःच्या गरजा भागवून आयुष्य सुखाचं बनूनसुद्धा, इतरांच्या आयुष्याकडं, त्यांच्या मालमत्ता, वस्तू - अशा अनेक गोष्टींकडं बघून, त्याचं जीवन नकळत अस्वास्थ्यात जातं !

आश्चर्य म्हणजे, या अस्वास्थ्याचं कारण पुन्हा, या मुळात गरजेच्या आणि उपयोगी पडणाऱ्या माणसांच्या सोबतीतच आहे. अशा सोबतीमुळंच त्याच्याकडं नसलेल्या अशा अनेक नव्या गोष्टी त्याच्या दृष्टीला पडतात,त्याच्या मनाचा वेध घेतात, मनात घर करतात. त्यांची अभिलाषा निर्माण होते आणि त्यानं सुखाचं जीवन अस्वास्थ्याचं होत जातं. अशा वेळी खरंतर, माणसानं सावधान व्हावं आणि सोबतींचा आता उपद्रवाकडं प्रवास सुरू झाला आहे, हे ओळखावं.

पण मन बेसावध असतं. त्याला सावधान राहाता येतं, उपद्रव टाळता येतो, हे माहीत नसतं. अशा शाश्वत ग्रंथांचा आणि एका खऱ्या सोबतीचा परिचय नसतो. अशा कुठल्याही कारणांमुळं मन नकळत लोभ, क्षोभ, मग असूया, क्रोध - अशा मार्गांनी आपलं स्वास्थ्यगमावून बसतं.हे माणसाच्या अनेकदा आयुष्यभर लक्षातही येत नाही.

असं अस्वास्थ्य टाळायचं असेल तर, ज्ञानेश्वरीचं म्हणणं आहे की, आपल्याला माणसांच्या सोबतीबरोबरच, आत आत्मस्वरूपाची एक शाश्वत सोबत आहे, याची ओळख ठेवावी. ती ओळख असली तर, असं घडू शकतं की, आपल्याकडं प्रपंचात नसलेल्या अशा असंख्य आकर्षक गोष्टी जगात असल्या, त्या आपल्या पाहाण्यात आल्या, तरी त्यानं लिप्त होण्याचं मनाला खरंतर बंधन नाही. त्या वस्तू आपल्या जागी असू शकतात, आपल्याला दिसूही शकतात. त्या आपल्याजवळ नसल्या तरीही, आपण आपल्या जागी सुखीही असू शकतो.

माउली म्हणतात की, सूर्याचे किरण जगातल्या असंख्य गोष्टींना स्पर्श करतात. पण त्या कशानंच ते लिप्त होत नाहीत. सूर्याच्या स्वभावाप्रमाणं ते किरण पसरतात, तसं आपल्या दृष्टीच्या स्वभावाप्रमाणं ती या वस्तूंकडं जाऊ शकते. पण वस्तूंचा स्पर्श झाला तरी जसे, किरण सूर्याची शाश्वत सोबत सोडीत नाहीत, तो निघाला की, ते परततात, वस्तूंत अडकत नाहीत.

तेच आपल्या दृष्टीलाही शक्य आहे. तीही वस्तूवर पडू शकते पण, कुठलंही हवेपण निर्माण न करता, ती आपल्या शाश्वत आत्मस्वरूपाकडं परतू शकते. तिच्याकडं परतणं डोळ्यांनाच काय, कुठल्याही इंद्रियाला शक्य आहे. त्यानं ते करावं, हे आपण लक्षात घेतलं आणि केलं, तर आपल्या लक्षात येईल की,आपलं स्वास्थ्य होतं तसं कायम राहू शकतं, जगात काहीही असलं आणि आपल्याला दिसलं तरी !

माउली म्हणतात तसं, आपलं आत्मस्वरूप, सूर्य सदैव प्रकाशित असावा तसं, सदैव प्रसन्न असतं. त्यामुळं दृष्टीला दिसणाऱ्या आणि त्यामुळं अस्वास्थ्य - हवेपण देणाऱ्या कुठल्या गोष्टींनी तर सोडाच, पण जगातल्या अशा हव्याशा काय किंवा नकोशा काय, कुठल्याच इतर गोष्टींनीसुद्धा असं दुःख, क्षोभ, अस्वास्थ्य आपल्या चित्ताला होणं शक्य नाही.

कारण प्रसन्नता हा आपल्या आत्मस्वरूपाचा स्वभाव आहे. या

आत्मस्वरूपाच्या प्रसन्नतेची आपल्याला खरी आणि कायमची सोबत आहे! त्या सोबतीची ओळख झाली, ती जपली तर, जगातल्या कुठल्याही सोबती मिळाल्या - न मिळाल्या तरी, आपली प्रसन्नता अबाधित राहील !

***

## ११. बंधनांचं रहस्य

साधारणपणे बंधनं कुणाला आतून आवडत नाहीत. त्यातही दुसऱ्या कुणी घातलेली बंधनं अधिकच आवडत नाहीत. बंधनं न आवडायचं खरं कारण, मुळात स्वातंत्र्यावर असलेलं आपलं प्रेम आहे. व्यक्तीचं स्वातंत्र्य - वागण्याचं, कर्म करण्याचं, राहाण्याचं, जीवनमानाचं, लौकिक-अलौकिक गोष्टी मिळवण्याचं - सर्व प्रकारचं आहे. ते स्वातंत्र्य हे गरजेचं आहे, आदर्शही आहे.

फक्त या स्वातंत्र्यातली अगदी मूलभूत आणि तांत्रिक अडचण अशी आहे की, जगात अनेक व्यक्ती आहेत. त्या प्रत्येक व्यक्तीलाच असं स्वातंत्र्य आहे. त्या व्यक्ती निसर्गतः आणि मनुष्यस्वभाव म्हणून एकत्र राहातात - कुटुंब, समाज, देश म्हणून. त्यावेळी अगदी अपरिहार्यपणे प्रत्येकाच्या स्वातंत्र्याचं रक्षण करण्यासाठी, प्रत्येकालाच काही बंधनं स्वीकारावी लागतात. रस्त्यावरसुद्धा आपापलं जाण्याचं स्थान गाठायचं असेल तर, आपापल्या वेगाचं, रस्त्यानं जाण्याच्या बाजूचं, मागं-पुढं असलेल्या वाहनांचं भान ठेवण्याचं बंधन - सर्वांनाच स्वीकारावं लागतं. त्या अर्थानं प्रत्येकाला स्वातंत्र्य गरजेचं आणि आवडतं असलं तरी, तितकीच त्याच्यावरची बंधनं स्वीकारणंही हिताचंही आहे आणि अपरिहार्यही आहे. रस्त्यानं जाऊन, आपलं काम करून येण्याचं ध्येय गाठण्यात, आपल्याला साध्या रहदारीच्या बाबतीत जर, इतकी बंधनं स्वीकारावी लागत असतील, तर आपलं सगळं आयुष्य सुखरूपपणे जगायचं असेल आणि त्याचं ध्येय गाठायचं असेल तर, किती प्रकारची बंधनं माणसाला स्वीकारावी लागतील, याची कल्पनाच केलेली बरी.

हा जरी विरोधाभास वाटला तरी, हे खरं आहे की, प्रत्येक व्यक्तीला सुखासमाधानाचं ध्येय प्राप्त करायचं स्वातंत्र्य तरी नक्की आहे. पण ते स्वातंत्र्य प्रत्यक्ष अमलात आणण्याचे प्रयत्न करताना होणारा प्रवास मात्र असंख्य बंधनांतून जातो, हे बंधनांचं रहस्य आहे. ती बंधनं नीट समजून घेऊन स्वीकारली तर,कुटुंबापासून देशापर्यंतच्या साऱ्या यंत्रणा उत्तम चालतात. आज जेजे समाज, राज्यं, देश - उत्तम प्रगतिपथावर आहेत, ते तसे असण्याचं

महत्त्वाचं कारण, त्यांतल्या व्यक्तींनी स्वतःच्या स्वातंत्र्यावरची, समाजाच्या हितासाठी आदर्श बंधनं- ती बंधनं घालण्याचं रहस्य समजून घेऊन, पाळली आहेत. म्हणूनच तीती प्रगती शक्य झाली आहे. ज्या देशांची अधोगती झाली, त्यालाही अर्थातच अशी बंधनं व्यक्ती पाळू शकल्या नाहीत, हे कारण आहे.

व्यक्तींना ही बंधनं पाळताना, स्वतःच्या स्वातंत्र्याला सर्वांच्या हितासाठी घातलेली बंधनं स्वीकारताना, आलेलं यश, हे खरं पाहिलं तर, त्यात्या व्यक्तींनी स्वतःच्या मनाला घातलेल्या नियंत्रणावर ते अवलंबून आहे. मनानं नियंत्रण मानलं तर, त्याच्या ताब्यात असलेली इंद्रियंही ते नियंत्रण मानतात, अमलात आणू शकतात. समजा, रस्त्यावरून डावीकडून, विशिष्ट वेगानं जाण्याचा नियम मनानं मानला, तरच त्याचे डोळे, हात, पाय, सारी इंद्रियं - तो नियम पाळतात. मग ती व्यक्ती आणि तो समाज नियंत्रित राहातो, प्रगती साधतो. म्हणून ज्ञानेश्वरी म्हणते की, कर्मेंद्रियांना अशा नियमांसाठी कधी मोकळं सोडावं आणि कधी आवरात ठेवावं हे जसं, कासवाला साधतं तसं, ज्याला साधलं, तो गीतेचा आदर्श पुरुष आहे. तोच खरा समाजाचा आणि स्वतःचाही हितकर्ता होऊ शकतो.

ज्ञानेश्वरीत म्हटल्याप्रमाणं,'का कूर्म जियापरी । उवाइला अवेव पसरी।' म्हणजे एखाद्या कासवाला जसं त्याच्या इच्छेप्रमाणं त्याचे अवयव पसरता किंवा आवरता येतात, तसं हे नियमन व्यक्तीला जमावं.

ते म्हणतात, 'तैसी इंद्रिये आपैती होती । जयाचे म्हणितले करिती।' हे ज्या व्यक्तीला समजलं, करता आलं, त्या व्यक्तीचं स्वातंत्र्य अबाधित राहून, तिचा उद्धार होईल, प्रगती होईल आणि ती व्यक्ती ज्या समाजात राहाते, त्या समाजाचीही प्रगती होईल.

फक्त त्यासाठी स्वातंत्र्याबरोबरच, ते गाठण्यासाठी लागणाऱ्या, या मनावरच्या 'बंधनांचं रहस्य, गरज आणि मार्ग' समजून घेणं गरजेचं आहे !

***

## १२. उपासातला बारकावा

उपास म्हटल्यानंतर काही विशिष्ट दिवशी, काही विशिष्ट पदार्थ खायचे किंवा खायचे नाहीत, याची आठवण होते. त्यामुळंच त्यासाठी असं विशिष्ट पदार्थ खाण्यावरचं बंधन आलं की, आपल्याला ज्या नेहमीच्या चवींची, रसमय पदार्थांची सवय असते, तिला पर्याय शोधण्याचे प्रयत्न मनाकडून होतात.

माणसांना उपासाच्या दिवशीही या चवीत काही कमी पडू नये असं वाटतं. म्हणून, उपासाच्या मानल्या गेलेल्या पदार्थांना रस किंवा चव येण्यासाठी प्रयत्न सुरू होतात. तिच्यात नेहमीच्या जेवणापेक्षा काही उणीव राहू नये, यापोटी अनेक मार्ग हुडकतात. हे मार्ग हुडकता हुडकता उपासाच्या पदार्थांची ही प्रगती इतकी पुढं जाते की,अनेकदा उपासाचेच पदार्थ, नेहमीच्या जेवणातल्या पदार्थांपेक्षा वेगळे आणि चांगले ठरून आवडू लागतात. त्याचा होणारा परिणाम आपल्याला परिचित आहेच. तो म्हणजे, 'त्यापोटी' उपास करणाऱ्यांची संख्या हळूहळू वाढू लागते.

ज्ञानेश्वरीची या उपासांकडं बघण्याची दृष्टी कोणती आहे, हे पाहाण्यापूर्वी उपासाच्या कल्पनेचा थोडा विचार करू. विद्यार्थ्याची परीक्षा जवळ आली असली, अभ्यास मागे पडत असला तर तो, जड अन्न खात नाही. प्रसंगी कमी जेवतो. बाहेर जाणारा वेळ आवरतो. टी.व्ही.-सिनेमा-मोबाईल - अशा गोष्टींवर जाणाऱ्या वेळाला नियंत्रित करतो. अभ्यासाची एकाग्रता वाढावी म्हणून, साधी मांडी घालण्यापासून योगासनांपर्यंत अनेक नियमनं स्वीकारतो.

थोडा विचार केला तर, हे स्पष्ट होईल की, हे सारे त्यात्या कर्मेंद्रियांचे, त्या अर्थानं उपासच आहेत. श्रवण कमी केलं, पाहाणं कमी केलं, आहार कमी केला म्हणजे कान-डोळे-जीभ - या इंद्रियांचं एक प्रकारे नियमनच केलं आणि त्या अर्थानं उपासच घडला. या नियमनाचा, उपासाचा उपयोग म्हणून, त्यावेळची विद्यार्थ्याची जी ध्येयं असतात, ती साध्य करणं शक्य होतं. जास्तीत जास्त अभ्यास आणि यश - हे त्याला साध्य होतं. निदान ते मिळवायला त्याला मदत तरी नक्की होते.

विद्यार्थ्याला त्याच्या परीक्षेतल्या उत्तम यशासाठी, जे करावं लागतं,

तसंच नियमन खेळाडूला स्पर्धेतल्या यशासाठी, गायकाला गाण्याच्या उत्तम मैफिलीसाठी- त्यातल्या यशासाठी, कंपनीत जादा शिफ्ट करणाऱ्या उद्योजकाला प्रॉडक्शनचं टार्गेट पुरं करण्यासाठी, तर, साधकाला परमेश्वरप्राप्तीसाठी - तसंच नियमन करावं लागतं. नीट समजून घेतलं तर, त्यात्या इंद्रियांच्या बाबतीतली, ही सारी नियमनं आणि उपासच आहेत.

ज्ञानेश्वरीत मात्र या इतर इंद्रियांच्या नियमनाला योग्य स्थान दिलेलं आहेच. शिवाय त्यात सावध राहाण्यासारखे मुद्दे असे की, अशा तऱ्हेनं श्रवणाचं - कानांचं नियंत्रण केलं, दृष्टीचं - डोळ्यांचं नियंत्रण केलं तरी, रसनेचं - जिभेचं नियमन केल्याशिवाय खरी प्रगती होत नाही. असं म्हटल्यावर आपल्याला आपल्या नेहमीच्या उपासाची आठवण होईल.

माउलींच्या बारकाव्याच्या सांगण्यातला पहिला भाग असा की, खरा उपास हा खाण्याचे पदार्थ बदलून होत नाही. पदार्थापासून चव घेण्याची जी मनाला सवय आहे, त्यात हवे-नकोपण आहे - तो खरा नियमनाचा विषय आहे. पदार्थ बदलला आणि जर तो अधिकच चविष्ट किंवा चवीत बदल देणारा असेल तर, ते रसनेचं नियंत्रण नव्हे. त्यानं जिभेच्या इंद्रियाचं नियमन होणार नाही आणि त्याचा प्रगतीला फायदाही होणार नाही.

लक्षणेनं हेही समजून घ्यावं की, हीच जीभ वाचेचंही काम करते. जशी मनाला आवडीच्या पदार्थांची - रसाची ओढ आहे, तशीच जिभेच्या मार्फत उच्चारल्या जाणाऱ्या वाचेला निंदेची,आत्मस्तुतीची, प्रौढीची ओढ आहे. या सगळ्याला जर नियमन घातलं गेलं नाही तर, जसा वेगळे पदार्थ खाऊन उपासाचा हेतू साध्य होणार नाही, तसा याही बाबतीत तो साध्य होणार नाही.

जिभेला ज्यात रस आहे, त्या अशा गोष्टींचा त्याग करून, बोलण्यात नम्रता, प्रसन्नता, भगवंताचं गुणगान - अशा प्रकारे जर नियमन करू शकलो तर, 'खऱ्या उपासातला बारकावा' आपल्याला कळेल आणि त्याचा साधन म्हणून खरा लाभही होईल.

हे रसनेचं नियमन झालं नाही तर, 'वरिवरि पालवी खुडिजे । आणि मुळी उदक घालिजे ।' तशी अवस्था होऊन मन अधिकच बळकट होईल आणि भगवंत दूर जाईल. त्यात सावधान करताना, ते म्हणतात की, यात प्रयत्नांबरोबरच भगवंताच्या दर्शनाचा - कृपेचा अनुभव हाच खरी मदत करील आणि अर्थातच त्यासाठी आपल्याला प्रार्थना आणि शरणागती - हे उपाय

राहतील.

मग मात्र, माउली म्हणतात, परमानंदाचा प्रत्यय देणारा 'सोहंभाव' प्रचीतीला येईल, यात शंका नाही.

***

## १३. सावध झोप, सावध जाग

एखाद्या ठिकाणी टी-टाईमला कॅन्टिनमध्ये लोक गोळा होतात.ओघात कुणा व्यक्तीच्या, बॉसच्या चुकीचा-विक्षिप्तपणाचा विषय निघतो. हळूहळू सारे त्यात सहभागी होऊ लागतात. चर्चेला हळूहळू निंदेचं - कुणाच्या जुन्या उण्यादुण्यांचं स्वरूप येतं. नकळत बराच वेळ जातो. त्यात कितपत तथ्य असतं, याची अनेकांना कल्पनाही नसते. पण अशा प्रसंगी काही व्यक्ती शांतपणे चहा घेत असतात. टी-टाईम संपला की, तितक्याच शांतपणे कामाला निघून जातात. पण जिथं विधायक काम चालतं, तिथं मात्र ते आवर्जून हजर असतात. भाग घेतात आणि बोलतातही.

कधी आपण असंही चित्र पाहिलं असेल. परीक्षांचे निकाल होतात. त्यात्या वेळच्या ट्रेंडप्रमाणं जिथं जास्त पैसा मिळण्याची शक्यता आहे, अशा साईडला जाण्याचे सर्वांचे प्लॅन सुरू होतात. प्रवाहाच्या लोंढ्याबरोबर असंख्य पालकही मुलांची कुवत, आपली परिस्थिती - यांचाही वेळी विचार न करता, अशा साईडना रांगा लावतात. जगाच्या चलतीत असलेल्या साईडसाठी धडपडतात, जादा पैसे भरायला तयार होतात, त्यात प्रावीण्य मिळावं म्हणून त्याचं शिक्षण देणाऱ्या ठिकाणी गैरसोयी सोसून जायलाही तयार होतात. इतकंच काय, वेळी गॅप घेतात.

पुढं लठ्ठ पगार, परदेशची संधी - अशी स्वप्नं स्वतः रंगवतात, मुलांवरही बिंबवतात. शिवाय, वर तो त्यांचाच चॉईस आहे, अशी मखलाशी करायलाही विसरत नाहीत. पुढं अर्थातच अनेकांचे विषय राहाणं, कधी कमी मार्क, कधी वर्ष वाया जाणं, मग नैराश्य, कधी मनोधैर्य खाली येणं - असे अनेक परिणाम सहन करीत मुलं - पालक धडपड करीत राहातात. त्याच वेळी काही मुलं आणि पालकही आपापली आर्थिक परिस्थिती, मुलं- त्यांची कुवत- त्यांच्या आवडी-निवडी यांचा रास्त विचार करून, त्यानुसार साईड निवडतात. जग अर्थातच जगाच्याप्रमाणं न जाणाऱ्यांना नावं ठेवण्याचं काम करीत असतं. हे काही लोक - पालक त्याचा विचार न करता, शांतपणे आपली परिस्थिती -

स्वास्थ्य यांची आपली वाटचाल करीत राहातात. ती यशस्वीही होते. कारण ती वास्तव असते.

धंद्यात असंच होतं. त्यात खूप पैसा मिळाला म्हणून, बाकीचेही तेच करायला जातात. त्याहीवेळी काही लोक शांतपणे बाजूला राहातात. काळाचा विचार करून, एखादा नवा उद्योग शोधतात, एखादा सात्त्विक व्यवसाय - वेळी कमी पैसा देणाराही - पत्करतात आणि जगरहाटीच्यापेक्षा-प्रवाहापेक्षा वेगळी वाटचाल शांतपणे सुरू ठेवतात. यशस्वी होतात.

गीतेनं,ज्ञानेश्वरीनं या सगळ्या जगरहाटीचा - तिच्याबरोबर जाणाऱ्यांचा आणि न जाणाऱ्यांचाही शांतपणे विचार केला आहे. सर्वसाधारण जग, त्यातले लोक हे प्रवाहाप्रमाणं जातात. त्यांना इंद्रियांच्या सुखाची, दृश्याची अपरिमित ओढ असते. त्यासाठी त्यांना पैशाची - प्रतिष्ठेची गरज भासते. त्यामुळं ते देऊ शकणारे मार्ग असे बहुसंख्य लोक निवडतात. अशा लोकांना सूक्ष्माची आवड नसते. खऱ्या सुखाविषयी अज्ञान असतं. काहींना पटलं तरी, जगाविरुद्ध जाण्यात भय वाटतं. हा विषयसुखाच्या मागं धावून शेवटी अस्वास्थ्य, भ्रामक सुख, त्यातच आयुष्याची इतिकर्तव्यता मानणाऱ्यांचा देहवादी लोंढा शतकानुशतकं जात राहातो.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणं, निंदेचा आनंद, पैसा देणाऱ्या शाखेची - धंद्याची बेसावध निवड - ही यापेक्षा फार वेगळी नसते. पैशाच्या सुखाच्या भ्रामकपणाचा आयुष्यभर अनुभव येऊनही, तीच दिवसाची वाटचाल मानणारी पिढी, पुढच्या पिढीला तेच शिकवते. मात्र सावधान झालेले लोक इंद्रियांच्या-पैशाच्या, दृश्याच्या सुखाच्या मर्यादा ओळखतात, म्हणून या जगाच्या दिवसाच्या वेळेला, ते निद्रिस्त म्हणजे शांत राहातात. ती वाटचाल अज्ञानाची - अंधाराची आहे, हे लक्षात ठेवून, ज्यावेळी हे दृश्य आणि भ्रमित जग निद्रिस्त होतं, त्यावेळी ते कटाक्षानं जागे होतात.

सत्कर्मांच्या संधी येतात. कुठं भगवंताचं गुणगान-भजन असतं, कथाकीर्तन असतं - त्यावेळी बाकीचं अज्ञानी जग देहसुखाच्या त्यांच्या रात्रीनं झोपलेलं असताना, हे आत्मसुखाला सावध असलेले मात्र तो खरा दिवस हे जाणून जागृत राहातात. खऱ्या शाश्वत सुखाची संयमी वाटचाल करीत राहातात. माउली म्हणतात, 'देखे भूतजात निदिले । तेथेचि जया पाहाले । आणि जीव जेथ चेइले । तेथ निद्रितु जो ।'

असे खरे स्थिर बुद्धीचे लोकच स्वतःचंआणि जगाचं कल्याण करू शकतात. आपल्यालाही हे अशक्य नाही. फक्त त्यासाठी ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात, सावधपणे कधी जागं राहायचं आणि कुठल्या वेळी शांत राहायचं, हे आपण ओळखून आचरलं पाहिजे !

***

## १४. अलभ्य लाभ

माणसाला अनेक लाभ आयुष्यात होतात, करून घ्यायचे तो प्रयत्नही करतो. त्यानं ते करावेतही. फक्त काही लाभ हे तात्पुरते असतात. मिळतात आणि ते संपतात किंवा त्याची उपयुक्तता काही वेळा कमी होते. पण काही लाभ मात्र असे असतात की, ते एकदा मिळवले की, कायमचे उपयोगीही पडतात आणि टिकतातही. असा एक खरा निरंतर लाभ म्हणजे 'अखंड टिकणारी शांती' होय.

प्रपंच राहाणार, व्यवहार राहाणार म्हणजे काही गोष्टी कधी मिळणार, कधी आपल्याकडून जाणार, द्याव्या लागणार. यात जसं एक रिकामं घरसुद्धा नसताना ते घर मिळून, त्यात गरजेच्या वस्तू आपल्याला मिळतात, यशं येतात, कर्तृत्वं घडतात, मान मिळतात, तसंच परिस्थिती कधी पालटते, वस्तू जातात, माणसं दुरावतात, सत्ता जातात, इतकंच काय, जवळची माणसंसुद्धा काळ हिरावून नेतो. सामान्य माणसाला या प्रत्येक वेळी, या प्रत्येक येण्या-जाण्यानं आतल्या चित्ताच्या शांतीची अशांती आणि अशांतीची शांती, क्षोभ-अक्षोभ होत असतो. याचा अनुभव लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना आहे.

पण ज्याला ज्ञानेश्वरीसारख्या सद्ग्रंथाचा परिचय असेल, अभ्यास असेल, त्याच्या प्रकाशात आपापली आयुष्यं तपासली असतील, त्यात सांगितलेल्या तत्त्वांचे काही प्रयोग केले असतील - तर असं होणार नाही. एकदम हे सारं साधेल असंही आपल्याला म्हणायचं नाही, पण त्याला दिशा कळलेली असेल, वाट कळलेली असेल, पायरी-पायरीनं, टप्प्याटप्प्यानं तो एकेक पाऊल या दुर्लभ शांतीच्या दिशेनं नक्की पुढं जात राहील. त्या वाटेवर चालणारे असे गाथा-ज्ञानेश्वरीचे अनेक साधक अभ्यासक सोबतीही त्याला मिळतील आणि शेवटी या शांतीचा लाभही होईल.

ही शांती कशी असते, याबद्दल माउली म्हणतात की, महासागर हे आपापल्या ठिकाणी जसे स्थिर, शांत असतात, तशी ही शांती आपल्या अंतरंगातही असू शकते. अनेकदा भरपूर पाऊस पडतो, नद्या दुथडी भरून

वाहत, सागरात अपरंपार पाणी आणून ओततात, अनेकदा अवकाळ पडतो, अवर्षण होतं, आकाशाकडं आशेनं डोळे लावूनही, ढगांतून पाण्याचा थेंब पडत नाही - अशा अवर्षणाच्या काळी मोठमोठ्या नद्यांतलं असलेलं पाणीसुद्धा आटायला सुरुवात होते आणि शेवट तर सागराला मिळताना, अक्षरशः एखादा ओघळ येऊन मिळावा, तितक्या छोट्या पाण्याच्या धारा, त्याच महासागरात येऊन मिळतात.

तरी, महासागरातल्या पाण्याची पातळी तशीच राहाते. ना ती या अतिपाण्यानं वर जात, ना ती या अवर्षणानं खाली येत. ज्ञानेश्वरी म्हणते, 'जरी सरिताओघ समस्त । परिपूर्ण होऊनि मिळत । तरि अधिक नोहे ईषत् । मर्यादा न संडी ।' 'ना तरी ग्रीष्मकाळी सरिता । शोषूनि जाति समस्ता । परि न्यून नव्हे पार्था । समुद्रु जैसा ।' आपल्याला मिळणाऱ्या गोष्टींनी अशी आपली शांती कधी वाढू नये आणि जाणाऱ्या गोष्टींनी - दुःखांनी, मृत्यूंनी - कधी तिला ओहोटी लागू नये - असं जमलं तर, आपल्याला असणारी शांती किती दुर्लभ आणि हवीशी असेल ?

प्रपंच म्हटल्यावर, कामकाज म्हटल्यावर, गोष्टी कमी-जास्त येणार जाणार, जन्म-मृत्यू घडणार, गोष्टी कधी मिळणार कधी हिरावल्या जाणार - हा प्रपंचाचा स्वभाव तसाच राहील. पण ज्याला ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात, आतली शांती कशी निरंतर टिकवावी, हे कळलेलं असेल, त्याला या साऱ्या चढउतारांनी, आत काही फरक पडणार नाही. त्याची शांती अढळ राहील.

हे प्रत्यक्ष अनुभवणारी माणसं नव्हती किंवा नाहीत, असं नाही, हे लक्षात ठेवावं.

मंडालेला लोकमान्यांना ठेवलेल्या कोठडीतल्या अतिउष्ण हवामानामुळं, जीव घाबरा होई. शेवटी अंगावर फोड येऊ लागले. त्यावेळी त्यांनी तुरुंगात फक्त मोकळ्या हवेला ठेवावं, असा अर्ज इंग्रज सरकारला केला. तो अमान्य झाल्याचं उत्तर आलं. अशा दुःखातही, त्यांच्या अंतरंगातल्या शांतीवर परिणाम न होता, ते म्हणाले, 'ठीक आहे. मी कैदेत मरावं, अशीच देवाची इच्छा दिसते आहे !'

आतल्या शांतीमुळं, असं म्हणून, लगेच तशाही स्थितीत, ते आपल्या लेखनाच्या कामाला लागले. हैद्राबादच्या एका सत्पुरुषांचा कर्ता मुलगा तरुणपणी अचानक वारला. त्यावेळी त्यांच्या घरी नेमकं अन्नदान-नामस्मरण

सुरू होतं. ही घटना घडूनही त्यांनी ते तसंच सुरू ठेवलं. याला लागणारी मनःशांती कोणत्या पातळीवरची असेल याची आपण कल्पना करू शकू. अन्नदानाच्या कार्यक्रमानंतर ही दुःखद घटना त्यांनी लोकांना सांगितली. पुढची सारी व्यवस्था झाल्यावर शांतपणे ते लोकांना म्हणाले, 'सोबत थोडा काळ होती. पण चांगली होती !'

निरंतर शांतीचा असा अभ्यास घडावा. ती लाभली की आपलं आयुष्य असं ज्ञानेश्वरीच्या उपदेशाच्या प्रकाशात, असं स्वास्थ्यात जातं !

***

## १५. खरंखरं भाग्य

प्रत्येकाच्या वाट्याला कुठल्या ना कुठल्या प्रकारचा भाग्याचा अनुभव येत असतो. भाग्याच्या कल्पना, माणसागणिक वेगवेगळ्या असू शकतात. कुणाला उत्तम नोकरी, कुणाला चांगला जोडीदार,कुणाला सुखसोयीचं घर, कुणाला चांगली संगत, हे भाग्य वाटतं.

भाग्याच्या कल्पनेमध्ये एक गोष्ट महत्त्वाची असते की, ते त्याच्या कल्पना, प्रयत्नयांच्या पलीकडचं असतं. एक उदाहरण पाहू. एखादा युवक नोकरीच्या गरजेपायी खूप प्रयत्न करतो, कोणतीही नोकरी स्वीकारायला तयार होतो, पण कुठं यश येत नाही, धडपड चालूच असते. एखादे दिवशी संध्याकाळी घरी येत असताना त्याच्या ओळखीचे कुणी गृहस्थ कुणाशी बोलताना त्याला दिसतात.

व्यवहार म्हणून, तो ओळख देतो, थांबतो. ते त्या दुसऱ्या गृहस्थांना, त्यांच्या मुलासाठी, एका उत्तम नोकरीच्या संधीची माहिती सांगत असतात. ते बोलणं याच्या सहज कानावर पडतं. त्यांचं बोलणं संपल्यावर ते गृहस्थ या युवकाशी एकदोन औपचारिक शब्द बोलतात. हा घरी येतो. मनात येतं, या नोकरीची संधी आपल्यालाही घेता येण्यासारखी आहे. तो पटकन अर्ज करून मोकळा होतो. इतकी वर्ष प्रयत्न करूनही न जमलेलं ते काम, अपेक्षेपेक्षाही उत्तम असलेली ही नोकरी मिळून होऊन जातं. साहजिकच त्याला वाटतं की, आपलं हे केवळ भाग्य !

अशी अनेक बाबतीतली भाग्यं अनेकांनी अनुभवली असतील.फक्त हेही अनुभवलं असेल की, त्यात्या वेळी भाग्य वाटलेल्या त्या त्या गोष्टी पुढं नेहमी सुखाच्याच होतात असं नाही. उलट अनेकदा त्या गोष्टी दुःखाच्या ठरल्या तर ते भाग्य वाटत नाही. हाही अनुभव अनेकांना येतो.

मग प्रश्न असा येईल की, आपलं खरोखरचं भाग्य कोणतं ? तर उत्तर हे की, जी गोष्ट अशाच तऱ्हेनं कुणामुळं तरी आपल्याला अचानकपणे मिळाली, तिचा आपल्याला अनपेक्षितपणे आयुष्यभर लाभ झाला आणि तो

आयुष्यभर टिकला. इतकंच नव्हे, तर त्या भाग्यकारक गोष्टीनं मनुष्यजीवनाचं सार्थक करून उद्धरून जाता आलं. असं घडलं, तर ते खरं भाग्य आहेच पण ज्ञानेश्वरीत या भाग्यावर आणखी मोलाचा प्रकाश पडतो.

म्हणजे असं की, अशी आपल्याला आयुष्यभर सोयीची होणारी गोष्ट मिळावी, तिनं उद्धरून जावं, पण त्या भाग्याची आपल्याला जाणीवच नसावी तर, तिचं मोल न कळल्यानं, ते तसं दुर्भाग्यच म्हणावं लागेल. कारण आपल्या या खऱ्या भाग्याची आपल्याला कल्पना आली असती, तर या भाग्याचा आपण याहीपेक्षा कितीतरी पट नक्की चांगला उपयोग करून घेऊ शकलो असतो. म्हणून माउली याकडं लक्ष वेधतात की, खरं म्हणायचं तर खरं भाग्य हे की, आयुष्य कसं जगावं, हे कळणं सर्वांत मोलाचं भाग्य. ते आपल्याला सहज कळणं हे भाग्य आणि त्यातही अशा भाग्याची आपल्याला कल्पना आणून देणारं कुणीतरी वेळेत भेटावं, हे माणसाचं सर्वांत मोठं भाग्य आहे. जीवन कसं जगावं, हे सांगणारी गीता परमात्म्यांनी अर्जुनाला सांगावी, ती आपल्याला आयती ऐकायला मिळावी, हे आपलं खरं भाग्य आहे ! पण त्या भाग्याची कल्पना आपल्याला देणारी ज्ञानेश्वरी आपल्याला आजही ग्रंथरूपानं मिळावी, हे आपलं भाग्य. आता या भाग्याचं महत्त्व आपल्याला कळावं, त्याचा आपण उपयोग करून घ्यावा, हेच आपलं 'खरंखरं भाग्य' ठरेल !

***

## १६. नुकसानीची जबाबदारी

उद्योगधंदा करणाऱ्यांना नुकसानीचा पदोपदी अनुभव येत असतो. नोकरीतसुद्धा आपलं नुकसान झालं, हा अनुभव माणसाला येत असतो. धंद्यात नफानुकसान लगेच कळतं. ते स्पष्टही असतं. साहजिकच असं नुकसान कुठेही होवो, त्याचा विचार माणसाला करावाच लागतो. नुकसान का झालं, कुणामुळं झालं, ते कसं टाळता येईल-याचे विचारही वेळीच करावे लागतात. तर निदान पुढचं नुकसान तरी टाळता येतं.

यात जी काही चर्चा होते, तिच्यात साधारणतः अशी नुकसानं कुणामुळं तरी होत असतात-असा चर्चेत सारांश निघतो. अर्थातच, कुठल्या नुकसानीला कोण जबाबदार, तेही आपापल्या परीनं जो तो ठरवीत असतो. हवामान, माणसं, सरकार, नियम, स्पर्धक-अशा असंख्य लोकांवर ही नुकसानीची जबाबदारी टाकली जाते.

यात आपल्याला क्वचितच असं आढळेल की, ही नुकसानीची जबाबदारी स्वतःची आहे, असं सहसा कुणाला वाटत नाही. उलट हे इतर घटक त्याला कसे जबाबदार आहेत, हे तर पटवून दिलं जातंच पण तसे वेगवेगळे अहवाल, रिपोर्टस्ही कसे तयार होतात, हे आपण पाहिलं असेल.

ज्ञानेश्वर माउलींचं म्हणणं असं की, हे जरी सारं असं घडताना दिसलं, तरी खऱ्या नुकसानीची जबाबदारी वस्तुतः आपलीच असते. ती लक्षात घेऊन सुधारणा केली, तर आपलं नुकसान टळेल. नाहीतर व्यवहार तर सोडाच, आपल्या आयुष्याचंसुद्धा नुकसान होईल, अकल्याण होईल.

माउली म्हणतात, एखाद्याच्या मोठ्या सत्कर्माच्या पारण्याच्या दिवशी आपल्याला काही कल्पना नसताना आपण त्या माणसाकडं प्रसादाच्या वेळेला, ऐन दुपारी पाहुणे म्हणून पोचावं आणि थेट काही न करताच प्रसादाचा लाभ व्हावा, तोही भगवंताच्या उपस्थितीत व्हावा, अशावेळी आपण जे पोचलो, ते भाग्यानं हे खरंच. 'तैसे अम्हा तुम्हा जाहले । जे आडमुठी तत्त्व फावले ।'. तसं आपलं सारं मनुष्यजीवन, कर्तव्य करून, भगवंताच्या स्मरणात कसं सार्थकी

लावावं, ही विद्या उलगडून दाखवणारा ग्रंथ, स्वतः भगवंतानं उलगडून सांगावा, हे आपल्याला अवचित मिळालेलं भाग्य आहे. साधना अर्जुनानं केली, कृपा भगवंतानं केली आणि तो कृपाप्रसाद घ्यायला, आपण तसे काही न करताच, अर्जुनाबरोबर प्रसादाला मात्र हजर झालो.

पण अशाही वेळेला, संजय, माउली, त्यांचे श्रोते - हे सारे भाग्याच्या आनंदात न्हाऊन निघत असताना एक धृतराष्ट्र मात्र 'हे मी तुला विचारलं नाही, हे तू मला काय सांगतो आहेस. माझे पुत्र युद्ध कसं करत आहेत, ते जिंकले की नाही हे सांग', असं म्हणून एवढ्या मोठ्या लाभाला पारखा झाला. असा जीवनग्रंथ ऐकायला मिळून उद्धरून जाण्याच्या भाग्याला अंतरण्यासारखं आयुष्यातलं मोठं नुकसान नाही. पण त्याची धृतराष्ट्राला कल्पना नाही. शिवाय त्याची जबाबदारीही तो संजयावर टाकतो. म्हणून ज्ञानेश्वरी म्हणते, इतक्या अगणित लोकांचा फायदा होत असताना धृतराष्ट्राच्या नुकसानीची जबाबदारी मात्र, तो संजयावर टाकतो. खरंतर तशी प्रत्येक नुकसानीची अंतिम जबाबदारी आपलीच असते. ते ओळखून संजयसुद्धा म्हणतो, 'म्हातारा मोहे नाशिला'. आपल्या आयुष्यात नुकसानीची जबाबदारी अशी कुणावर टाकू नये. ती आपण घ्यावी, तिची कारणं शेवटी आपल्यातच असतात. ती ओळखावी, दूर करावी. आपला लाभ साधावा. निदान आपल्या नुकसानीची खरी जबाबदारी आपलीच असते, एवढं ओळखलं तरी, ज्ञानेश्वरीचा आपल्याला आयुष्यात पदोपदी उपयोग होईल !

***

## १७. पत द्यावी, पण कशाला द्यावी ?

माणसांचा व्यवहार कळत नकळत काही विचारांवर चालतो. समोरचं माणूस लहान मूल आहे, बरोबरीचा आहे की, वयोवृद्ध आहे, त्याप्रमाणं माणूस त्याच्याशी नकळत बोलतो-चालतो. माणसाची बुद्धिमत्ता, त्यामुळं त्याला मिळालेलं यश, स्थान, कर्तृत्व, सत्ता-अशा अनेक गोष्टी माणसांच्या एकमेकांशी वागण्यावर कळत-नकळत परिणाम करतात. बुद्धिमत्तेनं, कर्तृत्वानं-मोठ्या असलेल्या, पण वयानं लहान असलेल्या माणसाशी एखादा प्रौढ-वयस्कर माणूससुद्धा अदबीनं, आदरानं वागतो.

या वागण्याचा सारांश म्हणजे, त्यात्या गावी असलेली त्याची पत. अशी वेगवेगळी पत असलेला माणूस इतरांना मदत करू शकतो. त्याला मदत मिळतेही. विशेषतः आर्थिकदृष्ट्या, माणसाची अशी अनेक बाजूंनी पत विचारात घेऊन,त्याला उधार दिलं जातं. जास्त कर्ज मिळू शकतं. त्याची पत मोठी असल्यामुळं त्याला या आर्थिक जगतात मोठा मानही असतो.

श्री ज्ञानेश्वर माउलींनीही अशा पत असलेल्या माणसांचा विचार केला आहे. तो आपल्यासारख्या या विचारांना, एक वेगळी विधायक जाग देणारा, आपल्याला विचार करायला लावणारा आहे. पत म्हणजे त्यात्या गावी, त्यात्या क्षेत्रात माणसाला असलेली प्रतिष्ठा, दिला जाणारा मान. फक्त यात त्यांनी एक विचार करायला सुचवलं आहे. ते म्हणतात की, कुठल्या क्षेत्रात कुणाला पत असते आणि ती का असते, ती द्यावी पण कशाला द्यावी, याचा थोडा अधिक विचार करावा. नाट्याच्या क्षेत्रात, उत्तम भूमिका वठवणाऱ्याला पत असते. गाणाऱ्यांच्या गावी उत्तम गायकाला पत असते, मान असतो. माणसाच्या आयुष्याला अधिकाधिक समृद्ध करणाऱ्या म्हणजे, त्याअर्थानं माणसाला त्याचे लोभ, मोह, विकार अशा गोष्टी विसरायला लावून, त्यांचं महत्त्व कमी करून, त्याला दैवी जीवनाचा अनुभव देणाऱ्या अशा अनेक कलांच्या, उद्योगांच्या क्षेत्रामधली पत किंवा मान हा एक प्रकार झाला. त्यानं संयम, त्याग, आदर असे दैवी गुण वाढत असल्यामुळं त्यांना पत द्यावी. त्यात समाजाचंही भलं होतं

आणि व्यक्तीही उन्नत होते. देवाच्या गावीही या गोष्टींना मान आहे, पत आहे. पण ज्ञानेश्वरी लक्ष वेधते त्या दुसऱ्या प्रकाराचाही विचार करावा.

कारण, पत असण्याला दुसरी बाजूही असते. तुरुंगातसुद्धा मोठमोठे गुन्हे करून आलेल्यांना, किरकोळ गुन्हेगारी करून आलेल्यांच्या दृष्टीनं-पत असते. मान असतो. गल्लीत दहशत माजवणाऱ्यांच्या दृष्टीनं, जगात दहशत माजवणाऱ्यांना अर्थातच मोठा मान असतो. माउली विचारतात की, असल्या या पत असण्याला काही किंमत नाही, हे जर आपण ओळखलं नाही, तर त्याला पत देऊन त्या मार्गानं जाणारे लोक वाढतात. त्यामुळं समाजाचं स्वास्थ्य जातं, हे आपण कधी ओळखणार ? पैसापैसा करायला लावणारे मोह, मृत्युपंथाला लावणारी व्यसनं, सायलेंट किलर असलेल्या रोगांना आमंत्रण देणारे अतिताणाचे उद्योग-अशा गोष्टींना, माउली म्हणतात, दानवांच्या आणि मृत्यूंच्या गावीसुद्धा मोठी पत आहे ! माणसाचं सरळमार्गी सुखाचं जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या काम-क्रोध-लोभ यांनासुद्धा, ते मृत्यूला गिऱ्हाईकं पाठवतात म्हणून, पत आहे ! पण विवेकी माणसांनी ही पत मानू नये. 'हे जीविताचे वैरी' समजून, असल्या अस्वास्थ्य देणाऱ्या लोभ-मोहासारख्या मानवतेच्या शत्रूंची किंवा त्यांना साथ देणाऱ्यांची-ही घातक पत ओळखावी आणि दैवी गुणांना पत द्यावी, ते मिळवण्याची कास धरावी, हा माउलींचा सल्ला आपल्याच कल्याणाचा आहे !

***

## १८. कर्तृत्वाची खरी ओळख

आपल्या मोलाच्या मर्यादित आयुष्याचं उत्तम चीज व्हावं,असं कुणालाही वाटेल. जरूर वाटावंही. त्यासाठी जशी वडीलधाऱ्यांची, जाणकारांची मदत घ्यावी, तशी ज्ञानेश्वरीची मदत आपल्याला, आपल्या दैनंदिन व्यवहारातल्या प्रश्नांच्या बाबतीत होऊ शकते का, हे पाहाण्याचा, हा एक नम्र प्रयत्न आपण करूया.

या ग्रंथावर आजवर इतक्या अंगानी इतकं लिहिलं गेलं आहे, तितकं दुसऱ्या कुठल्या ग्रंथावर क्वचितच लिहिलं गेलं असेल, असं म्हटलं तर वावगं होणार नाही. हा अनमोल, अलौकिक ग्रंथ म्हणजे श्री ज्ञानेश्वरी. तिच्यातून आपल्या आजच्या आयुष्यातल्या प्रश्नांवर पडणारा प्रकाश आपण पाहातो आहोत, त्यातलाच एक प्रश्न कर्तृत्वाचा !

हा प्रश्न जास्त जिव्हाळ्याचा आहे. कारण तो क्षणोक्षणीचा आहे. त्यातून इतरही प्रश्न निर्माण होतात. आपली असंख्य कर्मं, त्यांचं कर्तृत्व, त्याकडं बघण्याची आपली दृष्टी, त्यामुळं निर्माण होणारे आणि स्वास्थ्य बिघडवणारे काही प्रश्न या मूळ कर्म आणि कर्तृत्वाशी निगडीत असतात.

परीक्षेच्या गुणपत्रकावर ज्या विद्यार्थ्याचं नाव असतं, ते कर्तृत्व त्याचं समजलं जातं. पुस्तकाच्या बाबतीत लेखकाचं, गायनाच्या बाबतीत गाणाऱ्याचं, घराच्या बाबतीत मालकाचं - अशी कर्तृत्वं आपण सहजपणे गृहीत धरतो. काही महत्त्वाचे व्यावहारिक कष्ट, त्यासाठी त्यावरचं त्याचं त्याचं नाव - ही वस्तुस्थिती आहे खरी. पण तिच्यावर असा ज्ञानेश्वरीसारख्या अलौकिक ग्रंथाचा प्रकाश पडला नसला तर, आज घरोघरी काय अनुभव येतो ? तर, विद्यार्थ्याला मिळालेले गुण, त्याला त्याचं कर्तृत्व वाटतं. त्यामुळं नकळत त्याचा अहंकार - संधीच्या, प्रगतीच्या अपेक्षा, तुलनेनं इतरांपेक्षा श्रेष्ठत्व, मग अपेक्षाभंग, निराशा, त्यातून कटुता. तेच घराचं. घर माझं कर्तृत्व म्हटलं की, ते कसं ठेवावं, त्यात कुणी-किती-कसं राहावं-वागावं, ते न झाल्यास राग, त्रास हे सारं घडतं. कर्तृत्वाची खरी आणि रास्त ओळख नसल्यामुळं हे घडतं, नाही का? गुण

मिळवणाऱ्याला मूळ विद्या, ती शोधणारे, ती शिकवणारे शिक्षक-पालक असे जसे कर्तृत्वाचे अनेक आधार असतात, तसंच ते - घर आणि त्यासारख्या इतर असंख्य बाबतींत खरं असतं. हे लक्षात घेतलं तर, नुसतं शब्दानंच नव्हे तर, मनापासून आपण ते मानू शकू आणि पुढचा सारा त्रासाचा प्रवास आपण टाळू शकू.

ही दृष्टी ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात आपल्याला मिळते. वास्तविक ज्ञानेश्वरीसारखा अमोल ग्रंथ. कर्तृत्व श्री माउलींचं. पण त्यांचं मनापासूनचं, स्पष्ट म्हणणं काय तर, 'किंबहुना तुमचे केले । धर्मकीर्तन हे सिद्धी गेले । येथे माझे जी उरले । पाईकपण !' म्हणजे, ते म्हणतात की, माझं कर्तृत्व हे सेवकासारखं आहे. ते स्वतःकडं घेणं तर सोडाच पण ज्या गुरूंच्या कृपेमुळं आणि ऐकणाऱ्या सज्जनांच्या श्रवण करण्याच्या इच्छेमुळं - हा ग्रंथ आकाराला आला त्यांचं ते कर्तृत्व आहे. त्यावर पुढं जाऊन उलट माउली म्हणतात, 'गीता ही निष्कपट माय ! मी प्रपंचात चुकून हिंडणारं लेकरू. तुमच्यामुळं आम्हा मायलेकरांची गाठ पडली, म्हणून ग्रंथाचंच काय, त्यामुळं झालेल्या या मायभेटीचं कर्तृत्वसुद्धा माझं नव्हे, गुरूंचं, तुम्हा श्रोत्यांचं! मी निमित्तमात्रझालो. उलट तुम्हामुळं मला हा ग्रंथसोहळा पाहायला मिळाला !'वाचकहो, एवढ्या महान ग्रंथाच्या कर्त्याची त्या कर्तृत्वाकडं पाहाण्याची ही वस्तुनिष्ठ, व्यापक दृष्टी कळली आणि तिच्या प्रकाशात आपल्या आयुष्यातली आधी म्हटली तशी कर्तृत्वं पाहाता आली तर!

***

## १९. सावधान लोकांची एक बेफिकीरी

आपण व्यवहारात सावध असणं आवश्यक असतं. तशी सावधानता अनेक बाबतीत लागते. तब्येत, खाणंपिणं, उत्तम शिक्षणं, नोकरीची निवड, व्यवसायाची निवड, उत्पन्नांची काळजी घेणं-अशा अनेक बाबतीत माणूस सावध असतो. त्यासाठी तो आवश्यक त्या तरतुदीही करतो.

श्री ज्ञानेश्वर माउलींना एवढ्या सावधान असलेल्या माणसांच्या ठिकाणी असलेली एक मोठी बेफिकीर आश्चर्यकारक वाटते आणि तितकंच त्यामुळं होणारं नुकसान पाहून, त्याबद्दल कळवळाही वाटतो. एक घटना पाहू. श्री गोंदवलेकर महाराजांच्याकडं लहानपणापासून येत असलेल्या मुलाचा विवाह झाला. ते उभयता महाराजांकडं नमस्कार करायला आले. गप्पांच्या ओघात तो म्हणाला, 'माझ्या प्रपंचाची जबाबदारी आता आणखीच वाढली. त्यामुळं आता मी एक मोठा विमाही उतरवला आहे'. महाराज म्हणाले, 'अरे, लहान वयात एवढा खर्च कशाला अंगावर घेतलास ?' त्यावर तो उत्तरला, 'माणसाच्या आयुष्याचा काही भरवसा नाही. त्यामुळं ही काळजी वेळेतच मी घेतली, हे बरोबर झालं ना ?' महाराज उत्तरले, 'वा! तू तर खूप दूरदर्शी आहेस, असं मी म्हणेन. माणसाच्या आयुष्याची निश्चिती नाही, हे खरंच. त्यामुळं तू घेतलेली काळजी मला योग्यच वाटते. आयुष्य क्षणभंगुर आहे, ही जाणीव असणं, ही मोठीच सद्‌बुद्धी आहे. मृत्युलोकात निश्चिंत राहाणं म्हणजे बेफिकीरीच आहे. आता हे तुझ्या लक्षात आलं आहेच, तर अगदी आजपासूनच हे लक्षात ठेवून तू रोज नित्यनेमानं देवाचं नामस्मरण करीत जा'. त्यावर तो तरुण लगेच उत्तरला, 'ते काय म्हातारपणी करता येईल ! आत्तापासूनचा वेळ त्यात उगाच कशाला वाया घालवायचा ?'

महाराज म्हणाले, 'तुझी सावधगिरी मोठी विलक्षण दिसते !'

याच एका विलक्षण पण विचित्र सावधगिरीबद्दल तळमळीनं सांगताना ज्ञानेश्वरीत म्हटलं आहे की, एका बाजूला दर दिवशी माणूस मोठा होत जातो आहे. प्रपंचासाठी पैपै जोडतो आहे. तो प्रपंच टिकणार आहे, याची खात्री

म्हणूनच ना ! ते त्यानं अवश्य करावं. पण अनुभव पाहाता, हे जगच मुळात अशाश्वत आहे. त्यामुळं जसं सावधान राहून इतर बाबतीत मनुष्य काळजी घेतो, तसं या अनित्यतेचं, अशाश्वतपणाचं, कोणत्याही क्षणी दत्त म्हणून उभ्या राहणाऱ्या मृत्यूचं सावधानपण त्याला का बरं येत नाही ? या अनित्यतेतून साक्षात जग निर्माण करणारा ब्रह्माही सुटला नाही. ते म्हणतात, 'जेथीचिये अनित्यतेचि थोरी । करितया ब्रह्मयाचे आयुष्य वेरी । कैसे नाही होणे अवधारी। निपटुनिया ।। ऐसी लोकीची जिये नांदणूक। तेथ जन्मले आथि जे लोक । तयांचिये निश्चिंतीचे कौतुक । दिसत असे !।।'

वास्तविक, मनुष्य जन्माला आला तिथंच त्याची मृत्यूची वाटचाल सुरू झाली. त्याला जगण्याची, त्याचं चीज करण्याची मिळणारी संधी, उलट एकेक दिवसानं कमी होत चालली आहे. माउली म्हणतात तसा उलट, तो स्वतः मोठा होत जातो, असं समजतो आणि अधिकाधिक निश्चिंत होत जातो. म्हणून ते त्याला या विचित्र सावधानतेतून जागं करून म्हणतात की, इतर गोष्टींना वेळ देतोस, तसा भक्तीलाही काही वेळ दे, तिच्याबद्दलही सावध हो. कारण एकवेळ बाकीच्या गोष्टी तुला किती उपयोगी पडतील कुणास ठाऊक, पण भक्तीनं मिळणारा भगवंत मात्र तुझा खऱ्या अर्थानं शेवटपर्यंत सोबती आहे. म्हणून अशी बेसावध बेफिकीरी टाळून, माउलींचं हे सांगणं लक्षात घेऊन, रोजचा काही वेळ,देवभक्तीसाठी दिला तर,ती खरी सावधता होईल. चित्ताला शांती राहील आणि ती अखेरपर्यंत टिकेलही !

***

## २०. खऱ्या ज्ञानाची ओळख

जगात पाहण्याचं सामर्थ्य जवळजवळ सर्वांना आहे. पण म्हणून प्रत्येकाला दिसतंच आहे किंवा जे दिसायला पाहिजे, जे कळायला पाहिजे, ते कळतंच आहे, असं म्हणणं मात्र धाडसाचं होईल. सर्वांना त्या अर्थानं ज्ञान आहे, असं म्हणणंही अर्थातच अधिकच धाडसाचं होईल.

जर असं असतं तर जगात भेदभाव, पिळवणूक, वेगवेगळ्या नावाखाली श्रेष्ठकनिष्ठता, अत्याचार, एका बाजूला अन्नान्न करणारे लोक आणि दुसऱ्या बाजूला रोजच्या रोज नुसतं पानात टाकणारेच नव्हेत, तर पानात टाकणं प्रतिष्ठेचं मानणारे लोक आणि रोजच्या रोज जगभर असंख्य हॉटेल्समधून शिळं होऊन फेकून दिलं जाणारं अन्न दिसलं नसतं ! चारचार मैलांवरून पत्र्याच्या डब्यांतून, बांबूची कावड करून, खांद्यावरून पाणी वाहून आणणाऱ्यांचा घाम गळताना दिसला नसता आणि दुसऱ्या बाजूला उघड्या राहिलेल्या नळातून, जलवाहिन्यांतून बेपर्वाईनं वाहून वाया जाणारं पाणी दिसल नसतं ! एका बाजूला चिंध्या हुडकून कपड्यांचे तुकडे जोडून नेसायला आणि पांघरायला वस्त्र भागवणारं जग दिसलं नसतं आणि दुसऱ्या बाजूला उंची, महागड्या वस्त्रांचे कपाटातून लागलेले ढीगही दिसले नसते - ज्यातलं बरचसं नेसणंपांघरणंही त्यात्या माणसांना वर्षावर्षात जमत नाही!

याचा अर्थ, म्हटलं तर, माणसाला दिसतं आहे, पण त्या दिसण्याची दखल घेणारी आतली जी माणुसकीची-वृत्तीची यंत्रणा आहे, ती मात्र कुठंतरी अंधारात आहे. म्हणून ज्ञानाचं, त्यातही सर्वांना समान मानून आपला व्यवहार करणाऱ्या आत्मज्ञानाचं, मोल अपार आहे. त्या अर्थानं माणसाला दिसायला लागलं, तरच त्याचं खरं अज्ञान दूर झालं - असं म्हणता येईल, नाही का ?

जवळच्या माणसाचं अंतरंग, त्याची सुखदुःख दिसणं - हे खरं दिसणं असं म्हणावं लागेल आणि त्याच माणसांना खरं ज्ञान झालं, असं म्हणावं लागेल ना !

तामिळनाडूमध्ये एक साधू राहात. त्यांची एक छोटीशी खोली होती.

एकदा बाहेर वादळी पाऊस सुरू झाला. रात्रीची वेळ होती. हे साधू त्यावेळी झोपलेले होते. तरीही त्यात कुणीतरी त्यांचा दरवाजा ठोठावला. ते उठले. त्यांनी दार उघडलं. समोर पाहिलं तर, तो माणूस त्या जोरदार पावसात निथळत कुडकुडत उभा होता. त्यानं निवाऱ्यासाठी हात जोडले होते. काकडत तो काही सांगण्याच्या आतच ते दारातून आत आले आणि त्याला आत बोलावलं. साधूची खोली खरंतर इतकी लहान होती की, त्यात रात्रीच्या आसऱ्याला ते दोघं झोपू शकले नसतेच. हे त्या आत आलेल्या प्रवाशाच्याही लक्षात आलं. त्याला संकोच वाटला. यांनी यांच्याकडं असलेलं वस्त्र त्याला बदलायला दिलं. म्हणाले, 'आपण दोघं झोपू शकणार नाही. पण खोली बंद केली तर, उबेत निदान निवाऱ्याला रात्रभर बसू तरी शकतो ! तू काळजी करू नकोस'. तासाभरानं पुन्हा दरवाजा ठोठावला गेला. आतल्या प्रवाशानं साधूकडं बघितलं. साधूनं उठून दरवाजा पुन्हा उघडला. त्यांच्याहीपेक्षा काकडलेला माणूस बाहेर हात जोडून उभा होता. आत डोकावताच त्याच्या सर्व परिस्थिती लक्षात आली. साधूनं उरलेलं दुसरं वस्त्र त्याला दिलं. दोघंही प्रवासी थंडीवाऱ्यातून वाचले होते. पण संकोचलेही होते. त्यांना धीर देत साधू म्हणाला, 'खोली लहान आहे, मी एकटा झोपतो, अडचणीला आपण दोघे बसू शकलो असतो पण तुम्ही काळजी करू नका, अडचणीला आपण तिघे रात्रभर, उभे तरी नक्की राहू शकतो !'

ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात जे ज्ञान दिसतं, मिळतं, अमलात आणून परस्परांचं जीवन सुसह्य करता येतं, ते अमोल ज्ञान हेच होय !

***

## २१. ज्ञानांतला फरक

ज्ञानेश्वरीत गीतेतला मूळ भावार्थ अधिकाधिक सोपा करून, तो कुणाही सामान्य माणसाला कळून, त्याला त्याचा उपयोग करून घेता यावा, यासाठी ज्ञानेश्वर महाराजांनी घेतलेले अपार कष्ट 'येतो कळवळा म्हणउनिया' या करुणेच्या भूमिकेवरून घेतलेले आहेत. गीतेतल्या त्या सातशे श्लोकांवर नऊ हजार ओव्या सांगतानाची त्यांची तळमळ आपणच ओळखून घ्यावी !

आपलं प्रपंचातलं कर्तव्य म्हणून म्हणा किंवा मुलाबाळांची ममता म्हणून म्हणा, वेळोवेळी त्यांचा खेळ, शिक्षण, व्यायाम, वागणं-अशा असंख्य गोष्टींत आपण तासन्‌तास किती सांगण्याचा प्रयत्न करीत असतो. पण आपले हे सारे कष्ट आणि ज्ञानेश्वर माउलींचे हे माणसाचं अज्ञान दूर करण्यासाठी घेतले जाणारे कष्ट, या दोन कष्टांमध्ये केवढा फरक आहे !

आपण कष्ट घेतले नाहीत, तर आपल्या जवळच्याचं भविष्यात नुकसान होण्याची शक्यता आपल्याला दिसते. म्हणून कष्टांची पर्वा न करता सामान्य मनुष्य कष्ट करतो. त्याचबरोबर आपण हेही ओळखू शकतो की, हे करताना, आपला नकळत एक स्वार्थ असतो. तीती गोष्ट आपल्या मुलाबाळांना कळली नाही, ती तशी वागली नाहीत, तर त्यांच्याबरोबरच त्याची झळ आपल्यालाही लागणार असते, नुकसान सोसावं लागणार असतं. यात प्रपंच म्हणून काही चुकीचं आहे, असं नाही.

फक्त त्याचा विचार एवढ्यासाठीच करायचा की, ते सदैव टिकणारा आनंद आधीच मिळवून बसलेले आहेत. त्यांनी हे सांगितलं नाही तरी, त्या अर्थानं त्यांना काहीही फरक पडत नाही. असं असताना त्यांचं आयुष्य हे सारं समजावून देण्यासाठी ज्यावेळेला ते खर्ची घालतात, त्यावेळेला त्याचं निदान मोल तरी आपल्याला कळावं. आपल्या प्रपंचाचं कल्याण जरूर व्हावं, पण त्याचबरोबर, ईश्वरी ज्ञानाचा अनुभव येऊन, आपण खरं समाधान मिळवून जावं, यासाठी त्यांना वाटणारी तळमळ आणि आपली प्रपंचासाठी चाललेली तळमळ - यांतला जमीनअस्मानाचा फरक तरी, आपल्याला कळावा आणि

मग तेवढ्या आस्थेनं आपण त्यांचं म्हणणं समजून घ्यावं !

माउलींना सामान्य प्रापंचिकाला कळणाऱ्या या ज्ञानाची माहिती नाही, असं नाही. पण त्याच्या मर्यादा आणि धोका ते ओळखून आहेत. त्यांना माहिती आहे की, ज्याला सामान्य मनुष्य ज्ञान समजतो, ते म्हणजे फक्त अहंकारानं स्वार्थ पुरा करण्याच्या युक्त्या आहेत ! एका मर्यादेपर्यंत त्याची गरज आहे. मात्र पुढं त्यात त्याच मार्गानं गेलं आणि खऱ्या ज्ञानाची ओळख करून घेतली नाही, तर आपल्याबरोबर इतरांचंही नुकसान, असं स्वार्थी आणि संयमरहित जीवन करीत जातं, ईश्वरी आनंद दूर राहातो.

आपल्याला माहीतच आहे, देव एका दाण्याचे शंभर दाणे करून उगवून देतो. म्हणून एका हुशार शेतकऱ्यानं देवाला प्रार्थना केली की, नाहीतरी तू एका दाण्याचे शंभर करून देतोसच, तर एवढे कष्ट घेण्यापेक्षा तू मला दरवेळी नुसते नव्याण्णव दाणे देत जाईनास, म्हणजे माझा एक दाणा देण्याचे आणि तो उगवून आणण्याचे कष्ट वाचतील ! प्रापंचिक शहाजोगपणाचा घोडा असा उधळतो. स्वार्थी इंद्रियांना अधिक बळकट करतो.

म्हणून माउली म्हणतात, 'ऐसे बळकटपण आहे । इंद्रियांचे ।' त्यांना ओलांडलं तर, खऱ्या ज्ञानाच्या प्रकाशात शाश्वत आनंदाकडं आपली वाटचाल घडेल !

***

## २२. खऱ्या सुखाचा मार्ग

आज ज्ञानाचा मोठा प्रसार झाला आहे. विविध शाखा, विविध विषय, विषयांचे तज्ज्ञ आहेत. पण संतोष, शांती, समजूत यांचा सुकाळ काही या ज्ञानामुळं झाला नाही. उलट या ज्ञानानं मनुष्य अधिकाधिक लोभाकडं, संचयाकडं, स्वतःपुरतं पाहण्याकडं - प्रवास का करतो आहे, याचा विचार आपणच नको का करायला ?

देहाची सुखं अपरिमित वाढली, ती देणारी साधनं वाढली की, माउली म्हणतात त्याप्रमाणं, मनुष्य कर्मं करीत राहातो, कोट्याधीश होतो आणि यात कर्मं खूप दिसतात, पण खरं सुख देणारा 'कर्मयोग' मात्र हरवून जातो. कर्मांचं माणसाला कौतुक वाटतं-स्वतःच्याही आणि अशा पळत राहणाऱ्या इतरांचंही ! पण त्या कर्मांची मनुष्यमात्राशी-माणुसकीशी सांगड घालणारा 'योग' लोपतो, याकडं जे दुर्लक्ष होतं, त्यामुळं मनुष्य स्वतःच्याच आयुष्यात न संपणाऱ्या लोभाला-क्षोभाला नकळत बळी पडत जातो आणि सामाजिक प्रश्न - संघर्ष - अस्वास्थ्य - विषमताही निर्माण करतो. माउली म्हणतात, यात आत्मबोधाचा, आपल्या स्वतःच्या खऱ्या स्वरूपाच्या ओळखीचा, त्याच्या ज्ञानाचा, त्यासाठी करायच्या कर्मांचा, त्यासाठी अमलात आणायच्या दैवी गुणांचा विसर पडत जातो. माणूस 'जे प्राणिया कामी भरू । देहाचि वरी आदरु । म्हणोनि पडिला विसरु । आत्मबोधाचा ।। आव्हाटलिया आस्थाबुद्धी । विषयसुखचि परमावधि। जीवु तैसा उपाधि । आवडे लोका।।' असं एकदा व्हायला लागलं की, मिळवताना कुठं थांबावं कळत नाही, पैसा जोडताना किती मिळवावा कळत नाही, देहाचे चोचले पुरवताना कुठं मर्यादा घालावी, ते कळत नाही. अशा ऐहिक गोष्टी अधिकाधिक देणारं जे ज्ञान, तेच ज्ञान अशी समजूत होऊन बसते आणि त्या अर्थानं सगळा अज्ञानाच्या अंधकाराचा मामला होऊन बसतो. मग त्या अंधकारात चार प्लॉट घेणाऱ्यांपेक्षा दहा घेणारा मोठा ठरतो, चार बंगल्यांना दोन फार्म हाउस जोडणारा मोठा ठरतो, देशाबरोबर विदेशात पैसा साठवणारा आदर्श होऊन बसतो. यात पुन्हा साहजिकच, अनुकरणाच्या प्रवृत्तीमुळं

इतरांनाही अशा प्रापंचिक ज्ञानाची, पैसा देणाऱ्या तंत्रांची किंमत अधिक वाटायला लागते. वास्तविक, असं ज्ञान शेवटी अस्वास्थ्यात नेतं.

संचय आणि असंयम यांच्या अंधारात आत्मज्ञानाचा प्रकाश देणारा सूर्य असतो, पण त्याची अवस्था माउली म्हणतात त्याप्रमाणं, 'सांगे जात्यंधा रवी काय आथी ।' मग माउलींसारखे, तुकोबांसारखे संतसज्जन आकाराला आणून, 'मी अविवेकाची काजळी । फेडुनि विवेकदीप उजळी।' असं कार्य देवाला करावं लागतं. संत ते कसं करतात, ते पाहू.

थोर वारकरी मामासाहेब एका गावी कीर्तनाला गेले होते. ज्यांच्याकडं उतरण्याची व्यवस्था होती, ते व्यापारी प्रापंचिक कौतुकानं सांगत होते, 'गावात आलो तेव्हा पाय ठेवायला जागा नव्हती. आज या गावातल्या मोठ्या चौकातली तीनही घरं माझी झाली आहेत. चौथ्यातला भाडेकरू हालत नाही म्हणून फक्त राहिलं आहे. पाहू आता पांडुरंगाच्या कृपेनं चौथंही आपलं होईल, असं वाटतं !' मामा त्यांना जाणीव देताना समजुतीच्या स्वरात म्हणाले, 'आधीच एका घराची गरज असताना तुम्ही तीन घेतली आहेत. आता तरी निदान ते चौथं घर दुसऱ्या कुणाला राहू दे. शेवटी तुम्ही राहणार एकाच घरात आणि लक्षात ठेवा, जाणारही एकाच घरातून !'

माउलींसारखे संत लोकांच्या ठिकाणचा विवेक असा जागा करतात आणि त्यांना खऱ्या सुखाच्या मार्गावर आणून सोडतात !

***

## २३. खरा प्रश्न अज्ञानाचा

मुळात ज्ञानेश्वरीत खरा प्रश्न पडला आहे, तो अर्जुन आपल्या कर्तव्याला प्रवृत्त कसा होईल, याचा. तो अजिंक्य आहे. त्याच्यामागं शौर्याचा इतिहास आहे. आत्ताही तो युद्धालाच आलेला आहे. ते अपरिहार्य आहे, याची त्याला पूर्ण जाणीव आहे. ते जिंकण्याची क्षमताही त्याच्याकडं आहे. असं असतानाही ममतेच्या, भ्रमाच्या, लोभाच्या पाशात अडकून तो, मी हे युद्ध करणार नाही, असं म्हणतो आहे. इथंपर्यंत हा प्रश्न असता तर, तो फक्त युद्धापुरताच मर्यादित राहिला असता. पण तो ज्या कारणांनी युद्ध करणार नाही म्हणतो, शिवाय त्याचं समर्थन करतो, त्यासाठी केवढा तरी बिनतोड युक्तिवाद करतो- ते मात्र सारं विचार करायला लावणारं झालं. त्यामुळं हा प्रश्न केवळ तिथल्या एखाद्या युद्ध करण्या-न करण्याचा न उरता, मनुष्याला त्याचं कर्तव्य करताना काय आड येतं आणि त्यामुळं मनुष्याच्या उद्धाराला आणि त्याच्याशी निगडीत समाजाच्या स्वास्थ्याला काय आड येतं- हे हुडकून काढण्याचा तो प्रश्न झाला आहे, तो सार्वत्रिक आहे. तो अज्ञान, प्रपंचज्ञान, कर्तव्याचं ज्ञान आणि आत्मज्ञान यांचा प्रश्न झाला आहे.

कर्तव्याची क्षमता असताना, उगाचच नीती-अनीती, यशापयश-अशा बौद्धिक चर्चा करून, आजही वेगवेगळ्या ठिकाणी मूळ प्रश्न टाळले जातात. परीक्षेचं कर्तव्य टाळून गॅप घेणं, लोभापायी नोकऱ्या बदलीत सुटणं, आहारविहाराचा संयम सोडणं आणि या साऱ्यांचं समर्थनही करणं - हे घडतं तेव्हा हा प्रश्न असा सर्व काळातला का आहे, हे लक्षात येतं. त्यात सर्वांत मोठं जर कारण काही असेल, तर ते खऱ्या ज्ञानाचा अभाव म्हणजेच अज्ञान.

ज्ञानेश्वर माउलींनी आधी खऱ्या ज्ञानाचा जो प्रकाश आणायला हवा त्याचा आणि वेगवेगळे वेष घेऊन व्यक्त होणारं अज्ञान कसं नाहीसं होईल याचा - विचार करायला हवा, असं म्हटलं आहे. म्हणून युद्धाला आपण सज्ज आहोतच. त्याचा विचार काही काळ बाजूला ठेवू. ती युद्धाची गजबजही विसरून जाऊ. पण त्याआधी 'तरी नावेक हे सहावे । गाजाबज्यही न धरावे

।परि तुझे अज्ञानत्व हरावे । लागे आधी ।।' असं म्हणून खऱ्या ज्ञानाची आणि या अज्ञानाची मोठी उपयुक्त चर्चा केली आहे. अज्ञानाची व्याप्ती मोठी आहे, म्हणून त्यांतल्या एकेका आविष्काराचा विचार करूया.

अज्ञानी बुद्धी संयमासारखा सद्‌गुण तर सोडतेच, पण त्याचं समर्थनही कसं करते, ते पहावं. विनोबांच्या आश्रमात आंघोळीची व्यवस्था होती. तरी एक मुलगा आश्रमाकाठच्या नदीवर आंघोळीला जात असे. शिवाय त्याला पोहण्याचा फार मोह होता. त्यात किती वेळ गेला, त्यामुळं आश्रमातली किती सेवा बुडाली, याचं त्याला भान राहात नसे. असाच येथेच्छ पोहून तो परत येताना, त्याची विनोबांची अचानक भेट झाली. खांद्यावरचे कपड्यांचे पिळे दाखवीत तो म्हणाला, 'इथलं नळाचं पाणी जास्त वापरलं गेलं असतं म्हणून, मी नदीवर कपडे धुऊन आणून, पाणी आणण्याचे श्रम वाचवले आणि मी आंघोळ केली वा न केली तरी नदीचं पाणी वाहणारच होतं. अशावेळी जास्त वेळ आंघोळीत घालवला तर काय बिघडलं ?' विनोबा हसत म्हणाले, 'राम, पूर्वी नदीतून नुसतंच पाणी वाहात होतं. आता त्याबरोबर आपला संयमही वाहात चालला आणि त्याचं आपण समर्थन करतो आहोत, त्याचं काय ?'

खरं ज्ञान माणसाच्या अशा असंयमावर आणि त्यानं होणाऱ्या नुकसानावर प्रकाश टाकतं. मग सावध झालं तर, आपली बुद्धी शुद्ध होऊ लागते, वेळ वाचतो, तो खऱ्या कर्तव्यासाठी उपयोगी पडतो !

***

## २४. अभेदामुळं आनंद आणि उद्धार

आज प्रपंचज्ञानाचा बोलबाला आहे. ते ज्ञान भेदावर आधारलेलं आहे. वनस्पतीशास्त्र शिकायचं असलं, तरी वनस्पतींचे वेगवेगळे प्रकार, लागणारं वेगवेगळं हवामान- अशा गोष्टी विश्लेषण करून, शिकत जावं लागतं. तेच फळफळावळ, अन्नधान्य, पिकं - याबाबतीत करावं लागतं.

जसं वनस्पतीमध्ये एखादं झाड दुसऱ्या झाडापेक्षा वेगळं असलं, काही उंचीनं कमी-काही जास्त, काहींचे विस्तार छोटे-काहींचे मोठे, असं असतं. तसंच माणसांतही उंचसखल, काळागोरा अशा भेदांनी त्यांना जाणता येतं. माणसांना, झाडांना वेगवेगळी नावं देऊन ती वेगवेगळी जाणली जाऊ शकतात. फक्त यात आपल्याला नकळत एका घोटाळ्यात मन नेऊन पाडतं आणि तो घोटाळा दूर करण्याचा प्रयत्न केला नाही, तर अज्ञानाचा पगडा बसतो. मग तो उरलेले नाश घडवून आणतो.

वनस्पती असो, फूल असो, माणूस असो-त्यात जे भेद केले, वेगवेगळी नावं दिली, ती फक्त व्यवहार चालण्यासाठी, सोपा करण्यासाठी, शास्त्राप्रमाणं आपापलं काम करता यावं म्हणून. पण एकदा हा भेदाचा विचार मनानं सुरू केला की, ते वनस्पतींत काय, फुलांत काय, माणसांत काय - प्रपंचाच्या व्यवहारासाठी सोय म्हणून निर्माण झालेले भेद, हे जणु, माणसातलेच भेद आहेत, असं नकळत मानतं. मग या फुलापेक्षा ते फूल चांगलं - श्रेष्ठ, काळ्यापेक्षा गोरा माणूस श्रेष्ठ, असे भेद करायला सुरुवात करतं. पण त्याची अखेर शेवटी विषमतेत आणि अर्थातच त्यामुळं निर्माण होणाऱ्या अनेक प्रकारच्या वैयक्तिक आणि सामाजिक दुःखांत होते. त्यातून संघर्ष, कलह वेळी युद्धसुद्धा निर्माण होतात. मनुष्य खरंतर काळा असो, गोरा असो - तो केलेला भेद फक्त बाह्यांगाचा आहे. त्याला दिलेली वेगवेगळी नावं, ही केवळ व्यवहाराची सोय आहे. हे विसरायला होतं !

वास्तविक, हे भेद नसून विविधता आहे! सृष्टीचा तो गुणधर्मही आहे आणि सामर्थ्यही आहे. तिनं त्याला दिलेल्या अगदी बाह्य देणग्या - डोळे,

कान, नाक, हात, पाय- सुद्धा सारख्या आहेत. तसंच त्याला दिलेल्या सर्व भावनिक आणि बौद्धिक देणग्याही तितक्याच एकत्वानं दिलेल्या आहेत. हे एकत्व लक्षात आणून देणारं जे ज्ञान ते आत्मज्ञान. तहानभूक, वाढघट हे जसे शरीरधर्म सर्वांना सारखे आहेत, तसेच त्याग, औदार्य, करुणा-असे असंख्य सद्‌गुणही सर्वांना सारखेच आहेत. संतमंडळी हाच अभेद सर्वांठायी, सर्वांनी पहावा तर, खरी सुखशांती नांदेल - हे सांगत असतात आणि जगतही असतात. तसंच आपणही कुणी जगलो, तर आपल्याला अभेद पाहिल्यामुळं, हा खऱ्या आनंदाचा मार्ग मोकळा होईल.

सर सिडने हे असे सर्व सैनिकांत व आपल्यात अभेद पाहाणारे होते. आपल्या सैनिकांच्या समवेत शत्रूंशी लढताना इतर सैनिकांबरोबरच घायाळ होऊन, ते रणांगणावर पाण्यासाठी तडफडत असलेले बघून, त्यांचे एक अधिकारी पाणी घेऊन आले. सिडनेंच्या शेजारी अशाच अवस्थेत पडलेल्या सैनिकाचे डोळे त्या पाण्याकडं मोठ्या आशेनं गेले. सिडनेंनी खुणेनंच ते पाणी त्या सैनिकाला द्यायला सांगितलं. सैनिक वाचला, पण पुन्हा पाणी आणेपर्यंत सिडनेंचं प्राणोत्क्रमण झालं होतं. सैनिकाची व आपली तहान त्यांना एकच दिसली. म्हणून ते सैनिकाचे प्राण वाचवू शकले. अभेद पाहिल्यामुळं सिडने अमर झाले. आत्मज्ञानी ठरले.

म्हणून कुठल्याही कारणावरून माणसामाणसांत भेद न करता, जो खरा अभेद आहे, तो पाहायला शिकणारे तेच खरे ज्ञानी. म्हणून माउली म्हणतात, 'भूती भेदु नेणती तैसा । ज्ञानिये ते !' तेच खरे सुखी होतात !

***

## २५. समत्वामुळं शांती

आपल्या आयुष्यात अनेक गोष्टी रोज घडत असतात. सर्वसामान्य माणसाला अज्ञानानं ग्रासलेलं असल्यामुळं, प्रत्येक वेळी त्यात्या घटनेनुसार विशेषतः त्याच्या इंद्रियांना जे सुखदुःख होतं, त्यानुसार तो ती घटना चांगली-वाईट ठरवतो. ती कधी पुन्हा घडावी म्हणतो, परत कधी घडू नये म्हणतो आणि त्यामुळं त्याचं मन सतत अस्वस्थ राहातं. स्थैर्य नसल्यामुळं त्याला कितीही जगून, कितीही गोष्टी घडूनसुद्धा शाश्वत शांती काही लाभत नाही. वास्तविक, माणसात मुळातच शांती असताना, इंद्रियांच्या नादाला लागून त्याला अशांती येते. हे ज्ञानेश्वरी त्याच्या लक्षात आणून देते. इंद्रियांशी तादात्म्य हे त्याचं अज्ञान आहे. ते दूर करून खरं आत्मज्ञान देऊ पाहाते.

फार पूर्वी चीनमध्ये लाओत्से हा एक असा मोठा आत्मज्ञानी तत्त्वज्ञ होऊन गेला. तो एका खेड्यात आपल्या कुटुंबासह राहात असे. त्याच्याकडे एक चांगला उमदा घोडा होता. गावकऱ्यांना त्याचा हेवा वाटे. एकदा तो घोडा जंगलात पळून गेला. लाओत्सेचा घोडा गेल्याचं गावात पसरलं. काही गावकरी त्याचं सांत्वन करण्यासाठी भेटायला आले. तसा त्याकाळचा विचार करता, हे नुकसान मोठं होतं. पण लाओत्से आत्मज्ञानी तत्त्वज्ञ होता. तो गावकऱ्यांना म्हणाला की,'घोडा पळून गेला आहे, हे खरं. पण माझ्या दृष्टीनं काही फरक नाही. ही घटना चांगली की वाईट हे काही मला माहीत नाही.'

बरेच दिवस गेले आणि एक दिवशी लाओत्सेचा घोडा त्याच्या घरी बरोबर अजून चार जंगली घोडे घेऊन परत आला. गावात बातमी पसरली. अनेकांना त्याचा हेवाही वाटला, काहींना आनंदही झाला. ते भेटीला आल्यावर म्हणाले,'आम्ही तेव्हा हळहळलो. तुम्ही शांत राहिला. तुम्हीच भाग्यवान निघाला.' लाओत्से म्हणाला, 'मला तसंही वाटत नाही. चार घोडे आणले खरे. पण त्यानं मला काही मोठं सुखदुःख झालं नाही.'

असेच काही दिवस गेले. इतर घोडे जंगली असल्यामुळं, लाओत्सेच्या मुलानं, त्या घोड्यांना प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. त्यात एका जंगली

घोड्यावरून पडून त्या मुलाचा पाय तुटला. त्यावर शोक व्यक्त करण्यासाठी पुन्हा गावकरी आले. लाओत्से म्हणाला, 'त्याचा पाय तुटला हे खरं आहे. पणघटना चांगली की वाईट कुणास ठाऊक.'

काही महिन्यानंतर लाओत्सेच्या राजानं शेजारच्या राजाशी युद्ध पुकारलं. त्यावेळी सगळ्या गावातल्या सर्व तरुणांची सैन्यात भरती झाली आणि युद्धावर रवानगी झाली. ती भरती करताना लाओत्सेचा मुलगा अधू असल्यामुळं, त्याची निवड न होता तो घरीच राहिला. युद्धात जाऊन मरणाच्या तोंडी जाण्यापासून लाओत्सेचा मुलगा वाचला, म्हणून पुन्हा गावकरी भेटायला आले. लाओत्से शांतच होता. तो आयुष्यभर तसाच शांत राहू शकला. कारण हेच की, प्रपंचात घडणाऱ्या गोष्टींकडं समत्वानं पाहण्याची दृष्टी त्याच्याकडं होती. जी आत्मज्ञानानंच येऊ शकते.

म्हणून माउली म्हणतात की, घडणाऱ्या गोष्टी प्रिय किंवा अप्रिय मानणं म्हणजे, आपणच आपलं मन अस्थिर करून घेण्यासारखं आहे. मृगजळाच्या लोंढ्यानं मोठा पर्वत जसा हालत नाही, तसं अशा घटनांना तेवढंच मूल्य द्यावं ! घटनांनी इंद्रियांना तर काही सुखदुःखं होत राहतीलच! पण आपण आपली आत्मस्थिती सोडून इंद्रियांच्या गावी न राहण्याचाच अभ्यास करावा. 'जया आपणपे सांडूनि कही । इंद्रियग्रामावरी येणे नाही ।' हे लक्षात ठेवून राहिलो, तर प्रपंचातल्या कुठल्याही प्रसंगांना सामोरं जाता येईल, शांतीही अढळ राहील !

***

## २६. त्यागाची परंपरा

रोजच्या व्यवहाराचं स्वरूप भेदातलंच आहे. आत-बाहेर, आपला-परका, गरीब-श्रीमंत, अडाणी-ज्ञानी, खेडवळ-शहरी-अशा असंख्य भेदांतच माणूस जगतो. माणसं भेटतात तीही सुष्ट-दुष्ट, प्रेमळ-रागीट, स्वार्थी-निःस्वार्थी, सरळ-मतलबी-अशा सगळ्या द्वैताच्या आणि भेदाच्या जगात जगताना माणसाच्या मनावर भेदाचा संस्कार झाला, तर त्यात नवल नाही.

प्रपंचज्ञानाबरोबरच उपासना म्हटली तरी, त्यात देव-भक्त, सगुण-निर्गुण, अशाही भेदांना त्याला सामोरं जावं लागतं. हेच भेद सुखदुःखाची आंदोलनं निर्माण करीत राहातात. आपल्यासह सगळ्यांच्या ठिकाणी एकच देव आहे, हेच खरं सत्य आहे, हेही त्याला गाथा-ज्ञानेश्वरीसारख्या शाश्वत ग्रंथांतून कळत असतं. माझं-तुझं केलं नाही, श्रेष्ठ-कनिष्ठ समजलं नाही, तर दुःखाचा व्यवहारसुद्धा सुखाचा होऊ शकतो, हे त्याला कळतं.

जिथंजिथं म्हणून त्याला निर्भेळ आत्मीयता, एकत्व, समता अशी वागणूक मिळते, त्यात्या ठिकाणी त्याला आनंद होतो, जावंसं वाटतं. ज्यानं मला सुखदुःख होतं, त्यानंच ते दुसऱ्यालाही होतं, हे लक्षात घेऊन वागलं, तर आपण नक्की वेगळे वागतो,चांगले वागतो. ज्ञानेश्वरीच्या दृष्टीनं अभेदाचा कळस असेल तर, देहानंच मला वेगळं केलं आहे, हे लक्षात येणं. नाहीतर मी म्हणजे सगळं विश्व आहे.'म्हणोनि आपणपा विश्व देखिजे । आणि आपण विश्व होइजे।।' हे जर अनुभवलं, तर माउली म्हणतात की, त्यामुळं होणाऱ्या सुखाची स्थिती शब्दांनीसुद्धा सांगण्यासारखी नाही, एवढी ती थोर आहे. हीच ती आत्मप्राप्ती होय. त्यासाठी देहाचा त्याग करावा लागला, तरी करण्याची त्याला यत्किंचित चिंता वाटत नाही. या दैवी ज्ञानासाठी आपल्या जिवाचासुद्धा त्याग करण्याची परंपरा आपल्याकडं फार जुनी आहे.

भारतातलं नालंदा विद्यापीठ हे जगातलं एक ज्ञानाचं केंद्र होतं. चीनमधून ह्युएनसंग, या ज्ञानाच्या उपासनेसाठी पंजाब पार करून नालंदाला आला. पाली, संस्कृत भाषा शिकायला त्याला सहा वर्षं लागली. नंतरची सहा

वर्षं अध्ययन करून तो चीनला जायला निघाला. त्यावेळी भूर्जपत्रावर पन्नास मोठे ग्रंथ लिहून घेऊन, तो परत निघाला होता. हे ग्रंथ वाहून न्यायला बरोबर पन्नास खेचरं होती. वाटेत पंजाबची प्रसिद्ध झेलम नदी होती. नालंदामध्ये ज्ञानाची परंपरा तेजस्वी होती. एकेका नावेत एक खेचर, एक ग्रंथ आणि एक विद्यार्थी बसला. ते ग्रंथ आणि खेचर तडीपार करून देण्यासाठी ते विद्यार्थी बरोबर गेले होते. नावा सुटल्या आणि दुर्दैवानं जोराचं वादळ आणि हिमालयातून येणाऱ्या पाण्याचं प्रमाण प्रचंड वाढू लागलं. नावाडी म्हणाले, नावेतलं ओझं कमी केलं नाही, तर सर्वच नावा बुडतील. ह्युएनसंगच्या डोळ्यांत पाणी आलं. ग्रंथ पाण्यात टाकावेत, तर तपाची मेहनत वाया. खेचरांना नदीत लोटावं, तर ग्रंथ पोचवायचे कसे ? विद्यार्थ्यांतल्या एकाच्या ही अडचण तत्काळ लक्षात आली. त्यानं हातानं इशारा करून सगळ्या विद्यार्थ्यांना नावेतून नदीत उडी टाकायला सांगितली. बुडता बुडता तो ओरडला, तुझ्या बांधवांना आमचा प्रणाम. ज्ञानाच्या उपासनेसाठी भारतीय माणूस कुठवर किंमत चुकवतो, ते त्यांना कळू दे. आत्मज्ञान अमर आहे. देह मर्त्य आहे. ह्युएनसंग स्तंभित झाला. भारतातला हा त्याचा अंतिम धडा होता.

या पार्श्वभूमीवर विचार केला तर, आजची आपली भेदावर आधारलेली सुखदुःखं तर उरणारच नाहीत. पण शाश्वत सुख देऊ शकणाऱ्या आत्मज्ञानासाठी, ज्ञानेश्वरीनं दाखवलेल्या प्रकाशात चालताना, कोणताही त्याग करायला आपण तयार होऊ आणि त्यातच आपल्या जीवनाचं साफल्य आहे !

***

## २७. समजूतदार दृष्टिकोन

प्रपंचात माणसाला त्रास नाही म्हटलं तर, ते कुणालाही पटणं अवघडच आहे. कुठल्याही माणसाला त्रास, उपद्रव हे कुठल्याकुठल्या प्रकारानं होत असतात, याची कल्पनासुद्धा करणं कठीण आहे. हे तर परिस्थिती म्हणून असेलही. मग ज्ञानेश्वरीचा यात आधार कुठला, मदत कुठली ?

ती मदत अशी की, परिस्थिती पालटायचे प्रयत्न आपापल्या परीनं कर्तव्य म्हणून ज्यानंत्यानं करावेत. त्यामुळं जेवढी सुधारणा या सगळ्या परिस्थितीत होत असेल, ती होईलच. तिच्यामुळं काही त्रास, उपद्रव हेही कमी होतील. पण परिस्थितीचाच गुण असा आहे की, परिस्थितीचा स्वतःचा काही प्रवास आहे, काही गुणधर्म आहेत. जसं आपल्याला, एक नागरिक म्हणून, रस्त्याचा वापर करता येतो, रस्त्यावरून आपल्या ठिकाणी जाता येतं, तसंच हेही लक्षात ठेवावं लागतं की, एकूण रस्ता आणि त्यावरची रहदारी, त्याचं नियंत्रण या गोष्टी आपल्या कक्षेच्या खूप पलीकडं आहेत. त्यांना त्यांची स्वतःची गती, दिशा, व्याप्ती, नियंत्रण- अशा अनेक गोष्टी आहेत. त्यामुळं त्यात्या ठिकाणी जे घडेल, ते आपल्याला पाहण्याचा दृष्टिकोन आला, तर आपल्याला त्या परिस्थितीचं सुखदुःख होणार नाही.

जगात असंख्य माणसं आहेत. त्यांच्या स्वभावांच्या अगणित ठेवणी आहेत, वैशिष्ट्यं आहेत. त्यात वेगवेगळेपण हेही असणार. त्यानुसार गोष्टी घडत राहणार. उघडच आहे की, या सगळ्या गोष्टी तर आपल्या मनाप्रमाणं तार्किकदृष्ट्यासुद्धा कधीच होणार नाहीत. क्वचित कधी होतील त्यावेळी ते सुखाचं वाटेल. पण बरेच वेळा ते तसं होणार नाही, हेही लक्षात ठेवलं पाहिजे. तेव्हा मात्र आपल्याला त्या सगळ्याचा त्रास - उपद्रव वाटेल. असं वाटणं हे आपल्याला बरोबर वाटलं, तरी परिस्थितीनुसार ते तसंच असणार आहे. यात परिस्थितीचा नुसता स्वीकारच नाही तर, परिस्थितीकडं बघण्याचा अधिक समजूतदार आणि व्यापक दृष्टिकोन आहे ! अशावेळी माउली म्हणतात तसं, आपल्याला जगाकडं बघण्याचं एक संतुलन यावं ! त्या संतुलनामुळं जो मान

अपेक्षित घडण्याला, तोच अनपेक्षित घडण्यालाही राहील. 'अपेक्षित पावे । तै जेणे तोषे मानवे । अनपेक्षिताही करवे। तोचि मानु ।।' असं वागता येणं, हा ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाचा मोठा उपयोग आहे. त्यामुळं अशा द्वंद्वांकडं पाहण्याची दृष्टी येऊन, आपलीच मनःशक्ती वाचते. शांती टिकून राहाते.

आपल्याला सॉक्रेटीस हा ग्रीक तत्त्ववेत्ता माहिती असेल. तो असा सुखदुःखं, निंदास्तुती याकडं तितक्याच तटस्थतेनं पाहणारा होता. त्याच्या ज्ञानाची जी स्तुती होई तिच्याकडं तो संतोषानं पाही. पण त्याचबरोबर निंदेकडंही तो तसंच पाही. जगासाठी आजही तो मार्गदर्शक ठरला आहे. त्याचं जगासाठी राबणं, त्याच्या पत्नीला पसंत पडत नसे. एकदा मित्राला घेऊन तो घरी जेवायला बसला असता, त्याच्यासमोरच तिनं बरीच आदळआपट केली. त्याची निंदा करण्याच्या भरात त्यांच्यासमोरची ताटंही तिनं ओढून घेतली. एवढ्यावर भागलं नाही तर, तिनं बाजूला असलेल्या भांड्यातलं पाणी त्यांच्या डोक्यावर ओतलं. सॉक्रेटीस शांत होता. मित्राकडं स्मितहास्य करून बघताना तो म्हणाला, 'एवढा गडगडाट झाल्यावर थोडा पाऊस पडायचाच !' 'उपद्रवांचे मेळावे । वरी पडिलिया नव्हे । वाकुडा जो !' हे जे माउलींनी म्हटलं, त्या प्रकाशात जगलं, तर निंदेतही आपला संतोष कायम राहू शकतो.

वेगवेगळ्या प्रसंगांत, यांतलं आपल्याला थोडं जरी आचरता आलं तरी, परिस्थितीचा उपद्रव वाटणार नाही. शांतीही राहील !

***

## २८. अज्ञानाचा अंधार - ममत्व

आपल्या आयुष्यात वावरणाऱ्या अज्ञानाची माणसाला खरोखरच अनेकदा आयुष्यभरही कल्पना येत नाही. हेच अज्ञान कधी ममतेचा अंधार पसरवतं, कधी मनोरंजनात गुंगून जातं, कधी मीच देह म्हणतं, कधी सिद्धींना बळी पडतं, कधी संशयाच्या आहारी जातं, तर कधी लोभानं आंधळं होतं, आपल्याच कल्पनांत गुंतून जातं. त्यामुळं होणारं माणसाच्या आयुष्याचं नुकसान मात्र अक्षरशः भरून न येणारं असतं. म्हणून ते अज्ञान एकेका रूपात कसं वावरतं, त्यामुळं आपलं नुकसान कुठं होतं आणि त्यावर ज्ञानेश्वरीतून कसा प्रकाश पडतो, हे पाहायचा आपण एकेक प्रयत्न करूया.

आपण असं घडताना पाहिलं असेल की, आपण काही कामात घरात असताना, घराजवळून जाणाऱ्या रस्त्यावर अपघाताचा आवाज येतो. मनुष्य स्वाभाविकपणे खिडकीतून डोकावून बघतो, एखाद्या शब्दानं चौकशी करतो. आपल्याला जमलेली माणसं अनोळखी वाटली, आपलं कुणी त्यात दिसलं नाही, तर 'अलीकडं लोकं वाहनं बेदरकारपणे चालवतात, इतरांचं भान नसतं' - अशा काही प्रतिक्रिया देत कामाला लागतो.

पाचेक मिनिटांत जर दारावरची बेल वाजली आणि बाहेरची माणसं आपल्यालाच शोधत, आपल्याच घरातल्या बाहेर अपघातात सापडलेल्या मुलाला घेऊन आत आली, तर क्षणात आपल्या प्रतिक्रिया एकदम बदलतात. रक्तबंबाळ मूल बघून ब्रह्म आठवतं. लोक तितक्याच तत्परतेनं सगळी मदत करत असतात. आपल्या घरात कुणी असो नसो, त्या मुलाची सगळी काळजी आपल्यापेक्षाही चांगली घेतात. त्याला औषधपाणी, मदत सारं काही करतात. पण आधी आपल्याला असलेली याच अपघाताबद्दलची जी तटस्थता आहे, ती आता कधीच गेलेली असते. त्या क्षणी जे करण्याची गरज असते, ती काळजी घेण्याची क्षमतासुद्धा वेळी आपल्या अंगी राहात नाही. नुसत्या भीतीनं आणि काळजीनंच माणूस खचून जातो. आता ज्याला अपघात झाला, ते मूल-माणूस तोच आहे. पण आधीच्या आणि आत्ताच्या स्थितीत एवढा मोठा जो फरक

पडला, मनाचा लंबक या टोकाकडून त्या टोकाकडं गेला - तो बरोबर आहे की चूक आहे, हे बघण्यापेक्षा असं का होतं, याचा आपण विचार केला, तर ते आपल्या आयुष्यात जास्त उपयोगी पडेल.

अपघाताचं दुःख किंवा त्याचे परिणाम हे सारखेच असले, तरी त्यात जेव्हा ममतेचा संबंध येतो, तेव्हा मनस्थितीत हा विलक्षण पालट होतो. अपघात म्हणून कुठल्याही परिस्थितीला सामोरं जाण्याचं, जे संतुलन मनाला हवं, ते संतुलन ही ममता घालवतं. वास्तविक, जी मदत किंवा जो दृष्टिकोन या घटनेबद्दल आपल्याला घेणं आवश्यक आहे, तो, खरंतर व्यक्ती कोण आहे याच्याशी निगडीत नाही. संतुलित मनच दोन्ही बाबतीत सारखी मदत करू शकेल आणि त्याची शांतीही ढळणार नाही. पण ही ममता मधे आड आली की, गरजेची मदत एका बाजूला होत नाही आणि दुसऱ्या बाजूला नुसत्या काळजीनंच जास्त ऱ्हास होतो.

ज्ञानाचा प्रकाश येईल तर, यातली संतुलन घालवणारी ममता त्यात दिसेल. त्यात हेही कळेल की, कुठल्याही परिस्थितीत खरा प्रकाश कर्तव्यावर पडला पाहिजे. पण ममतेच्या अंधारात, मायेच्या भ्रमामुळं फक्त आपलंच माणूस दिसतं. ज्ञानाच्या प्रकाशात माणूस दिसतं-ते फक्त 'माणूस' असतं ! आपलं किंवा परकं नसतं ! त्यामुळं आपलं होणारं कर्तव्य रास्त घडतं आणि तेच आपल्या आयुष्याचं आणि इतरांचंही कल्याण करू शकतं !

***

## २९. अज्ञानाचा अंधार - कल्पना

कल्पनेमुळं संशोधनं, शास्त्रांचा विकास, कलांची निर्मिती होते. मग हीच कल्पना माणसाला अज्ञानाचा, दुःखाच्या अंधकाराचा अनुभव का बरं देते? समजा, हातात पाटीपेन्सिल घेऊन त्यावर सुंदर अक्षरात काही मजकूर लिहिला, तर तीच पाटी वाचण्यासारखी होते, जपून ठेवण्यासारखी होते, इतरांच्याही उपयोगी पडते. पण हीच पाटीपेन्सिल हातात घेऊन डोळे मिटले, लिहायला, चित्र काढायला सुरुवात केली, पाटी संपत आल्याची जाणीव झाली आणि मग डोळे उघडून पाहिलं, तर पाटीवरचा गिरगटा ना आपल्याला बघवत, ना इतरांना उपयोगी पडत. उलट आपला वेळ, श्रम वाया जातात आणि निर्माण झालेली गोष्ट मात्र,उपयोगी न पडता दुःखच देते.

तीच गोष्ट साध्या रांगोळी काढण्यातही आहे. तो कल्पनेचाच आविष्कार आहे. त्यातून अगदी प्रदर्शन ठेवून माणसांनी आवर्जून पाहायला यावं, आनंद घ्यावा, अशा कलाकृतीही या साध्या रांगोळीतून निर्माण करता येतात. पण, हेच रांगोळीचं साहित्य घेऊन अंधारात बसलं आणि खोलीतही अंधार, आपल्यालाही दिसत नाही, जमिनीचाही अंदाज येत नाही-अशा अवस्थेत कल्पनेचे कितीही आविष्कार केले तरी, दार उघडून प्रकाश पडल्यावर दिसणारं चित्र स्वतःला आनंद देणं दूरच, खिन्नता देईल. इतरांना ते पाहून आनंद होणार नाही, हे वेगळं सांगायला नकोच.

या सोप्या उदाहरणांवरून लक्षात येईल की, साधनं कल्पनेचीच आहेत. आविष्कार त्याचेच आहेत. पण त्यात जर असा दृष्टीचा, ज्ञानाचा म्हणजेच त्या अर्थानं प्रकाशाचा अभाव असला, तर असल्या नुसत्या कल्पनाविष्कारानं सुखाऐवजी दुःख आणि निराशा यांची निर्मिती होते. अज्ञानाच्या अंधकारात कल्पना वावरत असल्या, म्हणजे अकारणच अशी दुःख आणि निराशा अनुभवायला येतात. ज्ञानेश्वरीसारख्या शाश्वत ग्रंथाच्या प्रकाशात त्या कल्पना वावरणं गरजेचं आहे. तर याच कल्पनेचा प्रकाशातला वावर आणि त्यामुळं उपयोग, आपल्याला शक्य होईल.

अज्ञानातल्या कल्पना कशा वावरतात ? तर अमक्यांचा मुलगा अमक्या साईडला गेला, म्हणून तो यशस्वी झाला. या कल्पनेनं माझ्या मुलानंही तसंच करून, यशस्वी होण्याची कल्पना अज्ञान निर्माण करतं. तेच कला शिकणं, प्रसिद्धी मिळणं, पैसा मिळवणं - असल्या असंख्य बाबतीत मनुष्य अज्ञानामुळं करायला जातो. मग तो साहजिकच दुःखी होतो. वास्तविक, या प्रत्येकाच्या कल्पनेवर ज्ञानाचा प्रकाश पडला, तर प्रत्येकाला सुखाचा मार्ग नक्कीच मिळेल. तो अर्थातच 'कुणासारखा' असेल किंवा नसेल ! अज्ञानातला नसल्यामुळं सुखाचा ठरेल, चांगला असेल एवढं मात्र नक्की !

एक सत्पुरुष मिलिटरीत होते. त्यांना एक मुलगा होता. त्यांना प्रथम वाटे की, त्यानंही असंच मिलिटरीत हुद्देदार व्हावं. त्यासाठी त्यांनी आग्रह धरून प्रयत्नही केले. तीन वेळा तो नापास झाला.त्यामुळं अशा पद्धतीनं जगून तो आपल्यासारखा यशस्वी होईल, ही अंधारातली कल्पना होती, हे त्यांना ज्ञानाच्या प्रकाशामुळं लक्षात आलं. मग त्यांच्या कल्पनांवर ज्ञानाचा प्रकाश पडला, त्याचा कल कळला. त्यांनी त्यानुसार प्रयत्न करायला सांगितले. त्यात तो उत्तम यशस्वी झालाच, पण त्याचं आयुष्यही सुखाचं गेलं.

म्हणून आपल्या कल्पना अज्ञानाच्या अंधारात वावरतात की आत्मज्ञानाच्या प्रकाशात हे आपण पाहिलं, तर अकारण पडणारे कष्ट आणि माउली म्हणतात तसं, 'मनोरथाच्या उतरंडी' रचणं आणि नंतर निराश होणं वाचेल आणि याच कल्पनेचा उपयोग सुखाच्या प्राप्तीसाठी आणि उद्धारासाठीही करता येईल !

***

## ३०. अज्ञानामुळं कर्मफळाची काळजी

मनुष्य कर्मं करीत असला तरी, हे उघडच आहे की, कुणाला उपद्रव होईल, कशाचा विध्वंस होईल, अशा स्वरूपाचे तामस हेतू असलेली कर्मं, ही सर्वथा न करण्यासारखीच आहेत. त्यामुळं त्यापासून कटाक्षानं दूर राहण्याचा प्रयत्न आपल्या आणि समाजाच्या हितासाठी करणं योग्यच आहे. रजोगुणात फळ चांगलंवाईट बघून करणं न करणं ठरवता येतं.

पण ज्ञान मिळवणं, कुणाला मदत करणं, ज्ञानदान करणं, भगवंताचं भजन करणं, भक्ती करणं, आजारांना औषधोपचार करणं- अशा कर्मांचा हेतूही चांगला असतो, त्यानं व्यक्तीचंच काय समाजाचंही हित होत असतं. पण चांगल्या कर्मांची इच्छा धरणं हे सात्त्विक वाटलं, तरी एकतर प्रत्यक्षात तसं तेवढ्या प्रमाणात चांगलं फळ येतंच, असंही नाही आणि दुसऱ्या बाजूला चांगल्या फळाची अपेक्षाच जर डोक्यात जास्त वावरली, तिनं मूळ धरलं तर, त्याचा परिणाम कामाच्या दर्जावर होतो. चांगलं होण्याची अपेक्षा, म्हणजेच फळाची अपेक्षा, ही फळाची एक प्रकारची काळजी आणि आसक्ती निर्माण करते. हे ओळखलं नाही तर, चांगली कर्मं करणारी माणसंही अखेर अनेकदा असमाधानात का राहातात, ते कळू शकेल.

यावर ज्ञानेश्वरीत मोलाचा प्रकाश टाकलेला आहे. उत्तम मार्क मिळवण्यासाठी अत्यंत कष्ट घ्यावे लागतात. त्यात दर्जा आणि एकाग्रताही असावी लागते.पण अनेक पालकांना किंवा विद्यार्थ्यांना जर त्या उत्तम मार्कांची काळजी लागली, ते नाही मिळाले तर काय होईल, याची काळजी लागली, ते चांगले मार्क मिळाल्यावर पुढं मिळणाऱ्या संधीच्या अपेक्षा वाढल्या, तर मात्र वेगळंच घडताना दिसतं. असल्या गोष्टींनी अभ्यासातली एकाग्रता आणि दर्जा वाढण्याऐवजी, त्यात्या फळांच्या अपेक्षेनं मनावरचा ताणच उलट वाढतो आणि त्याचा परिणाम म्हणून काळजी-चिंता-भय-अस्वस्थता अशा गोष्टी वाढून अभ्यासावर, त्याच्या दर्जावर, विद्यार्थ्याच्या एकाग्रतेवर - नुकसानकारक परिणाम होतो. इथं ज्ञानेश्वरीचं म्हणणं लक्षात घेऊ.

आपलं काम एकाग्रता आणि अभ्यासाचा दर्जा राखणं, हे आहे. त्याचबरोबर ज्ञानेश्वरी म्हणते, फळाचं काय होईल याची अजिबात चिंता न करणं हेही आपलं काम असतं. अज्ञानामुळंच फळाची चिंता लागून, येऊ शकणारं फळही अंतरू शकतं. विनोबा म्हणत तसं, आपलं काम कर्माची उत्तम काळजी घेणं, हे आहे. ते कर्म फळाची काळजी घ्यायला समर्थ असतं!

सात्त्विक कामातसुद्धा ज्यांनी हे साधलं, ते त्या कामाला न्याय देऊ शकतात, आलेलं फळही अत्यंत आनंदानं स्वीकारतात. मुंबई राज्याचे आरोग्य विभागाचे त्या काळातले डायरेक्टर डॉ. डगामा यांच्या हाताखाली, यात्रेत कॉलरा होऊ नये म्हणून, प्रतिबंधक लस टोचण्याचं सर्व काम चाले. ते शांत चित्तानं हे सात्त्विक कार्य सेवाभावानं निरंतर करीत. काही लोकप्रतिनिधींनी याचा किती उपयोग होत असेल, असा प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले की, 'या कार्यामुळं किती प्रमाणात फायदा झाला, हे सांगता येणार नाही. पण जर हे कार्य केलं नसतं तर, किती लोक बळी पडले असते, यावरूनच तुम्हाला माझ्या कार्याची कल्पना करता येईल.' फळाची अपेक्षा न करता, सात्त्विक कार्य निष्ठेनं करणाऱ्या साधुसंतांची भूमिकाही अशीच असते. संत नसते तर, आज जेवढी शांतता, सात्त्विकता गावोगावी दिसते, तितकी ती नक्कीच दिसली नसती. अर्थात, हे फळ खूप विधायक आहे. मात्र ते ज्ञानी असल्यामुळं फळाची काळजी न करता निष्ठेनं काम केल्यामुळं, संतांचं एवढं प्रचंड कार्य आजही अविरत चालू आहे. त्याच्याच प्रकाशात आपल्याला आपल्या जीवनातली सात्त्विक कर्मं अनासक्तीनं करीत, संतोषानं राहाता येईल !

***

## ३१. अज्ञानाचा परिणाम - भ्रम

अज्ञान ही एक मोठी सार्वत्रिक आणि विलक्षण गोष्ट आहे. तिच्यामुळं चांगल्याचांगल्या गोष्टींतसुद्धा बेसावधता आणि भ्रम निर्माण होतात. अर्थातच कुठल्या तरी सत्पुरुषांच्या किंवा ज्ञानेश्वरीसारख्या सद्ग्रंथांच्या सान्निध्याशिवाय आणि अभ्यासाशिवाय, असले परिणाम लक्षात येणंही अवघड आहे. अज्ञानाच्या अंधकारात आपल्या होणाऱ्या नुकसानीची कल्पना आपल्याला चटकन येत नाही. सात्त्विक कर्मांच्या बाबतीत तर असं म्हणता येईल की, सात्त्विक कर्मं म्हणजे, तशी उजेडाची खोली आहे. पण थोडंथोडं अज्ञान जरी राहिलं तरी, अशा उजेडाच्या खोलीतसुद्धा एखाद्या कृतीच्या-वस्तूच्या मागं, कोपऱ्यात थोडा अंधार राहून जातो. त्या अंधारात अशातलं नुकसानही दिसत नाही, लक्षात येत नाही.

कर्मं वर पाहता सात्त्विक असल्यामुळं त्यांची सगळी प्रक्रिया आणि परिणाम हे सात्त्विक आणि शुद्धच असतील, असा भ्रम हे अज्ञान निर्माण करू शकतं. याची कल्पना यायला एकदोन छोटी उदाहरणं पाहू. मनुष्य दान करतो. ती कृतज्ञता नक्कीच ज्ञान दर्शवते. त्याला स्वतःलाही ते कर्म चांगलं असल्याचं वाटतं. पण दानाचा कुठं उल्लेख झाला नाही, कुणी दखल घेतली नाही, कुठं दर्शनी पाटी लावली नाही तर, अशा दानासारखं सत्कर्म करणाऱ्या माणसाच्या मनातसुद्धा क्षणभर विषाद येऊन जातो. तो त्याच्या लक्षातही येत नाही. यात, दान घेणाऱ्यांनी त्याची जाणीव राखणं उचित आहे. पण दान शुद्ध राहायचं असलं, तर देणाऱ्यानं ते विसरून गेलं, तरच ते शुद्ध राहील. पण जोपर्यंत असा प्रसंग येत नाही, तोपर्यंत माणूस आपण केलेलं दान शुद्धच आहे, अशा भ्रमात राहातो, हे अज्ञानामुळं घडतं.

अलीकडच्या काळात अशा दानधर्मांवर माणसाला त्याच्या उत्पन्नातून, करातून पन्नासपन्नास टक्के सूटही मिळते. मनुष्य दान करतो. दान केल्याच्या भ्रमात असतो. पण इकडं काळजीपूर्वक पावती घेताना, आपणच आपलं दान कमी करतो आहोत, हे या अज्ञानाच्या भ्रमामुळं त्याच्या लक्षात येत नाही. जर

लक्षात आलंच तर, हा भ्रम त्याला असंही समर्थन करायला लावतो की, ही सूट तर रास्त आहे आणि घेणंही कायदेशीरच आहे. पण यामुळं आपल्या दानाची शुद्धता जाते. त्यापेक्षा मुळात दान कमी केलं तरी चालेल. सूट नाही घेतली तरीही चालेल. तर, या दानातल्या भ्रमावर आणि अर्थातच, मूळ अज्ञानावर प्रकाश पडला, असं म्हणता येईल.

दानासारख्या किंवा त्याहीपेक्षा श्रेष्ठ असलेल्या त्यागासारख्या बाबतीतला, हा अज्ञानाचा भ्रम दूर करण्याचं काम संत सदैव करीत आलेले आहेत. एका झेन साधूकडं एक श्रीमंत दानशूर शिष्य गेला. त्यानं झेन गुरूला मोहरा दान केल्या. गुरूनं त्या पाहिल्या, ठेवून घेतल्या. त्यावर गुरू काहीच न बोलल्यामुळं या शिष्याला न राहावून तो म्हणाला, 'याची किंमत खूप मोठी आहे. त्यावर खूप माणसांचा बराच काळ उदरनिर्वाह होऊ शकतो.' साधूला शिष्याच्या खऱ्या कल्याणाची काळजी होती. तो शांतपणे त्याला म्हणाला, 'मग हे दिल्याबद्दल मी तुझे आभार मानावेत, अशी तुझी अपेक्षा आहे काय?' शिष्य वरमला आणि त्यानं खरा आनंद देणाऱ्या शुद्ध त्यागाचं वर्म ओळखलं. त्यातही त्याचं अज्ञान दूर करण्यासाठी गुरूंनी स्पष्ट केलं की, 'असं दान करायला तुला निःस्पृह स्थान मिळालं, याबद्दल तूच ऋणी राहा!'

भ्रम आणि अज्ञान नाहीसं करून, आयुष्यभर खरा संतोष देणारी कर्मं करायची प्रेरणा आपल्याला मिळो, हा आशीर्वाद श्री ज्ञानेश्वर माउलींना आपण मागूया !

***

## ३२. आचाराचं आगळं कारण

आपल्या सामान्य आयुष्यातसुद्धा सुखी होण्यासाठी ज्या अनेक मुद्द्यांवर ज्ञानेश्वरीत प्रकाश पडतो, त्यांतला एक आपण इथं विचारात घेऊ. कुटुंबातली विशेषतः मोठी माणसं तरुणांना आणि लहान मुलांना त्यांनी कसं वागावं, हे सांगत असतात. त्यांचं ऐकल्यानं इतरांचं भलंही होतं. पण प्रत्यक्षात लहानांकडून असं सगळं ऐकलं जात नाही. त्याबद्दल या मोठ्या माणसांसाठी माउलींनी आणखी एक मुद्दा दिला आहे.

त्याचं औचित्य पाहू. अनेकदा मोठ्यांकडून अशी तक्रार ऐकू येते की, मुलांचा कितीतरी वेळ वाया जातो, कुणाचा टीव्ही-सिनेमात जातो, कुणाचा नेट-मोबाइलमध्ये जातो, शिवाय हिंडण्या-फिरण्यात, खाण्या-पिण्यातही मुलांचा वेळ वाया जातो, त्यामुळं ती व्यग्र राहतात, अभ्यासाचं नुकसान होतं, अनेकदा वर्षं वाया जातात. त्याचा परिणाम त्यांच्या मनोधैर्यावर होतो आणि पुढं त्यामुळं त्यांच्या करिअरवरही होतो. अर्थातच, त्याचे दुष्परिणाम कुटुंबावरही होतात. या तक्रारीत तथ्य जरूर आहे. हे चित्र बदलण्याची गरज आहे. त्यासाठी मोठे जे सांगण्याचे, समजावण्याचे प्रयत्न करत आहेत, त्यात कमी पडणारी किंवा लक्षात न येणारी एक गोष्ट ज्ञानेश्वरीत अधोरेखित केली आहे.

आपण एक घडलेली घटना पाहू. पूर्वीच्या काळी अनेक व्रतांमध्ये धुंधुरमासाचं व्रत असे. रात्रीची उपासना व्हावी, पहाटे लवकर उठून स्नान, पूजा आवरून, स्वयंपाक करून सूर्योदयापूर्वी जेवणं करावीत. मग दिवसभर उपास करावा, असं त्याचं थोडक्यात स्वरूप असे. एका सत्पुरुषांच्या मठात असा धुंधुरमास चालू असताना पहाटे प्रसादाची वेळ झाली. ते स्वतः पानावर बसल्याशिवाय इतर कुणी प्रसाद घेत नसे. त्यामुळं प्रसाद झाल्याबरोबर त्यांना येण्यासाठी निरोप दिला गेला. ते नुकतेच उठले होते. त्यांची आंघोळ, नित्यकर्मं आवरायची होती. त्यांनी त्यांच्या जवळच्या शिष्यांना निरोप पाठवला की, 'माझं आवरायचं आहे.' त्यावर, त्या शिष्यांनी तसं खरंतर, गुरूंची योग्यता जाणून म्हटलं की, 'आपल्याला ही कर्मं या स्थितीला लागू नाहीत. आपण

अवश्य प्रसादाला यावं. त्यावर नकार देताना ते सत्पुरुष म्हणाले, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. मी आता या कर्मबंधनांच्या पलीकडं आहे. पण हे समजण्याची जी शक्ती तुमच्याकडं आहे, ती सर्वांच्याचकडं असेल असं नाही ! आज जर मी स्नान न करता प्रसादाला आलो, तर लोक तेवढंच लक्षात ठेवतील. तेही उद्या तसेच येतील. इतकंच काय, ते तोंड धुण्यापूर्वीसुद्धा उद्या जेवायला बसतील. त्यामुळं, मला ही सारी नित्यकर्मं करावी लागतील आणि मगच मी प्रसादाला येईन !'

माउली म्हणतात की, कुटुंबात वडिलधाऱ्यांवर, समाजात संतांवर एक विशेष जबाबदारी असते. ती दुर्लक्षित करू नये. लोकांना सत्पुरुषांची स्थिती कळत नाही. ते अनुकरण करू जातात. 'एथ वडिल जे जे करिती । तेचि येर अनुष्ठिती ।' म्हणून 'हे ऐसे स्वभावे । म्हणोनि कर्म न संडावे । विशेषे आचरावे। लागे संती ।।' म्हणून जर आपल्याला पुढच्या पिढीला चांगलं वळण लावायचं असेल तर, नुसतं सांगणं पुरत नाही. आपली स्थिती वेगळी असली तरी, त्यांना ती कळत नाही म्हणून का होईना, स्वतःला लागू नसलं, तरी त्यांना सांगतो ते आपल्याला आचरावं लागतं. आधी आपला वेळ वाया जाऊ नये, याचीच दक्षता घ्यावी लागते. त्यासाठी मलाच टीव्ही-सिनेमा सोडावा लागतो. मग आपल्याला जरूर वाटणारे परिणाम दिसतील. पुढच्या पिढीला आवश्यक असलेलं ते सात्त्विक वळणही लागेल !

***

## ३३. ज्ञानेश्वरांकडूनही शिकावं !

ज्ञानेश्वरीबरोबरच ज्ञानेश्वरांकडूनही अनेक विधायक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. त्या आजच्या पार्श्वभूमीवर पाहूया. पूर्वीच्या अनेक प्रकारच्या प्रतिकूलतांच्या, गरीबीच्या, राहणीमानाच्या तुलनेनं, आजच्या काळात त्यामानानं समृद्धता आहे. त्याचा एक असा दुष्परिणाम झालेला आढळून येतो की, सुखसोयींची, पैशाची अनुकूलता,आता सवयीची झाल्यानं ती गृहीत धरली जाते. घरात असलेल्या अनेक सुखसोयीच्या साधनांची, आपल्या शिक्षणावर खर्च होणाऱ्या पैशाची, आपल्या खाण्यापिण्यांच्या होणाऱ्या चैनींची- अनेकदा मुलाबाळांना जाणीव असताना दिसत नाही.

त्यामुळं त्यांचं चीज करावं लागतं, त्या ज्यांच्यामुळं मिळाल्या, त्यांच्या कष्टांचं मोल ओळखून, जबाबदारीनं आपलं कर्तव्य पार पाडावं लागतं, हे विचारही कुटुंबात पुढच्या पिढीत घडत नाहीत. त्यामुळं कष्टांविषयी जागरूकपणा, अपयशाची खंत, यशासाठी धडपड, स्वावलंबनाची तत्परता- अशा अनेक सद्गुणांना पुढची पिढी पारखी होते आहे, एक बेफिकीरी त्यांच्या जगण्याला येते आहे. त्यातलं नुकसान उघड आहेच.

दुसऱ्या बाजूनंही सुबत्तेनं म्हणा, मायेमुळं म्हणा अशी जाणीव नसलेल्या मुलांना ती द्यावी, असं मोठ्यांनाही काही प्रकर्षानं वाटत नाही. त्यात त्यांचं होणारं भावी नुकसानसुद्धा लक्षात येत नाही. अर्थात लक्षात नाही आलं, तरी होणारं नुकसान त्यामुळं टळत नाही. मग पुढच्या पिढीकडून मोठ्यांच्याबद्दल उदासीनता राहते, संवादाची गरज भासत नाही. तर मोठ्या पिढीला मुलांकडून दुर्लक्षित होण्याचं जीवन पुढं अनेकदा वृद्धाश्रमात कंठावं लागतं. हे चित्र अर्थातच चांगलं नाही. बदलण्याची गरजही तितकीच आहे. त्यावर उपाय आपल्याला ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात जरूर आढळेल.

ज्ञानेश्वर स्वतः ज्ञानाची जणू प्रत्यक्ष मूर्ती आहेत. त्यांनी दिलेलं ज्ञान हे अलौकिक आणि शाश्वत आहे. पण असं ज्ञान, हे आपण मिळवलेलं नसून, ते केवळ गुरूंच्या कृपाप्रसादामुळं आपल्याला प्राप्त होतं आहे, याची अत्यंत तीव्र

आणि निरंतर जाणीव, सबंध ज्ञानेश्वरीभर आपल्याला दिसेल. श्रोत्यांच्या तळमळीमुळंच केवळ हे आपल्याला सुचतं आहे, हा कृतज्ञतेचा भावही, ज्ञानेश्वरीभर माउली व्यक्त करताना दिसतील.

एवढ्या अलौकिक कर्तृत्वाची थोर व्यक्तिमत्त्वं जर इतकी कृतज्ञ आणि नम्र राहात असतील तर, त्यापुढं आपले प्रपंच, यश यःकश्चित ! निदान त्यात तरी, आपल्याला मिळणाऱ्या गोष्टींबद्दल कृतज्ञ राहण्याची, जाणीव ठेवण्याची गरज किती मोठी असेल ? त्यासाठी सावध आणि कृतिशील राहण्याची तत्परता टिकवणं, किती मोलाचं असेल ? ते ओळखलं तर, आपली जीवनं अशी कोरडी, निकृष्ट, बेफिकीर तर नक्कीच होणार नाहीत. कृतज्ञतेच्या जाणिवेमुळं सर्वांनाच आनंद देणाऱ्या कृतीही घडतील ! प्रत्यक्ष ज्ञानाची मूर्ती ज्ञानोबाराय, जे ज्ञान देताना आत्यंतिक नम्रतेनं, अत्यंत अमोल कृतज्ञतेनं म्हणतात की, 'जे मी हे सांगतो आहे, ते बुद्धीला आकलन करणं कठीण आहे, शब्दांत सांगणंसुद्धा अवघड आहे. पण केवळ श्री गुरुनिवृत्तिनाथांच्या कृपादृष्टीच्या प्रकाशातच ते शक्य होत आहे'. 'ते बुद्धीही आकळिता साकडे । म्हणऊनि बोली विपाये सापडे । परि निवृत्तिकृपादीप उजियेडे । देखेन मी ।।'

आपापल्या लौकिक कर्तृत्वात असलेलं आईवडिलांचं, समाजाचं ऋण कृतज्ञतेनं जर या सांगण्याच्या प्रकाशात जपता आलं तर, कुटुंबातलं, समाजातलं वातावरण, कृती निकोप राहायला किती मोठी मदत होईल ? म्हणून ज्ञानेश्वरीतून शिकावं तसं, ज्ञानेश्वरांकडूनही शिकावं !

***

## ३४. खरं पुण्यकर्म

एकंदरीत कर्मांचा मार्ग मोठा गहन आहे, एवढं खरं. त्यात बिचकून जाण्यासारखं काही नसलं, तरी संतांच्या सांगण्यातून त्यावर विचार करावा, याची मात्र आवश्यकता आहे. जाणीव असलेला मनुष्य कर्म करताना निदान पाप टाळण्याचा प्रयत्न करील. शक्यतो पुण्यकर्म करण्याचा प्रयत्न करील. पण या पापपुण्याचाही विचार वरवर वाटतो इतका सोपा नाही, फसवा आहे. विचार केला तर, आपल्याला खऱ्या पुण्याचा मार्ग जरूर सापडू शकेल.

भक्त पुंडलिकांच्या काळी कुक्कुटस्वामी म्हणून संत होऊन गेले. त्यांचा नदीकाठी आश्रम होता. अशा संतमंडळींना आधी म्हटलं तसा, पुण्याचा सूक्ष्म आणि शुद्ध मार्ग सापडलेला असतो. माउलींसारख्या अशा संतांकडून तो आपण शिकून घ्यावा. पुंडलिक हेही पुण्यमार्गानंच जाणारे होते. आपल्या आईवडिलांबद्दल कृतज्ञता म्हणून, त्या काळच्या प्रथेप्रमाणं, समजुतीप्रमाणं ते त्यांना तीर्थयात्रेला घेऊन गेले. वाटेत या कुक्कुटस्वामींच्या आश्रमाजवळ त्यांचा मुक्काम पडला. पुंडलिकांना मध्यरात्रीच्या वेळी अचानकपणे तीन स्त्रिया या स्वामींच्या आश्रमाकडं येताना दिसल्या. तेवढ्या अंधारातही ओळखू येण्याएवढ्या त्या तेजस्वी होत्या. पण त्या काळवंडून गेलेल्या होत्या. प्रथम भास वाटून पुंडलिकांनी त्याकडं दुर्लक्ष केलं. थोड्या वेळानं त्या तीनही स्त्रिया आश्रमातून पुन्हा बाहेर पडून, मार्गस्थ झालेल्या त्यांना दिसल्या. यावेळी मात्र त्या अत्यंत निर्मळ आणि विलक्षण तेजस्वी दिसत होत्या. पुंडलिकांनी ओळखलं की, या कुणी सामान्य व्यक्ती नक्कीच नाहीत. म्हणून, त्या निघून जाण्याच्या आत, पुंडलिकांनी त्या साध्वींना नमस्कार घातला. त्यांनी आशीर्वाद दिला. पण पुंडलिकांच्या काही लक्षात न आल्यानं त्यांनी गोंधळून विचारलं की, 'आपण कुणी देवी आहात का?' त्या तिघी उत्तरल्या, 'आम्ही या भूलोकावरच्या गंगा-यमुना-सरस्वती या तीन पवित्र नद्या आहोत'.त्यावर पुंडलिक आणखीनच गोंधळले. त्यांनी विचारलं,'आपण या स्वामींच्या दर्शनाला आला तेव्हा वेगळ्या दिसत होता, आत्ता वेगळ्या दिसत आहात, इथं आपण का आला-आपण

मला सांगू शकाल का?' त्या म्हणाल्या, 'आम्ही मुळात पवित्र आहोत. पण 'तुझ्यासारखे' अनेक पापी लोक येतात आणि स्नान करून जातात. त्यांच्या पापांनी आम्हाला हा मलिनपणा येतो. ती मलिनता घालवून पुन्हा आम्हाला पवित्र करण्याचं सामर्थ्य केवळ अशा संतांच्या सान्निध्यातच असतं. त्यासाठी आम्ही इथं येत असतो !'

पुंडलिक स्तंभित झाले. ते म्हणाले की,'मी आपलं म्हणणं समजू शकलो नाही. आईवडिलांना तीर्थयात्रेचं पुण्य मिळावं म्हणून, मी एवढं कर्म आरंभलं आहे. यात माझ्याकडून काय पाप झालं?' त्या म्हणाल्या, 'आईवडिलांना असं तीर्थयात्रेला नेऊन त्यांना पुण्यवान करता येत नाही किंवा आपल्यालाही पुण्य मिळत नाही. आईवडिलांच्या खऱ्या सेवेत पुण्य सामावलेलं आहे!' पुण्याचं मर्म पुंडलिकांच्या लक्षात आलं आणि असली तीर्थयात्रांची वरवर पुण्यकारक वाटणारी कर्मं सोडून देऊन, आईवडिलांना गरजेची असलेली सेवा, त्यांनी सुरू केली आणि खरं पुण्यकर्म केलं !

माउली म्हणतात तसं, या 'पुण्यात्मक पापाचा' विचार आपण करावा. मग लक्षात येईल की, आजही आईवडिलांना यात्रांसाठी एसीची, विमानाची तिकिटं काढून देणाऱ्यांनी आणि अधिकाधिक सुखसोयींच्या ठिकाणी पण, वेगळं ठेवणाऱ्यांनी किंवा फाइव्ह स्टार वृद्धाश्रमात आईवडिलांना ठेवून धन्यता मानणाऱ्यांनी, ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात नक्की काय करण्याची गरज आहे !

***

## ३५. ज्ञानेश्वरीचं शाश्वत औचित्य

अनेकांची अशी समजूत असते की, गीता सांगितली गेली तो काळ शेकडो वर्षांपूर्वीचा आहे. त्या काळातली माणसं, त्यांचं राहणीमान-सारं काही त्या काळातलं होतं. अर्थातच, त्यांना पडणारे प्रश्न त्या काळातले असणार, ते वेगळे असणार. त्यावेळी निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरं भले गीतेत दिली असतील, ज्ञानेश्वरीत ती उलगडून दाखवलेली असतीलही !

पण आजचा काळ कितीतरी पुढं गेला आहे ! यंत्रांचं, विज्ञानाचं, संगणकाचं युग आलं आहे. कल्पनेच्याही पलीकडं संशोधनं होऊन, राहणीमान बदललं आहे. जीवनाला फार वेग आला आहे, गती आली आहे. असल्या गतिमान जीवन जगत असलेल्या माणसाच्या आयुष्यात, शेकडो वर्षांपूर्वीच्या त्या जुन्या, शांत, अप्रगत जीवनातल्या प्रश्नांची उत्तरं, आता कुठं लागू पडणार आहेत ? तेव्हा ते ठीक असेल, पण आज ते कालबाह्य झालं आहे. काहींच्या दृष्टीनं तर तो फक्त पाठांतराचा विषय आहे. काहींना ज्ञानेश्वरी हा आता फक्त पारायणाचा ग्रंथ उरला आहे, असं वाटतं !

खरंतर, असं वाटणं, हे आपलं दुर्दैव आहे. वस्तुस्थिती मुळात अशी नाही. आधी म्हटलं तसं, शेकडो वर्षांपूर्वी गीता जन्मली असेल. त्यानंतर शेकडो वर्षांनी, सर्वसामान्यांच्या कळवळ्यापोटी, ती गीता सोपी करून सांगणारी ज्ञानेश्वरी जन्मली असेल, त्यालाही आज शेकडो वर्षं झाली. पण एवढ्यामुळं ती आज कालबाह्य झाली, असं म्हणणं म्हणजे, आपल्याला माणसाचं जीवन नीट न कळल्याचं लक्षण आहे. आपण मुळातच हे लक्षात घेतलेलं बरं की, माणूस वेदांच्या काळातला असो, गीतेच्या काळातला असो, ज्ञानेश्वरीच्या काळातला असो किंवा आजचा असो- 'माणूस' तोच आहे. त्या काळातली वेशभूषा, वस्त्रप्रावरणं, वाहनं, साधनं, राज्यपद्धती-असल्या गोष्टी जरूर बदलल्या असतील. पायी जाणारा माणूस घोड्यावरून, बैलगाडीतून, सायकलवरून आणि आता अलिशान गाडीतून जात असेल. पण 'हा जाणारा माणूस' तोच आहे ! त्याची हाव, लोभ, मत्सर, असूया, कुरघोडी करण्याची

प्रवृत्ती, वर्चस्वाची ओढ-असे प्रश्न निर्माण करणारं माणसाचं मन हजारो वर्षांपासून तेच आहे. कदाचित या प्रश्नांचे विषय बदलले असतील. पण वृत्ती त्याच आहेत. त्यामुळं असल्या मोहासारख्या गोष्टींनी आयुष्याचा काळ व्यर्थ जाणंही तेच आहे.

'कैसा नेणो मोहो वाढीनला । तेणु बहुतेकु काळु व्यर्थ गेला।' हा प्रश्न कायमच आहे ! माणूस दगड हातात घेऊन लढला काय, तलवारीनं झगडला काय, अण्वस्त्रांनी लढला काय-त्यामागची कारणं, प्रवृत्ती आणि नुकसान तेच आहे. त्यावेळी शेजारचं गाव गिळंकृत करीत असेल, छोटं राज्य गिळंकृत करीत असेल, आज देशच्या देश गिळंकृत करीत असेल, पण अशा लोभाच्या, वर्चस्वाच्या प्रवृत्ती त्याच आहेत आणि त्यामुळं आयुष्याचा व्यर्थ जाणारा काळही तोच आहे. म्हणून या लोभमोहाकडं सावधानतेनं बघण्याची गरज तीच आहे. त्यावर उतारा असलेल्या-त्याग, विवेक-अशा उत्तरांचं जे औचित्यही, गीतेच्या काळी होतं तेच, ज्ञानेश्वरीच्या काळी आणि तेच आजच्याही काळी आहे. शांती, संतोष आणि त्याअर्थानं ईश्वर गमावला जात असेल तर, या उत्तरांच्या प्रकाशात आपला आजचा काळही चालणं गरजेचं आहे, औचित्याचंही आहे. मोहाचा विषय बदलला तरी, नुकसान तेव्हाही जसं होतं, तसंच ते आजही होतं. ते टाळण्याचे कर्म-ज्ञान-योग-भक्तीचे लोपलेले मार्ग, ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात विचार करून आजही चालावे लागतात. तसे जे चालतील, त्यांचा काळ व्यर्थ न जाता सार्थकी लागेल, सर्वांना स्वास्थ्यही लाभेल !

***

# डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची
## (आता डिजिटल स्वरूपात)

१. **ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :** श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)** : चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. **साधनप्रेरणा :** नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. **मेरी यात्रा (हिंदी) :** हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. **बोधपाठ :** आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. **एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) :** आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. **सृष्टिसंदेश : (विवरणासह) :** जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. **गुरुतत्त्वतरंगिणी :** गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत**

४२. **नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation**

४३ ते ५४. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :** डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. **शिदोरी :** व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. **विचारविसावा :** विसावा देणारी विचारांची विद्या

५७. **सारविस्तार भाग २ :** चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. **महाराजांची शाळा :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. **साधनपदावली भाग २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. **आरतीपुष्पमाला :** डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. **विनवणीची वाणी :** चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. **श्रद्धेची पहाट :** खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. **उपासनामाला :** येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. **पावनपथ :** श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. **अनुभवपुष्पे - भाग १ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. **कृतज्ञतामार्ग :** कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. **ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात :** आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

**६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)**

श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

**६९. संतबोध : भाग ४ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

**७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार :** मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

**७१. उत्तरायण -भाग ३ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

**७२. अनुभवपुष्पे - भाग २ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

**७३. श्रद्धा :** श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

**७४. अनुभवपुष्पे - भाग ३ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

**७५. अर्घ्य :** ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

**७६. जीवनचिंतन :** दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

**७७. स्वास्थ्यसंवाद :** मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

**७८. वचनांजली भाग १ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

**७९. अक्षरायण :** आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

**८०. वचनांजली भाग २ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

**८१. भावगीता :** श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

***



## ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात..

....साऱ्या जगाबद्दल जिव्हाळा बाळगून जगण्याची प्रेरणा देणारं संतजीवन आणि संतांचा बोध हाच आता मोठा आशाजनक दिलासा आहे. त्या प्रकाशात चालणाऱ्या अनेकांची जीवनं बाहेरच्या या विपरीत, भ्रमित जगातही शांती आणि समाधानाचा अनुभव घेत - देत जगली जात आहेत. त्यात सर्वांना दिलासा आणि प्रकाश देऊ शकणारे जे जागतिक शाश्वत ग्रंथ, त्यांत श्री ज्ञानेश्वरीचं स्थान शतकानुशतकं अढळ आहे. आजही त्या प्रकाशात वाटचाल करून समाधानी जीवन जगायला मार्ग दाखवण्याची कालातीत, विलक्षण दैवी प्रेरणा त्यात आहे. त्याचा स्वत:ला झालेला आणि कदाचित इतरांना उपयोगी होऊ शकणारा इवलासा प्रकाश या ठिकाणी आत्यंतिक नम्रतेनं आणि सदिच्छेनं समोर ठेवला आहे.....